

सुधारकाग्रणी

# गोपाळराव आगरकांच्या आठवणी

## निवेदन: यशोदाबाई आगरकर

संकल्प व टिपण: अनंत क्षीरसागर

लेखक व संग्राहक: दत्त आपटे

एकोणीसाव्या - विसाव्या शतकातील थोर सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे शैक्षणिक, सामाजिक व वृत्तपत्रीय क्षेत्रांतील कार्य सर्वज्ञात आहे.पण त्यांच्या कौटुंबिक आणि व्यक्तिगत जीवनाबद्दल फारशी माहिती पुढे आलेली नव्हती.

त्यांनी स्वत:च्या आयुष्याची अक्षम्य हेळसांड केली; तसेच त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी व मुलाबाळांची कोणी फारशी दखलही घेतली नाही.

दत्त आपटे हे त्यांच्या क्रांतिकारी मित्राकडे अकोल्यास गेले असता, अगदी अनपेक्षित यशोदाबाईंची भेट झाली. त्यांच्याशी बोलून त्यांच्या सहजीवनातील प्रसंग त्यांचे मित्र मुनी क्षीरसागर यानी जाणून घेतले. त्यातून या आठवणी संकलित व ओघवत्या स्वरूपात लोकांसमोर आल्या, त्यातून आगरकरांचे व त्यांच्या समकालीनांचेही वेगळे पैलू लक्षात येऊ शकले.

*आगरकरांच्या या आठवणी प्रथमत: 'स्त्री' मासिकात प्रसिद्ध झाल्या. 'यशोदाबाई आगरकरांच्या आठवणी' या पुस्तकात प्रतिभा रानडे यांनी त्या आठवणींचा समावेश केला असून तसा उल्लेखही त्यात केला आहे.*


| | प्रकरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | बालपणीचे लग्न | ४२५ |
| २ | सुधारकांची संसारयात्रा | ४२८ |
| ३ | टिळक आणि आगरकर | ४३८ |
| ४ | आगरकर - पती, पिता, शिक्षक | ४४८ |
| ५ | आगरकरांची अखेरे आणि नंतर | ४५४ |



# गोपाळराव आगरकांच्या आठवणी

श्रीमती यशोदाबाई आगरकरांच्या हृद्य आठवणी दत्त आपटे यांनी संग्रहित केल्या, हे अद्भूत कार्य होय. त्याचे मूल्य अमूल्य आहे. यंगमेन्स मॉडेल एज्यु. सोसायटीच्या वाटचालीचा आढावा घेताना स्वत: दत्त आपटे यांनी त्याची पृष्ठभूमी सांगितली आहे. ती अशी-

श्री. अनंत क्षीरसागर अकोल्याच्या राष्ट्रीय पाठशाळेत असल्याने व तेथे काम करता करता राष्ट्रीय चळवळीतील अनेक  उपद्‌व्याप त्याने चालू ठेविले असल्याने या शाळेचे स्वरूप समजावून घ्यावे व महाराष्ट्रातील क्रांतिकारक चळवळीबद्दल काही विचारविनिमय करता आल्यास पाहावे म्हणून मी १९३५ सालच्या अखेरीस अकोल्यास जाऊन आलो. तसे पाहिले तर ही काही अकोल्याची माझी पहिलीच भेट नव्हती. अकोल्यास गेल्यानंतर गाठीभेटी घेण्याची आमची काही ठराविक ठिकाणे असत. गावाबाहेरील श्री.फडके वकिलांचा मळा, ताजना पेठेतील श्री.नानाभाई इच्छाराम यांचे घर, त्याचप्रमाणे गावाबाहेरील राष्ट्रीय शाळेचा परिसर अशी ही ठिकाणे असत.

या खेपेस मात्र एक चमत्कारिक योगायोग आला. मी नानाभाईच्या घरी बसलो असताना अत्यंत किरकोळ बांध्याची गिड्डी अशी एक वृद्धा मजपाशी आली आणि मला म्हणाली, ''बाळा, तू सांगली-कऱ्हाडकडचा का रे?''

शुद्ध मराठी भाषेतील ही अचूक विचारणा ऐकून मी आश्चर्यचकित झालो व म्हटले, ''होय, पण आजी हे तुम्ही कशावरून ओळखलेत?''

''अरे, मी मूळची कऱ्हाडचीच आहे. तुझी ठेवण, बांधा पाहूनच मला कृष्णाकाठ आहे हे जाणवले आणि म्हणूनच विचारले. तू मुनीचा स्नेही ना? मग काही तरी उपद्‌व्याप चालू असणारच! उद्या त्याला घेऊन आमचे घरी जेवावयास ये.''

वृद्धेचे बोलणे इतके प्रेमळ, लाघवी व आपुलकीचे होते की, मी कोठेही जेवणासाठी न जाणारा असूनही चट्‌दिशी हो म्हणून गेलो. आजी कोण, कोठच्या, नाव -काही कशाचाही थांगपत्ता नसताना मी होकार देऊन मोकळा झालो होतो.

मुनी उर्फ अनंता क्षीरसागर याला याबाबत विचारता तो म्हणाला, ''अरे, त्या आगरकर काकू प्राचार्य आगरकरांच्या त्या पत्नी'' मी आश्चर्याने थक्क झालो. एका महान समाजसुधारकाची पत्नी अकोल्यात हयात असावी आणि महाराष्ट्रातील विद्वानांना तिची दखल असू नये याचे मला मोठे आश्चर्य वाटले. प्राचार्य आगरकरांचे चरित्र लिहिणारे प्राध्यापक आळतेकर, त्यांनाही आगरकर कुटुंबियांची माहिती नव्हती हेही एक महदाश्चर्य होते. आपल्याला मिळालेले आमंत्रण किती मोलाचे आहे, याची जाणीव मला झाली.

मी दुसऱ्या दिवशी काकूंच्या घरी गेलो. त्यांचे व प्राचार्य आगरकरांचे दोन चिरंजीव श्री.आण्णा व दादा मला भेटले. सप्तरंगी सूर्यकिरणांची जी एक विशिष्ट चिकित्सा पद्धती आहे त्या पद्धतीने सप्तरंगी बाटल्यांतील पाणी औषध म्हणून गोर-गरिबांना देण्याचे काम काकू करीत. त्यांची ही मोफत उपचारपद्धती अनेक गोरगरिबांना उपयुक्त ठरली असावी हे तेथे उपचारासाठी आलेल्या अनेक रुग्णांवरून स्पष्ट दिसत होते.

हा परिचय सहजावारी दवडण्यास मी तयार नव्हतो. आगरकरकाकूंच्या प्राचार्य आगरकरांबाबतच्या सविस्तर आठवणी त्यांच्याकडून वदवून घेण्यात आल्या. त्यांच्यावर आवश्यक ते वाङ्मयीन संस्कार करण्यात आले. या आठवणींच्या प्रसिद्धीकरणातून मिळणारा पैसा माझ्या शिक्षणसंस्थेला देणगी म्हणून घेण्यास काकूंची संमती मिळविली. आणि मग शं.वा.कि.(किर्लोस्कर) कडे येऊन दाखल झालो.

समाजसुधारक आगरकरांच्या आठवणींचा हा ठेवा, शं.वा.कि.सारखा कर्तबगार संपादक हातचा सोडणे शक्यच नव्हते. 'स्त्री' मासिकात या आठवणी क्रमश: प्रसिद्ध झाल्या. आणि त्याचा मोबदला म्हणून आलेली रक्कम ही 'यंगमेन्स एज्युकेशन सोसायटीची' महत्वाची देणगी ठरली.

या आठवणींच्या प्रसिद्धीकरणामुळे प्राध्यापक आळतेकर व आचार्य अत्रे यांना अत्यंत हर्ष झाला. त्याचबरोबर या घटनेची आपणास दखल नव्हती याबद्दल त्यांना विषादही वाटला.

अनंत हरी क्षीरसागर यांनी त्यांच्या उत्तरायुष्यात त्यांच्या आठवणी दिल्या आहेत. 'एका मराठा स्वातंत्र्यसैनिकाच्या जीवनातील त्रोटक टिपणे' म्हणून 'हकिगत व मनोगत' या शीर्षकाने जतन केलेले हे हस्तलिखित उपलब्ध झाले. त्यात आगरकर काकूंबद्दल त्यांनी उल्लेख केला आहे की, -

१९३९-४० साली .. कै आगरकरांच्या पत्नी मातोश्री यशोदाकाकू आगरकर यानी निवेदन केलेल्या कै. आगरकरांच्या आठवणी 'स्त्री' मसिकातून प्रकाशित झाल्या. त्यांचे संकलन मी केलेले होते. (वाङ्मयीन लेखन दत्त आपट्यांचे?) या लेखनाबद्दल किर्लोस्करांकडून आलेले १०० रुपये मातु:श्री यशोदाकाकूंनी घेतले नाहीत. श्री. दत्त आपट्यांनी, मी किंवा श्री आगरकरांनीच(कुटुंबापैकी?) ते स्वीकारावेत असा त्यानी आग्रह धरला. शेवटी ..... श्रीमती यशोदाकाकूंचे तैलचित्र टिळक राष्ट्रीय शाळेला त्यांचे सुपुत्र कै.श्री.अण्णा आगरकर यांनी सादर अर्पण केले.

'यशोदाबाई आगरकरांच्या आठवणी' या प्रतिभा रानडे यांच्या पुस्तकाच्या पृष्ठ ५९ ते ११२ या भागात त्या आठवणी प्रकाशित केल्या आहेत. अकोल्यास यशोदाबाईंची भेट व हे कथन यांविषयी प्रारंभी नमूद केले आहे की, 'गेल्या साली अकोल्यास काही कामानिमित्त गेलो असता माझे मित्र व अकोला काँग्रेस कमिटीचे एक प्रमुख कार्यकर्ते श्री.मुनी यांच्यासह श्रीमती यशोदाबाई आगरकर यांच्या भेटीस जाण्याचा योग आला. विषयावरून विषय निघता निघता यशोदाबाईंना प्रिं.गोपाळराव आगरकर यांच्या आठवणी लिहिण्यास विनंती केली. परंतु वृद्धापकाळ, तशात लिहिणेवाचणे फारसे नाही, अशा स्थितीत आजीबाई वरील गोष्ट कबूल करीनात. परंतु थोडा फार आग्रह करून व तसदी देऊन त्यांना आठवणी सांगण्याबद्दल विनंती केल्यानंतर त्यांनी ती मान्य केली.

आठवणी उतरून घेण्याचे काम श्री.मुनी यांनी फारच आस्थेवाईकपणाने केले. आगरकरांचे खाजगी जीवन त्यांच्याच पत्नीकडून निवेदले जाणे ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. संग्राहक: दत्ता नारायण आपटे.'

त्या पुस्तकातून आठवणींचा तो भाग घेतला आहे.

●●●

## १. बालपणीचे लग्न

कऱ्हाडजवळ उंब्रज म्हणून एक गाव आहे. ते माझे माहेर. आमचे घराणे तसे काही मोठे श्रीमंत नव्हते; सामान्यपणे सुखवस्तू असे भिक्षुक घराणे आमचे. माझ्या आजोबांचे नाव रामकृष्णपंत फडके. आम्ही त्यांना दादा म्हणत असू. त्यांचा काही व्यापारधंदा अगर सावसावकारी असावी. माझे वडील मोरोभटजी फडके, त्यांना शास्त्रीबुवाही म्हणत. ते आपले भिक्षुकीच करीत. मी आमच्या घरी मोठ्या नवससायासाने झालेली मुलगी. मुलगा झाला की आनंद आणि मुलगी झाली की आंबट चेहरा हा प्रघात हल्लीप्रमाणे त्या काळीही होताच. उलट हल्लीपेक्षा त्या काळी तो काकणभर अधिकच होता म्हटले तरी चालेल. लोक म्हणत, 'हात्तेच्या! मुलगीच ना!'

माझ्या लहानपणी आमच्या घरी एक मोलकरीण कामाला येत असे. तिला पाचसहा मुलीच होत्या! एक दिवस ती माझ्या आजोबांना म्हणाली, 'देवानं मुलगी दिली तुम्हाला. ती नको वाटत असेल तर द्या मला. माझ्या जशा सहा मुली, तशीच ही सातवी. आणा, मी सांभाळते तिला.' अर्थात कितीही झाले तरी स्वत:चे मूल थोडेच कोणी दुसऱ्याला देत असते! मी माझ्या घरातली एकुलती एक आणि बऱ्याच दिवसांनी झालेली आणि तीही मोठ्या नवससायासाने. अर्थात माझे बालपण मोठ्या मजेत आणि लाडात गेले असल्यास नवल ते काय! आणि नंतर माझ्या पाठीवर मला तीन भाऊही झाले. आम्ही चौघेजण भावंडे मोठ्या आनंदात वाढत होतो. ज्या घरात आम्ही राहात असू, त्याला लक्ष्मीनारायणाचे मंदिर म्हणत असत. घर कसले, चांगला मोठा वाडाच होता तो! त्या वाड्यात आम्ही, ज्यांचे आम्ही उपाध्याय होतो ते गृहस्थ - म्हणजे माझ्या सासऱ्यांचे मामा रामभाऊ केळकर आणि आणखी एक गृहस्थ अशी तीन बिऱ्हाडे होती. आम्ही तेथे राहात होतो म्हणजे वंशपरंपरा राहात असल्यासारखेच; बिऱ्हाडकरू म्हणून नव्हे. माझ्या आजोबांचे, वडिलांचे व माझेही बालपण तिथेच त्या वाड्यात गेले.

गोपाळराव आगराकरांचे वडील आपल्या मामांकडे बहुतेक वर्षातून एकदोन वेळा तिथे येत व चारआठ दिवस राहात देखील. माझे आजोबा बोलताबोलता 'मला तुमच्या मुलाला करून घ्यावी' अशी बोलणी काढत. त्यावेळी 'पुढे पाहू, त्याचं आत्ताच काय! मुलगा शिकतो आहे; अंबूही लहान आहे; होऊ द्या जरा मोठी' असे म्हणून गोपाळरावांचे वडील वेळ मारून नेत. आजोबाच घरी सर्व पाहात असल्यामुळे माझे वडीलही कोणत्याच बाबतीत उगीच ढवळाढवळ करीत नसत. आपल्या वडिलांचा आदर ठेवून वागत. गोपाळरावांच्या वडिलांनी मला अगदी रांगत्या खेळत्या वेळेपासून पाहिलेली.

मी सहासात वर्षांचीही झाली नसेन, इतक्यातच माझ्या लग्नाची काळजी आई, वडील व आजोबा यांना वाटू लागली. आपल्या बायकांतल्या पद्धतीप्रमाणे माझी आई मला नेहमी कामे सांगताना, 'उद्या सासरी गेल्यावर कसं करशील तिथं? नेहमी हीच का तुझ्या माहेरची रीत, म्हणून माझं नाव निघेल ना!' अशा रीतीने टोचून बोले. आईचेच बोलणे ते, पण त्या वेळेला काय कळणार? मी आपली खुळ्यागत वाईट वाटून घेई. मी आजोबांची फार लाडकी. त्यांना माझ्यावर कुणी रागावल्याचे मुळीच खपत नसे. ते म्हणत, 'तुझं काम झाल्याशी कारण. सांग तुझं काय काम आहे ते, मी करतो. उगीच तिला कशाला कडाकडा बोलतेस? पोरीची जात आहे, खेळायचीच ती. आता नाही खेळायचं, तर केव्हा म्हातारपणी खेळेल वाटतं? जाऊ दे, खेळू दे तिला!'

अशा तऱ्हेने लाडात एखाद्या फुलासारखे माझे बालपण चालले होते. आजोबांच्या प्रेमळ दृष्टीखाली मी वाढत होते. खेड्याची राहाणी. स्वच्छंद खेळावे, बागडावे. त्यामुळे मी जरा थोरवाडच दिसे आणि त्यामुळे त्या काळच्या रीतीप्रमाणे मी लग्नाला योग्य झाले, मोठी झाले, असे वडील आई आजोबा या सर्वांना वाटू लागले. आणखी आपल्या एकुलत्या एक लाडक्या मुलीच्या सुखाच्या दृष्टीने त्यांना वाटे, ही मुलगी आपल्या घरासारखेच हे जे गोपाळराव आगरकरांचे घर तिथेच पडावी, त्याप्रमाणे मी वरच सांगितले आहे की, माझे आजोबा गोपाळरावांच्या वडिलांना वारंवार विचारीत म्हणून. गोपाळराव मला

वाटते; त्यावेळी फारतर सतरा आठरा वर्षांचे असतील. ते नुकतीच मॅट्रिकची परीक्षा पास झाले होते व पुण्याच्या कॉलेजात दाखल झाले होते.

होता होता झाली काय गंमत, गोपाळरावांचे दुसऱ्याच एका मुलीशी मुळी लग्न ठरले! मुलगी होती चांगली दहा बारा वर्षांची आणि हुंडाही पण दीडशे रुपये ठरला होता!

हो खरे, पण सांगतासांगता राहूनच गेले! उंब्रजापासून आठदहा मैलांवर टेंबू म्हणून एक खेडे आहे. असेल फार तर पन्नास पंचाहत्तर उंबरा तिथे. ते आगरकरांचे मूळ गाव. या ठिकाणी गोपाळरावांचे पणजोबा - कोकणातील त्यांचे मूळ गाव 'आगर' की 'आगरवाडी' असे कायसेसे आहे, तेथून येऊन - स्थायिक झाले. ते मोठे सावकार होते. परंतु गोपाळरावांचे आजोबा अकाली वारल्यामुळे व घरी कोणी वडीलधारे माणूस पाहणारे नसल्यामुळे त्यांच्या वडिलांच्या हातास काही फारसे लागले नाही. ज्यांना जे सापडले ते त्यांच्या नात्यातली व इतर माणसे बळकावून बसली आणि त्यामुळे गोपाळरावांचा जन्म जसा गरिबीत झाला, तसे त्यांचे सर्व आयुष्यही गरिबीतच गेले. टेंबू गाव अगदीच आडवळणी! तशात लहान खेडे! त्यामुळे लग्नासारख्या काही प्रसंगी बाजार करावयाचा म्हटले तर एक कऱ्हाड किंवा साताराच गाठावा लागे. कऱ्हाडही काही त्या वेळी हल्लीसारखे शहर नव्हते. एक क्षेत्र म्हणून त्याला महत्त्व. मोठेसे खेडे म्हणता येईल फार तर त्याला. त्यामुळे बहुतकरून अशा प्रसंगी साताऱ्याला जाण्याचाच प्रघात फार. मोठे शहर, त्यामुळे माल चांगला, निरनिराळ्या वाणाचा आणि स्वस्त मिळे. त्या वेळी हल्लीसारखी मोटींरींची ये-जा नव्हती आणि आगगाडीही नव्हती! सर्व प्रवास बैलगाडीनेच करावा लागे. त्यामुळे साताऱ्याला जाऊन यायचे म्हणजे कामाच्या मानाने सहज दोनचार दिवस मोडत.

लग्नाचा बेत नक्की झाला म्हणताच गोपाळरावांचे वडील साताऱ्यास जाऊन सामानसुमान, कापडचोपड घेऊन आले व रात्र झाल्यामुळे उंब्रजेस आपल्या मामाकडे मुक्कामास राहिले. तिथे अर्थातच त्यांनी लग्नाचा म्हणून केलेला बाजार दाखविण्यास सुरुवात केली. माझ्या वडिलांना, आईला, आजोबांना वाटले, आपल्या मुलीच्या लग्नाचा हा बाजार असता तर किती छान झाले असते! शेवटी निघतानिघता सर्व गोष्टी निघाल्याच. गोपाळरावांच्या वडिलांनी दीडशे रुपये हुंडा घेतल्याची गोष्ट मोठ्या अभिमानाने सांगताच माझे आजोबा म्हणालेसुद्धा की, 'दीडशे रुपयांचीच गोष्ट ना? त्यात काय आहे! केली असती आम्हीही कशीतरी जमवाजमव!' झाले. याप्रमाणे गोपाळरावांच्या लग्नाची तयारी तर अगदी जोरात सुरू झाली. माझे आईवडील व आजोबा गोपाळरावांच्या स्थळाबद्दल निराश होऊन माझ्याकरिता मनातल्या मनात योग्य स्थळ शोधण्यात गर्क होऊन गेले.

पण इतक्यात झाली काय गंमत, जुन्या मताप्रमाणे त्या मुलीची आणि गोपाळरावांची पत्रिका पाहण्याचे ठरले. ही गोष्ट विसरून कशी राहिली हीच आश्चर्याची गोष्ट! आणि पत्रिका पाहतात तो काय! तीत निघाले की, मुलगी सासऱ्याच्या मुळावर आहे. झाले! गोपाळरावांच्या आई म्हणाल्या की, 'असली मुलगी नको करायला.'

गोपाळरावांना एक वडील व एक लहान असे एकंदर दोन भाऊ होते. त्यांतला वडील बंधू विरक्त असून साधू होऊन बसले होते आणि धाकटा भाऊ तर अगदीच लहान! घरची स्थिती म्हणावी तर ती आमच्यापेक्षा काही मोठीशी चांगली नव्हती. लग्नाला आलेला मुलगा, डोळ्यांदेखत एकदा दोनींचे चार हात व्हावेत म्हणून मोठ्या हौसेने कार्य उभारलेले, सर्व तयारी झालेली आणि अगदी आयत्यावेळी ही पत्रिकांची अडचण उपस्थित झाली. लग्नकार्याची तयारी अगदी श्रीमंतांनासुद्धा जाणवते; मग ही तर काय, बोलूनचालून सामान्य स्थितीतील माणसे! आता ही केलेली तयारी फुकट जाऊ द्यावयाची नाही, असा निश्चय करून गोपाळरावांचे वडील त्याच दिवशी रात्री उंब्रजला आले. तो शुक्रवारचा दिवस होता. शुक्रवारी रात्री काही बेत ठरवू नये म्हणतात; म्हणून त्या रात्री दुसरीकडे राहून शनिवारी सकाळी अगदी भल्या पहाटे घरी येऊन ते माझ्या वडिलांना हाका मारू लागले. त्या वेळी आम्ही कोणी उठलोही नव्हतो! माझ्या वडिलांनी उठून विचारले, 'एवढ्या पहाटे कुणीकडं आलात?' तेव्हा ते म्हणाले, 'अगोदर दार उघडा, मग सारं सांगतो!'

त्या वेळी गोपाळरावांच्या वडिलांनी माझ्या वडिलांना

व आजोबांना सर्व हकीकत सांगितली व मला मागणी घातली. उंब्रजला त्या वेळी एक चांगले ज्योतिषी होते, त्यांना आमच्या पत्रिका दाखविण्यात आल्या. त्यांनी पत्रिका वगैरे पाहून त्या जमत असल्याचे सांगताच पूर्वीच्याच मुहूर्तावर माझे व गोपाळरावांचे लग्न झाले. माझ्या आजोबांना, वडिलांना व आईला खूपखूप आनंद वाटला. त्यांच्या मनाप्रमाणेच सर्व गोष्टी घडून आल्या.

लग्नाच्या अगोदर खरे म्हटले तर सासूबाईंनी मला मुळीसुद्धा पाहिले नव्हते. माझे वडील जरी जुन्या काळचे असले तरी नवा मनू ओळखणारे होते. लग्न ठरल्यानंतर एकदोन दिवसांनी त्यांनी माझ्या धाकट्या भावाला बरोबर घेतले, गोपाळरावांच्या घरी नेले आणि त्यांच्या समक्ष म्हणाले की - ''हे पाहा, ही सुशिक्षित मंडळी. पुढं 'मला ही बायको नको, मला ही आवडत नाही, मी तिला पाहिलीच नव्हती' असं काहीतरी म्हणत बसून दुसरं लग्न करून मोकळी व्हायची, म्हणून हा मुलगा आणला आहे. याच्यासारखीच रंगारूपाने माझी मुलगी आहे. पत्करत असेल तर सांगा. हो! नाहीतर आम्ही आपले चाललो परत! हो, मुलांच्या आयुष्याच्या गाठी पूर्ण विचारानं झालेल्या बऱ्या.'' त्यावर गोपाळरावांनी 'ठीक आहे,' म्हणून जबाब दिला म्हणे! तसेच लग्नात सांगण्यासारखी आणि हल्लीच्या परिस्थितीत न दिसणारी गोष्ट म्हणजे खेड्याच्या लोकांचा दिलदारपणा व आपुलकी ही होय. आमचे वऱ्हाड असे फारसे नव्हतेच. पण गावातील लोकांनी जसे त्या घरचे तसेच आमच्याकडीलही काडीमात्र उणे पडू दिले नाही. माझ्या आईला ते पाहून मनस्वी आनंद झाला. कार्य अगदी निर्विघ्नपणे पार पडले.

लग्नात गोपाळरावांचे मामा रामभाऊ भागवत यांच्या इथले चार दागिने माझ्या अंगावर घातले होते. माझ्या वडिलांना हा प्रकार मुळीच आवडला नाही. ते आपले साधे आणि सरळ होते. त्यांना असला दिखाऊपणा पसंत नसे. मला घरी नेताना त्यांनी ते सर्व दागिने उतरून माझ्या मामंजींच्या स्वाधीन केले व म्हणाले ''माझी मुलगी मी इथं दिली ती मुलगा पाहून दिली; त्याच्या मामाची संपत्ती पाहून दिली नाही! आम्हाला ही उसनी श्रीमंती नको.'' मी घरी आल्यावर माझ्या आजोबांनी काही मोडतोड करून मला एकदोन ठळकठळक दागिने केले. हेतू हा की, मला आपल्याला काहीच दागिने नाहीत म्हणून वाईट वाटू नये आणि शिवाय अगदीच नारळमुलगी दिली असेही होऊ नये. कन्याधन म्हणून चारदोन तरी दागिने आपले असावेत मुलीच्या अंगावर.

गोपाळराव लहानपणापासून अभ्यासात हुशार, पण स्वभाव फारच हूड आणि उपद्व्यापी. त्यामुळे त्यांना मिळत असलेली शिष्यवृत्ती या सुमारास बंद झाली होती. (गोपाळरावांची ओढाताण पाहून गु.केरूनाना छत्रे कधीकधी त्यांच्या फीचे पैसे भरीत असत. रा.ब. वि.मो.महाजनी यांनीही त्यांना प्रथम थोडीफार मदत केली.) लग्नानंतर पुन्हा ते कॉलेजात गेले व कर्मधर्मसंयोगाने त्यांची शिष्यवृत्तीही फिरून सुरू झाली. तसेच त्यांनी या वेळी एक निबंध लिहिला होता, तोही उत्तम ठरून त्याला बक्षीस मिळाले. (गोपाळरावांना याच सुमारास वक्तृत्वाबद्दलही पन्नास रुपयाचे बक्षीस मिळाले होते.) अशा रीतीने लोकांच्या दृष्टीने त्यांच्या बायकोचा पायगुण तर चांगला ठरला.

होताहोता पाच वर्षे लोटली. तेवढ्या अवधीत मी दरसाल दीडदोन महिने ते सुटीत घरी आले म्हणजे सासरी जात असे. बाकीचा वेळ माहेरीच असे. माझ्या जोडीच्या मुली वर्षातून तीनचार वेळा सासर-माहेर करीत आणि मग मला हिणवीत. आणि मलाही पण त्या वेळी त्यांचा खरोखरीच फार फार मत्सर वाटे. वाटे की, आपल्याला का बरे यांच्यासारखे तीनतीन, चारचार वेळा सासरी नाही नेत? एवढ्या या पाच वर्षांच्या अवधीत गोपाळरावांची माझ्या वडिलांना वरचेवर पत्रे येत. आणि त्यांना आपली बायको शिकलेली असावी, असे वाटे व ते साहजिकही होते. त्याप्रमाणे ते वडिलांना नेहमी माझ्यासाठी लागणारी पुस्तके वगैरे घेऊन पाठवून देत. पण माझे शिक्षण आपले मराठी लिहिण्यावाचण्यापलीकडे जास्त जाऊच शकले नाही! कारण एक तर त्या काळी मुलींना शाळेत घालण्याचा लोकाचार तितकासा रूढ नव्हता. आणि दुसरे म्हणजे सभोवतालचे वातावरणही या कामी अनुकूल असे नव्हते. त्यातून मला तरी कुठे इतकी लिहिण्यावाचण्याची आवड होती? बरोबरीच्या मुली खेळतबागडत, त्यांच्याच

बरोबरीने त्यांच्यातच हमामा हुतूतू घालण्यात माझा सारा वेळ निघून जात असे. वडील मला चार अक्षरे शिकविण्याचा प्रयत्न करीत; पण मी शक्य त्या त्या तऱ्हेने अभ्यास टाळीत असे.

गोपाळरावांचे चार मामा. एक कऱ्हाडला असत, त्यांचे नाव रामकृष्णपंत भागवत. इतर तिघेजण वऱ्हाडात उद्योगधंद्याच्या निमित्ताने गेले ते तेथेच स्थायिक झाले. सर्वांत लहान मामा दत्तोपंत भागवत व गोपाळराव यांच्या वयात फक्त एक महिन्याचे अंतर. हे दोघेजण बरोबरच शिकले, बरोबरच वाढले, कॉलेजात असताना दत्तोपंत घरून अनेक पदार्थ करून नेत, सामानसुमान नेत. त्या वेळी साहजिकच थोरले मामा विचारीत, 'गोपाळ तुला नाही का रे काही लागत?' तेव्हा ते म्हणत, 'मला काही नको. माझं काय? माझं सर्व तिथं आयतं तयार असतं, मग इथून कशाला न्या? गडी आहे, मोलकरीण आहे. वसतिगृहात राहावं, जेवावं आणि अभ्यास करावा. मला काही कमी नसतं. माझा खर्च माझ्या शिष्यवृत्तीतून भागतो!'

लहानपणापासून स्वारी स्पष्टवक्ती आणि बाणेदार. अकोल्याच्या हायस्कूलमध्ये हेडमास्तर (रा.ब.वि.मो. महाजनी) उशिरा येण्याबद्दल बोलले. त्या वेळी 'तुमच्याच सारखा एम.ए.होईन तरच नावाचा आगरकर' अशी प्रतिज्ञा करणारे गोपाळराव वयाच्या बावीसतेवीसव्या वर्षी खरोखरच एम.ए. झाले व अगोदरच ठरल्याप्रमाणे चिपळूणकरांनी काढलेल्या न्यू इंग्लिश स्कूल या शाळेला मिळाले. त्या वेळी पगार अगदी पोटापुरता म्हणजे फक्त तीसच रुपये घेण्याचे ठरले. मी आता तेराचौदा वर्षांची झाले होते. मी एकुलती एक मुलगी, त्यामुळे विशेष लाडकी व घरी तर अगदी मुलाप्रमाणे वाढलेली. त्यातून अगदीच लहानपणी लग्न झालेली. माझ्या सासरी सासूबाईंच्या माहेरची बरीच मंडळी असत. मोठ्या मामांच्या सुनाही तेथे असत. त्या सर्वांत मी एकटीच आपली गावंढळ दिसे. मला कसे बोलावे, चालावे, कसे वागावे काही समजत नसे. पुण्यात बिऱ्हाड करून राहाण्याच्या गोष्टी निघत तेव्हा मला आनंद वाटे; पण त्याबरोबरच थोडी भीतीही वाटे. होताहोता पुण्याला जाण्याचे नक्की ठरले व त्याप्रमाणे तेथे एक घरही भाड्याने घेण्यात आले. मी, माझ्या मावस सासूबाई व धाकटे भाऊजी अशी पुण्यास राहण्यास जाण्यासाठी म्हणून कऱ्हाडहून निघालो.

●●●

## २. सुधारकांची संसारयात्रा

आधी पुणे ते कऱ्हाड म्हणजे जवळजवळ शंभर मैलांचा प्रवास आणि तोही बैलगाडीने. त्यामुळे पुणे गाठण्यास जवळजवळ चारपाच दिवस लागले आणि सर्व अंग कसे अगदी घुसळून निघाले. त्यामुळे पुण्यास होणाऱ्या माझ्या भावी सासुरवासाची ती नांदीच झाली म्हणावयाची. कारण पुण्यास आल्यानंतर ज्याला सासुरवास म्हणून म्हणतात, त्याचा मला थोडाफार अनुभव आला. माझ्या मावस सासूबाई स्वभावाने फारच कडक. त्यांना कोणतीही गोष्ट त्यांच्या इच्छेविरुद्ध झालेली खपत नसे; मग ती कितीही क्षुल्लक असेना! माझे वय लहान, तशात मी लाडात वाढलेली; त्यामुळे कामधंद्याची सवय मला जरा कमीच. त्यांनी सांगितलेली सर्व कामे मी करण्याचा खूपच प्रयत्न करी; पण कित्येक वेळा चुके, विसरे, बावरल्यासारखेच होई मला. मला कामाचा अगदीच उरक नसल्यामुळे त्या रागावत, जळफळत आणि गोपाळरावांना गाऱ्हाणी सांगत.

एकदा माई - माझ्या मावस सासूबाईंना माई म्हणत - मला तीनचार कामे सांगून आणि त्यांचा उपवास असल्याने फराळाचे करण्यास सांगून शेजारी देवाला अशा कुठेशा गेल्या. मीही त्यांनी सांगितलेली सर्व कामे अगदी व्यवस्थितपणे केली. त्या दिवशी आम्हा सर्वांना शेजारी जेवणाचे आमंत्रण होते आणि त्या धांदलीत मी सासूबाईंचे फराळाचेच करावयाचे तेवढे नेमकी विसरले. दुपारी जेवणे

वगैरे झाल्यावर घरी आले आणि मग सासूबाईंना पाहताच त्यांचे फराळाचे करावयाचे आहे याची आठवण झाली. पोटात धस्स झाले. आता काय काय बोलतील आणि किती रागावतील कोण जाणे! मी खाली मान घालून हळूच घरात गेले, चूल पेटविली आणि चटकन काहीतरी करून द्यावे म्हणून बटाट्याची परडी घेऊन निघाले; तोच सासूबाईंनी वसकन माझ्या अंगावर येऊन ती परडी हिसकली, म्हणाल्या, 'पुरे झालं, दमलीस आता!' त्यांच्या हिसकण्याने व माझ्या घाबरेपणाने परडीतील बटाटे सांडून साऱ्या घरभर बटाटेच बटाटे झाले. त्या त्राग्याने दिवसभर उपाशी राहिल्या. मीही एकसारखी मनात वाईट वाटून घेत होते, पण उपयोग काय? गोष्ट तर हातची गेली होती.

अशीच आणखी एक गोष्ट. आमच्या लहानपणी नाटकाला जाण्याचा प्रघात फार कमी, त्यातून सोवळ्या बायका तर मुळीच जात नसत. आमच्याकडे वर्तमानपत्राचे संपादक म्हणून दर खेळाला दोन पास येत असत. गोपाळराव, त्यांना जाग्रण सोसत नसे त्यामुळे व त्यांना असल्या गोष्टींची आवड नसे व वेळही नसे त्यामुळे नाटकाला गेलेले मला काही आठवत नाही. अगदी फारच कोणी आग्रह केला तर जात; पण मधूनच परतून येत; शेवटपर्यंत कधीच बसत नसत. त्यावेळी हल्लीसारखी शाळा - कॉलेजच्या संमेलनांतून सर्रास नाटके करण्याचा प्रघात होता की नाही ते मला नक्की स्मरत नाही; पण एकदा डेक्कन कॉलेजमध्ये नाटक होते व ते पाहण्यास आमच्या शेजारची सर्व मंडळी जाणार होती. आम्ही तेव्हा तांब्यांच्या वाड्यात राहात होतो. त्यांच्या बहिणीने माझ्या सासूबाईंना 'माई, येता का नाटकाला?' असे विचारले. हेतू हा, की त्या कशाच्या येतात, पण त्यांनी मला पाठवावे. पण त्यांनी 'आम्हाला नाही बाई असली नाटकं न फाटकं पाहणं आवडत. आम्ही नाही कोणी येत.' असे सांगून त्यांना धुडकावले.

दुसऱ्या एका प्रसंगी त्या फिरून बोलावण्यास आल्या व म्हणाल्या, 'माई, तुम्हाला नाटक पाहणं नाही आवडत तर नका येऊ तुम्ही; पण येसूला तरी पाठवून द्याल?' त्यावर त्या उपरोधिकपणे काय म्हणतात, 'सूनबाईला कोणी मना केलं आहे? जाईना तिला आवडत असेल तर! आम्ही कशाला नको म्हणावं?' मी पण या असल्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन नाटकाला गेले. पण हे जाणे माझ्या अंगी लागले नाही. चांगले पाचसात दिवस सासूबाई माझ्याशी धड बोलल्याही नाहीत. धुसफूस आणि घालूनपाडून बोलणी सारखी सुरू असत. अर्थात ही गोष्ट मला फारच लागली; पण करते काय? मुकाट्याने सहन करीत बसले आपली.

अशाच तऱ्हेने लहानमोठ्या प्रसंगांवरून रोज कटकटी होत. घरी आल्यावर सासूबाई 'त्यांना' सर्व गोष्टी सांगत व म्हणत, 'गोपाळा, या बायकोच्यानं तुझा संसार नीट होणार नाही; तू आपलं दुसरं लग्न कर कसा.' बऱ्याच वेळा हे ऐकून घेतल्यावर गोपाळराव एक दिवस चिडून असो अगर खरे असो, पण म्हणाले, 'माई, करतोच मी दुसरं लग्न; पण पुनर्विवाह करीन.' त्या वेळी आपल्याकडे फक्त एकच पुनर्विवाह झालेला होता. 'पुनर्विवाह करीन' म्हणताच अर्थात सासूबाईंच्या तोंडाला चांगले कुलूपच बसले. पुढे त्या शांत झाल्यावर गोपाळराव त्यांना म्हणाले, 'माई, आम्ही गरीब लोक. दोनदोन लग्नं करण्याची आहे का आपली ऐपत? त्यातून एक बायको जिवंत असता निव्वळ एवढ्यातेवढ्या कारणाकरिता दुसरी करणं म्हणजे निव्वळ रानटीपणाच नव्हे का?'

अशा रितीने आमचे दिवस चालले असता एकदा काय झाले, मी गडबडीत माझी नथ नेहमीच्या जागी न ठेवता दुसऱ्याच एका जागी ठेवली, सासूबाईही त्या वेळी म्हणाल्या, 'राहू दे, मग ठेवू जिथल्या तिथं.' पुढे काय झाले, ती नथ पडली त्यांच्या हाती. मी मागाहून घरभर शोधली, पण काही केल्या सापडेना. सासूबाईंना माहीत होती मी नथ ठेवलेली. तेव्हा ती त्यांनीच कदाचित उचलून ठेवली असावी, म्हणून मी त्यांनाही विचारले. त्या म्हणाल्या, 'गोपाळानं ठेवली असेल.' मी भीतभीतच त्यांना विचारले, तेव्हा ते म्हणाले, 'नाही बोवा! मला काय करायची तुझी नथ?' माझ्याशी ते कधीही खोटे बोलणार नाहीत हा माझा विश्वास, म्हणून त्यात काही थट्टा असेल असा मला नुसता संशयही आला नाही व नथ हरवली म्हणून मनाला हुरहूर लागली. शेवटी सासूबाई म्हणाल्या, 'पुरूष फार लबाड असतात, त्यानंच ठेवली असेल; नाहीतर उगीच नथ काय होईल?' पण माझा आपला विश्वास. मला ते काही खोटे

बोलत असतील, थट्टा करीत असतील असे वाटेना. नंतर मग दोन चार दिवसांनी आपोआप नथ माझ्या नेहमीच्या जागेवर आली व मग म्हणतात कसे, 'जिथली वस्तू तिथं ठेवण्याची सवय माणसाला असली, म्हणजे धांदरटपणाचा दोष पदरी येत नाही.'

मला नहाण आल्यावेळची गोष्ट. आपल्या जुन्या पद्धतीप्रमाणे सासूबाईंनी कासाराला बोलावून हिरव्या बांगड्यांचा बारा आण्याचा चुडा भरला. गोपाळरावांनी ते पाहिले, तेव्हा म्हणाले, 'मावशी, आम्ही गरीब माणसं! कशाला हा विनाकारण बारा आण्यांचा खर्च केलास?' अर्थात मग बाकीच्या गोष्टी मखर न् बिखर यांचे तर नावच काढावयास नको. असले प्रकार त्यांना मुळीच आवडत नसल्याने काहीच करण्यात आले नाही.

पुण्याला आम्ही राहात होतो तेव्हा सर्व गोष्टी विकतच्याच. आम्ही गवळ्याचे दूध घेत असू. एक बाई दूध घालावयास येत असे. ती रोज 'भांडं आणा हो' म्हणून ओरडे व मी भांडे आणी व दूध घेई. एक दिवस ती म्हणाली की, 'येसूताई, मी इतके दिवस दूध घालायला येते आहे, पण एक दिवस काही तुमच्या तोंडून मोठ्यानं म्हटलेला शब्द मला ऐकू आला नाही.' गोष्ट तर खरी होती. मला माझ्या मावस सासूबाईंची इतकी भीती वाटे की, मी त्यांच्यादेखत मोठ्याने बोलतसुद्धा नसे. मला शिकविण्यासाठी म्हणून त्या कडकपणा करीत, पण मला मात्र त्यांची कायमची भीती पडली होती ही गोष्ट खरी. कित्येक वेळा त्या एवढ्यातेवढ्यावरून त्रागा करीत व म्हणत, 'गोपाळा, मी जाते परत; तुझ्या बायकोला काही आता माझी गरज नाही; यापुढं इथं मी पाण्याचा घोटही घेणार नाही. मला आपला पोचवून दे कसा!' हे शांतपणे सर्व ऐकून घेत आणि म्हणत, 'मावशी, तिला तुम्ही नको असाल; पण मला हव्यात ना? तुम्ही आपल्या माझ्याकडं पाहा. मी तर तुम्हाला काही बोललो नाही ना? मग नका असा त्रागा करून घेऊ. राहा ना.'

घरी आल्यावर दररोज संध्याकाळी सासूबाई माझा पाढा त्यांच्यापुढे वाचीत, पुढे मला ते सर्व गोष्टी विचारीत आणि मीही पण साध्या खऱ्याखऱ्या गोष्टी सांगून टाकीत असे. अर्थातच माझ्याकडून चुका होत असल्याने सांगताना मला फार वाईट वाटत असे. त्यानंतर ते गंभीरपणाने मला सर्व गोष्टी समजून सांगत असत. 'विसरू नये, चुकू नये, शांतपणानं सर्व कामं करावीत म्हणजे कोणी रागावणार नाही' असे मोठ्या कळकळीने सांगत. मला ते कधीही टाकून बोललेले आठवत नाही आणि अशा या सर्व प्रसंगांतून गेल्यामुळे मला आता निश्चितपणाने वाटते, की एवढ्या लहान वयात लग्ने होणेच मुळी चांगले नाही.

आमची गरिबीची राहणी आवडली नाही म्हणून म्हणा किंवा आणखी काही कारणाने म्हणा, नऊदहा महिन्यांनी माझ्या मावस सासूबाई परत जाण्यास निघाल्या. मला जरी त्यांनी खूप छळले होते, तरी त्या जाताना मात्र मला मनापासून वाईट वाटले. मी एकसारखी रडत होते; पण त्यांनी एका शब्दानेही मला 'उगी' म्हटले नाही की माझे सांत्वन केले नाही. अशा रितीने माझ्या पुण्यातील संसारयात्रेला सुरुवात झाली.

गोपाळरावांची स्वत:ची मते काहीही असली, तरी माई असेपर्यंत त्यांनी स्वयंपाकघरात शिरून स्वत:च्या हाताने पाणी घेऊन प्यालेले मला आठवत नाही. नेहमी दारात उभे राहून म्हणत, 'माई, मला प्यायला पाणी पाहिजे,' त्यावर माई म्हणत, 'असं काय अगदी सासुरवासणीसारखं करतोस रे? पाणी प्यायला सुद्धा विचारायला का हवं? आत यावं, घ्यावं आणि प्यावं.' तेव्हा ते म्हणत, 'तुमचं सोवळं ओवळं काय तरी बिघडायचं, त्यापेक्षा आपलं बाहेरूनच मागितलेलं काय वाईट?' इतकी ते वडील माणसांचा आदर राखण्याबद्दल व त्यांची मने न दुखविण्याबद्दल काळजी घेत. नंतर पुढे पाचसहा वर्षांनी माई खूपच आजारी पडल्या. तेव्हा औषधोपचारासाठी पुण्याला आमच्या येथेच राहिल्या होत्या. त्या वेळी मी मोठी झालेली होते. माईंचे मी इतकेसुद्धा कमी पडू दिले नाही. त्यांनी जाताना यांच्यापाशी माझी तोंडभर स्तुती केली; त्या वेळी मला मोठा अभिमान वाटला. ज्या माईंनी माझी एकसारखी निंदाच केली होती व मला अगदी टाकाऊ ठरविले होते, त्यांच्याच तोंडून माझ्या स्तुतीचे शब्द निघाल्याचे ऐकून मला मूठभर मांस चढल्यासारखे वाटले असल्यास नवल काय?

पुण्याला आम्ही सर्व मंडळी म्हणजे टिळक, नामजोशी, आपटे वगैरे सर्व अगदी जवळजवळ राहात होतो. पुढे काही

दिवसांनी टिळक व आम्ही एकाच वाड्यात राहावयास आलो. नामजोशींचा व आमच्या इथला बराच स्नेह. तसाच त्यांच्या पत्नीचा व  माझा. मी कधी दुपारच्या वेळेला त्यांच्याकडे जाऊन गोष्टी करीत बसावे, कधी त्यांनी आमच्याकडे यावे, असे चाले. शाळा, केसरी - मराठा वर्तमानपत्रे व त्या वेळी उत्पन्न झालेले कोल्हापूर प्रकरण यांमुळे घरातल्या सर्व पुरुषमंडळींचा वेळ मोठ्या गडबडीत जाई. त्यांना घरी लक्ष देण्यास मुळी वेळच होत नसे. नामजोशी शाळेसाठी हिंडत. टिळकांना कोल्हापूर प्रकरणामुळे वरचेवर बाहेर जावे - यावे लागे. त्यामुळे गोपाळरावांच्यावर दोन वर्तमानपत्रांचे व शाळेचे भरपूर काम पडे. लहानपणापासून प्रकृती अशक्त, त्यातून आईच्या वरदानाने मिळालेला दमा; त्यामुळे सकाळचे एकदोन तास खोकला चांगलाच चाळवे आणि त्यातच दिवसभर पुन्हा सारखी दगदग. या सर्वांतूनही वेळ काढून मला शिकविण्याचा प्रयत्न करून त्यांनी पाहिला. पण शेवटी 'असल्या र, ट, फ करणाऱ्या विद्यार्थ्याला शिकविण्यात कालापव्य करण्यापेक्षा एखाद्या हुशार विद्यार्थ्याला शिकवीन, तर त्याचं चीज तरी होईल' असे म्हणून स्वारीने मला शिकविण्याचा नाद सोडला. पुढे ते मला निरनिराळी पुस्तके आणून देत आणि ती माझ्याकडून वाचून घेत. वह्याही पण लिहून घेऊन तपासून देत.

आम्ही, टिळक वगैरे जरी का वाड्यात राहात होतो, तरी आमची पुरुषमंडळींशी बोलणी झालेली मला कधीच आठवत नाहीत. अर्थातच कोणी तिऱ्हाईत माणसे घरी आली व 'घरी आहेत का' म्हणून विचारल्यास लाजून घरात धूम पळून जाण्यासारखे प्रकार कोणासच आवडत नसत. विशेषत: मी सुधारकाची पत्नी म्हणून मला या असल्या बाबतीत आग्रहाचे सांगणे असे की, 'विचारल्या प्रश्नांची सरळ उत्तरे देण्यात लाज ती कसली? आपण असल्या या वेडगळ कल्पना सोडून दिल्या पाहिजेत.' इ.इ. यामुळे आमच्या सर्व मंडळीत घरात आहेत, नाहीत किंवा विचारलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे देणारी मी एकटीच होते म्हटले तरी चालेल.

सुधारक हा शब्द त्या वेळी निंदाव्यंजक ठरला होता व अजूनही काहीकाही लोकांच्या मताने तो तसाच आहे म्हणा. स्त्री-स्वातंत्र्याच्या किंवा स्त्रीदाक्षिण्याच्या नावाखाली स्त्रियांना डोक्यावर घेऊन नाचणारे ते सुधारक, असा गैरसमज पूर्वीपासून पसरलेला आहे. पण त्याला माझ्या दृष्टीने काहीच आधार दिसत नाही. याबाबत आमच्या घरी चालणारे वादविवाद मी बऱ्याच वेळा मन लावून ऐकले आहेत. त्यात ते नेहमी म्हणत की, 'आम्ही बैलासारखे बाहेर मरमर राबतो, तर मग स्त्रियांनीच नुसतं बसून का खावं? त्यांनी नकोत का काही काम करायला? त्यांनी कामं ही केलीच पाहिजेत. कोणी बाहेरची कामं पाहील, कोणी घरातील, हा श्रमविभाग झाला. ही काही गुलामगिरी नव्हे.' अर्थात समाजातल्या रूढींमुळे त्यांचे मन कळवळले. निव्वळ स्त्रियांवरच अन्याय करणाऱ्या अनेक रूढींचा त्यांना नुसता संताप येई व तो त्यांच्या लेखात व भाषणात व्यक्त होई. पण यावरून 'सुधारक' म्हणजे सबगोलंकारी, स्त्रीपूजक व सुधारणा म्हणजे बेताल स्त्रीपूजा अशा तऱ्हेची लोकांनी चालविलेली तर्कटे ऐकून त्यांना आपल्या हेतूंचा विपर्यास केल्याबद्दल फारच दु:ख वाटत असे आणि त्यांना ते एखाद्या अंतर्गत व्यथेप्रमाणे सारखे जाणवत असे.

अशा रितीने आमचे वर्ष दीड वर्ष हाहा म्हणत निघून गेले. पुरुषमंडळींना बाहेरच्या नाना कटकटी आणि त्यांचा ताप सहन करावा लागे; पण आम्हाला घरात काय त्याचे? सर्व काही सुरळीत आणि आनंदात चालले होते. शेवटी एकदाचा कोल्हापूर प्रकरणाचा निकाल लागला. त्यात त्यांना आणि टिळकांना चारचार महिन्यांची शिक्षा झाली. मुंबईजवळ डोंगरीच्या तुरुंगात यांना ठेवले होते. जाताना त्यांनी कितीकिती प्रेमाने माझी समजूत घातली. त्यांचे शब्द मला अजूनही आठवतात. ते म्हणाले, 'इथले ही भोवतालची माणसं हीच खरी आप्त आहेत, रक्ताच्या संबंधाचे लोक तर आप्त होतातच; पण एका ध्येयानं प्रेरित झालेले, एका विचारानं बांधले गेलेले तेच खरे आप्त; खरे सोयरेधायरे तेच होत.' आणखी कितीतरी गोष्टी त्यांनी मला सांगितल्यानंतर मला माहेरचे बोलवणे आले. गोपाळरावांचे मामा मला म्हणत, 'चल, शिक्षा संपेपर्यंत राहा माझ्याकडंच.' पण गोपाळरावांचे शब्द माझ्या पुरते ध्यानात असल्याने मी कुठेही आणि कोणाकडेही गेले नाही. या शब्दांच्या पाठीमागची वृत्ती मला त्या वेळी इतकीशी

उमगली नव्हती. पण वाढत्या वयाने, अनुभवाने व सहवासाने अंत:करणांच्या पूर्ण ओळखी झाल्या; तेव्हा मला कळून चुकले की, ती वृत्ती म्हणजे आपल्यासाठी दुसऱ्यांना काडीमात्र कष्ट न देण्याची वृत्ती होय.

ते सुटून येईपर्यंत, शाळेत त्यांच्या जागेवर म्हणून एक शिक्षक नेमले होते. ते आमच्याकडेच राहात. एकदा कोणी एक गृहस्थ डोंगरीच्या तुरुंगातून त्यांची भेट घेऊन पुण्याला आमच्याकडे आले; त्यांनी खडतर परिस्थिती आणि तुरुंगातील हाल याची हकीकत शेजारी त्या मास्तरना सांगितली. मध्ये फक्त एक भिंतच आड असल्याने मला ते सर्व भाषण ऐकू आले. अर्थात् माझा त्यात काही संबंध नसता तर कदाचित् मला ते ऐकूही गेले नसते किंवा मीही पण ते इतक्या कसोशीने ऐकले नसते. परंतु रात्रंदिवस मला त्यांच्या प्रकृतीचा व इतर गोष्टींचा ध्यासच लागल्यामुळे सर्व नीतिनियम झुगारून देऊन अगदी भिंतीला कान लावून सर्व भाषण लक्षपूर्वक ऐकण्याचा मोह मला टाळता आला नाही. मनाला वाईट वाटते राहूनराहून. दु:खाने भारावलेले मन हलके करण्यासाठी मी त्या सर्व गोष्टी नामजोशींच्या पत्नीला सांगितल्या. तिने सर्व आपल्या यजमानांच्या कानांवर घालून भयभीतपणे विचारले, ''तुरुंग म्हणजे खराच इतका भयंकर असतो का हो?'' ही गोष्ट तुरुंगात गोपाळरावांना समजली. तेव्हा ते म्हणाले की, ''तिथं कशाला सांगायला गेला बोवा या सर्व गोष्टी?'' त्यांना आपल्याबद्दल दुसऱ्यांना दु:ख झालेले अगदी आवडत नसे. पण आपल्या पत्नीला दु:ख होऊ नये म्हणून जपणाऱ्या आगरकरांनी शेवटी तुरुंगवासाचे भीषण स्वरूप जनतेपुढे मांडलंच व वरून सभ्य आणि शिष्ट दिसणाऱ्या इंग्रजीनीतीचे काळेकभिन्न अंत:करण खुले करून दाखविले. तुरुंगात असतानाच त्यांनी विकारविलसित नाटक लिहिले. तेथून ते काही लेखही पाठवीत.

शिक्षेची मुदत संपण्याची आम्ही अगदी चातकासारखी वाट पाहात होतो. एकदाची मुदत संपली. टिळक - आगरकर दोघांचेही लोकांनी मोठे स्वागत केले. तुरुंगातून सुटल्यावर प्रायश्चिताचा प्रश्न निर्माण झाला होता; पण लोकप्रीतीच्या गंगेत तो वाहून गेला.

गोपाळराव शिकत असता पुण्याला एकदा कॉलरा झाला होता. त्यांचे मामा रामभाऊ भागवत त्याचवेळी काही कामानिमित्त पुण्याला येणार होते. तेव्हा त्यांनी गोपाळरावांना पत्र लिहून कळविले की, तिकडे वसतिगृहातच उतरावयास येतो.' गोपाळरावांनी गावात जाऊन मुकटा, पळी, ताम्हन वगैरे सर्व सामान जमवून आणले व मामा आल्यानंतर त्यांच्याबरोबरीनेच वसतिगृहात सोवळे वगैरे नेसून ते जेवले.

दुसरी अशीच गोष्ट ते नेहमी सांगत. ती म्हणजे अकोल्याला जाताना एकदा त्यांचे मामा व ते नाशिकला आले. मामा म्हणाले, 'चल गोपाळा, गंगेवर जाऊन संध्या करू.' नंतर ठरवल्याप्रमाणे गोपाळराव व मामा संध्या करू लागले. मामांची संध्या आटोपली तरी ही स्वारी पाण्यात उभी! शेवटी मामांनी हाक मारली तेव्हा त्यांची संध्या आटोपली. या सर्व गोष्टी ते मला वरचेवर सांगत आणि म्हणत, 'थोडक्यासाठी या वडील माणसांना का दुखवा? आपल्याला त्यांचा उपयोगही नाही व त्यांच्या तंत्रानं थोडंसं घेतल्यावर अडथळाही नाही, असे हे लोक.'

घरातसुद्धा माझ्या मावस सासूबाई (माई) होत्या तोपर्यंत दोन्ही वेळेचा स्वयंपाक सोवळ्याने होत असे आणि गोपाळरावही पण सोवळे नेसूनच जेवावयास बसत असत. पुढेपुढे मात्र जेव्हा माझे सख्खे सासूसासरे वर्षातून महिना दोन महिने पुण्यास येत, तेव्हाच फक्त सोवळे नेसण्याचा प्रसंग! नाहीतर आपले धूतवस्त्र. माझ्या सासूसासऱ्यांना पुण्याची हवा मानवत नसल्याने बहुतेक टेंबूला किंवा कऱ्हाडला सासूबाईंच्या माहेरी ते राहात. गोपाळराव दरमहा त्यांना सातआठ रुपये पाठवीत असत. लोक त्यावर नाना तऱ्हेच्या कंड्या उठवीत. म्हणत 'सुशिक्षित व सुधारक मुलगा; राजाराणी राहिले आहेत चैनीत पुण्याला. म्हाताऱ्या आईबापांची आता कशाला होईल आठवण!' इत्यादी एक ना अनेक! पण वस्तुस्थिती मात्र मी वर सांगितली तशीच होती.

एकदा सासूबाई पुण्याला होत्या; त्याच वेळी टेंबूचे दुसरे कोणीएक गृहस्थ पुण्याला राहात होते. सासूबाई त्यांच्याकडे समाचाराला गेल्या असता त्या गृहस्थाच्या पत्नीने माझी चांगली तोंडभर स्तुती केली व ती म्हणाली, ''आता मुलीला चारदोन दागिने करवा व मगच जा परत.''

माझ्या सासूबाई जुन्या वळणाच्या व भोळ्या. गोपाळराव त्या वेळी काही कामानिमित्त मुंबईला गेले होते, ते पहाटे परत आले. येताच चारदोन गोष्टी होतात न होतात, तोच सासूबाईंनी कालची हकीकत सांगून सुनेला चारदोन दागिने करण्याची मागणी केली. गोपाळराव लगेच म्हणाले, 'अक्का! - ते आपल्या आईला अक्का म्हणत - तुला माहीतच आहे, आम्ही गरीब माणसं आहोत आणि मला दागिन्यांचं नाव काढलं, की अतिशय चीड येते ती! त्यातून जिच्यासाठी तू वकिली करीत आहे, ती तर कधी एकदाही दागिन्यांचं नाव काढीत नाही' अर्थात मला काही दागिन्यांची आवड नव्हती असे नाही. पण जी गोष्ट इकडे तत्त्वत: आवडत नाही, त्या गोष्टीबद्दल शब्द टाकला तर त्याला मुळीच किंमत मिळणार नाही, हे मी जाणून होते. त्यामुळे मला खूपखूप वाटूनसुद्धा दागिन्यांची भाषा आतापर्यंत मी काढली नव्हती व आताचा हा प्रसंग पहिलाच असल्याने मला होय म्हणण्याचा धीर झाला नाही. स्त्री असूनही दागिन्यांसंबंधी उदासीन राहण्याचा मला सर्व जन्मभर प्रसंग आला. पण त्याबद्दल मला काही फारसे वाटले नाही.

पुण्याला आमच्याकडे नेहमी अनेक लोक येत आणि गोपाळरावांशी त्यांचे कडाक्याचे वादविवाद चालत. मला त्या वेळी त्यातील तितकेसे काही कळत नसे; पण त्यांचे एक वाक्य मात्र अद्यापि माझ्या पूर्ण लक्षात आहे. ते नेहमी म्हणत, 'आम्ही कसले सुधारक? आम्ही आपले बोलके सुधारक!' वादविवादात इतर अनेक सामाजिक व धार्मिक समजुतींवर व रूढींवर हे टीका करीत, त्यांना त्या सपशेल मूर्खपणाच्या वाटत. त्यातल्या त्यात स्त्रियांना सोवळे करण्याच्या रूढीचा त्यांना अत्यंत संताप येई. ते म्हणत की, 'जर जगलोवाचलो तर या रूढीचा नायनाट करीनच करीन. ही तांबडी लुगडी अजिबात नाहीशी करीन.' व आज खरोखरच तांबडी लुगडी क्वचितच दृष्टीला पडतात. मला ते नेहमी सांगत की, 'निदान तू तरी या दुष्ट रूढीच्या आहारी मुळीच जाऊ नकोस' अर्थात् मला ते काय म्हणतात याची नीटशी कल्पना त्या वेळी येत नसे. पण पुढेपुढे मला त्यांचे म्हणणे कळू लागले. मला ते करीत असलेली ही सूचना ऐकून पोटात धस्स होई.

माझ्या सासूबाई नेहमी आजारीच असत; पण या खेपेस त्यांचा आजार एकदम वाढला. त्यांना जलोदर झाला. यांना तिकडे निघून येण्याबद्दल पत्रावर पत्रे येत; पण आज जाऊ, उद्या जाऊ करताकरता आठपंधरा दिवस निघून गेले. हल्लीसारखी उठल्यासुटल्या तारा करण्याची पद्धत त्या वेळी नव्हती. 'पत्र हीच तार समजून निघून यावे' असे निर्वाणीचे पत्र आले; तेव्हा हे ताबडतोब निघाले. मी भीतभीतच 'बरोबर येऊ का?' म्हणून विचारले, पण म्हणाले की, 'मी पुढं जातो; कसं काय आहे पाहतो व जरूर वाटल्यास मागाहून तुला बोलवून घेतो.' पण विधिघटना निराळीच होती. हे पोहचण्यापूर्वीच तास दीड तास सासूबाईंचा अंत झाला होता. रीतसर सर्व गोष्टी झाल्या. आई वारली की क्षौर करण्याची चाल. मामांनी विचारले, 'गोपाळराव, करता ना क्षौर?' गोपाळराव म्हणाले, 'मामा मी काही क्षौर करणार नाही. मिशा काढल्यानं चेहरा विद्रूप दिसेल, म्हणून मी असं म्हणत नाही. मिशा वाटेल तितक्या वेळा काढून टाकण्यास मी तयार आहे. पण या प्रकाराला काही अर्थ आहे का? जी गोष्ट अगदी मूर्खपणाची असल्याबद्दल माझी खात्री झाली आहे, ती मी कशी करू? रात्रंदिवस विचार करून पटलेल्या गोष्टी मी खोट्या कशा म्हणू?' झाले! घरातील सर्वच मंडळी नाराज झाली. आता तोंडातोंडी वाढवून वडील माणसांशी हुज्जत घालीत बसल्यास कळत न कळत त्यांचा उपमर्द करणारा एखादा शब्द निघून जायचा; म्हणून सर्वांचा निरोप घेऊन स्वारी एकदम पुण्याला परत येण्यास निघाली. 'तिसऱ्या दिवसापर्यंत राहून मग जा' असे मंडळी म्हणाली; त्यावर 'कशाला?' असे सांगून ते लगेच पुण्याला आले.

तिथे घडलेल्या सर्व गोष्टी मला सांगितल्या. मला स्वाभाविकच वाईट वाटले, पण काही बोलले नाही. लोक आम्ही सुतक पाळतो की नाही, श्राद्ध करतो की नाही, काय कमजास्त आहे, काय करतात, काय नाही, हे पाहण्यासाठी अगदी डोळे लावून बसले होते. शेवटी बारावा, प्रीतिश्राद्धाचा दिवस. गोपाळराव म्हणाले, 'आज घरात दोन पायलींचा भात करा.' पुण्यात त्या वेळी चांगले शंभरसव्वाशे माधुकरी होते. 'त्यांना एकेक मूद भात व एकेक पैसा दक्षिणा देऊ, म्हणजे झाले.' अशा रितीने श्राद्धाचा प्रसंग नवीन पद्धतीने पार पडला. मला जरी या

सर्व गोष्टी नवीन होत्या, तरी त्या जुन्यांपेक्षा बऱ्या वाटत आणि मनालाही पण पटत. आम्ही सुतक वगैरे पाळीत असू.

यानंतर पुढे दोनतीन महिन्यांनीच सर्वत्र खळबळ उडवून देणारी संमतिवयाच्या बिलाची चर्चा सुरू झाली. वादविवादाला ऊत आला.

आपल्या स्वत:च्या 'सुधारक' पत्रात वारंवार लेख लिहून ते या बिलाचा पुरस्कार करीत. या वेळी खरा वादविवाद टिळक व गोपाळराव यांमध्ये सुरू झाला. एकाच ध्येयाने काही काळ एकत्र आलेले हे दोन मित्र एकमेकांचे वाभाडे काढण्यात गुंग झाले. याविषयी घरी बोलताना ते मजपाशी नेहमी म्हणत, 'आज जर पेशवाई असती, तर मला माझ्या मतांबद्दल जिवंत जाळलं असतं अगर फाशी दिलं असतं! याचा अर्थ असा मात्र नव्हे, की मी पारतंत्र्य पसंत करतो! सध्याच्या परकीय अमलाखाली जगण्यापेक्षा स्वराज्यात माझ्या मतांसाठी मला एकदा सोडून शंभरदा फाशीवर लटकण्यात धन्यता वाटली असती.'

त्याच्या 'सुधारकां'तील लेखांचा फार जलद प्रसार झाला व त्यांचे अनुकूल - प्रतिकूल दोन्हीही परिणाम लवकरच दिसू लागले. अनेक लोक आचकटविचकट पत्रे पाठवीत. वर्तमानपत्रेही हिडीस टीका करण्यात व शिवराळपणाचे प्रदर्शन करण्यात धन्यता मानीत. शेवटी या सर्व त्रासाला कंटाळून त्यांनी केसरी, मराठा आणि टाईम्स् यांखेरीज पत्रेच वाचण्याचे बंद करून टाकले व साधारण अनोळखी असे पत्र दिसताच त्याला ते खुशाल केराची टोपली दाखवीत.

एकदा काय झाले, तिन्हीसांजच्या वेळी मी, टिळकांची पत्नी आणि शेजारच्या तीनचार बायका एकत्र बसलो होतो गोष्टी बोलत. त्यांच्या लेखांमुळे खवळून गेलेल्या लोकमनाची मला नेहमी भीती वाटे. घरातून बाहेर गेले की, ते परत येईपर्यंत जीव कसा अगदी टांगल्यासारखा होई. त्या दिवशी घरी परत आले होते. इतक्यात वीस एकवीस वर्षांचा तरुण मुलगा एक भला मोठा लखोटा घेऊन आला व त्याने 'आगरकर आहेत का?' म्हणून चौकशी केली. मी ते बाहेर गेले असल्याचे सांगितले. त्याने तो लखोटा 'त्यांना आल्यावर द्या.' असे सांगून माझ्या हाती दिला व तो निघून गेला. ते येऊन हातपाय वगैरे धुऊन माडीवर गेल्यावर मी तो लखोटा त्यांच्याजवळ दिला. तेव्हा 'काय बुवा हे प्रकरण! यात विंचूबिंचू तर नाही ना? हो. आता तेवढंच बाकी राहिलं आहे!' असे म्हणून त्यांनी तो लखोटा फोडला तो त्यातून काही नोटा निघाल्या. पत्र वाचून पाहतात तो सुधारकाचा प्रसार व्हावा व तो फुकट वाटता यावा म्हणून त्याला अल्पस्वल्प मदत दिल्याचा मजकूर होता. अशा तऱ्हेने सुधारकातील लेखांचा तरुण पिढीवर चांगलाच परिणाम होत होता, याचा दाखला मिळाला. मला ते नेहमी सुधारकातील लेख वाचून दाखवीत आणि समजावून सांगत.

होताहोता शिमगी पौर्णिमेचा सण जवळ आला. आमच्या घरी याच सुमारास कऱ्हाडला कोणाचेसे लग्न निघाले; त्यासाठी आम्ही सर्वजण तिकडे गेलो असता इकडे पुण्याला शिमग्याच्या दिवशी त्यांची प्रेतयात्रा काढली. त्या वेळी हा हीन आणि क्रूर अमानुष प्रकार पाहावयास आम्ही कोणीच पुण्यात नव्हतो. पण आमच्या घरापुढे, शाळेपुढे आणि सुधारक ऑफीसपुढे मिरवणूक थांबवून नाना तऱ्हेने बीभत्स बोलून, आरडूनओरडून सरतेशेवटी ते सर्व लटांबर होळीत नेऊन जाळण्यात आले. त्यात चहाबिस्किटे, पाव वगैरे सामानही होते म्हणे. हा सर्व प्रकार व उपद्व्याप एका विलायतेला जाऊन डॉक्टरीण होऊन आलेल्या विदुर्षीच्या पतिराजांनी केल्याची दाट वदंता होती.

पुण्याला अशा काहुरात आम्ही राहात असता आमच्या गावचे काही लोक पुण्यास येत जात व स्वाभाविकच एकाच गावचे म्हणून आमच्याही घरी येऊन जात. एकदा असेच कोणी एक गृहस्थ आमच्या घरी आले होते. समोरच एक फडताळ होते. त्यात शाईच्या चांगल्या आठदहा रिकाम्या शिशा पडल्या होत्या. त्या पाहून लगेच त्यांनी गावाकडे जाऊन डांगोरा पिटला की, 'आगरकर दारू पितात. मी स्वत: डोळ्यांनी त्यांच्या घरात दारूच्या रिकाम्या झालेल्या डझनभर बाटल्या पाहिल्या आहेत.' हीच काय, पण अशा कित्येक कंड्या लोक वरचेवर पिकवीत. खाण्यापिण्याच्या बाबत लोकांच्यापेक्षा जास्त खात्रीलायक माहिती मी खास देऊ शकेन. त्यांनी आपली आई वारल्यापासून तर उभ्या जन्मात परान्न घेतले नाही.

प्रकृती वाईट असल्याने त्यांनी तेव्हापासून तो अगदी नियमच केला होता. दम्यासाठी त्यांचे कित्येक मित्र त्यांना मांसाहार करण्याचा आग्रह करीत असत व त्यात त्यांना निषिद्ध असेही पण काही वाटत नसे; पण स्वत: मात्र त्यांनी मांसाहार कधीही केलेला नाही.

लग्न झाल्यापासून पाचसहा वर्षे मी माहेरीच असल्यामुळे व माहेरची सर्वच माणसे जुन्या वळणाची असल्याने मंगळागौरी व व्रतवैकल्ये माझ्याकडून यथासांगपणे करून घेण्यात आली. त्यात गोपाळरावांच्या आवडीनिवडीचा प्रश्नच आला नाही. पुण्याला राहात असताना जोपर्यंत माई - माझ्या सासूबाई - होत्या तोपर्यंत त्यांच्याच देखरेखीखाली मी असल्याने काही प्रश्नच नव्हता. सामान्यत: त्यांचा सर्व दिवस काही ना काही कामात जात असे; त्यामुळे त्यांना घरातल्या असल्या किरकोळ भागनडीत लक्ष घालण्यास सवडच होत नसे. त्यातून गोपाळराव घराकडे कधीतरी का होईना, पण लक्ष देत. टिळकांचा आपला साराच खाक्या निराळा. ते घराकडे अजिबातच दुर्लक्ष करीत.

वटसावित्री, हरितालिका अशांसारखी व्रते आम्ही करीत असू. त्यांविरुद्ध ते बोलल्याचे मला कधीही स्मरत नाही. मात्र व्रतवैकल्यांनी व सोवळ्याओवळ्याच्या फाजील कल्पनांनी पोराबाळांची आबाळ केलेली त्यांना मुळीच सहन होत नसे. कोणतेही एकादे व्रत केल्यावर ते मला विचारीत, 'झालं! तुला काय समजलं यात सांग पाहू!' मला काहीच उत्तर देता येत नसे. मग या गोष्टीत कसा अर्थ नाही हे ते मला समजावून देत. अशा रीतीने माझ्या मनाची तयारी करण्याचे काम सतत चालू होते. अर्थात देवदेर्शनाला जाणे, घरी कुळाचार, कुलधर्म पाळणे वगैरे बाबतीत ते फारसे लक्ष घालीत नसत. मीही पण त्यांना न पटणाऱ्या, न आवडणाऱ्या गोष्टी मुळीच करीत नसे. कारण एक तर प्रकृती अशक्त असे. राहूनराहून मनाला वाटे, की जर काही कमीजास्त झाले, बरेवाईट झाले; तर पुढे जन्मभर पस्तावत बसावे लागेल की, 'होते तोवर काही मी त्यांच्या मनाप्रमाणे वागले नाही, त्यांचं सांगणं ऐकलं नाही' म्हणून. तेव्हा निदान मनाला असली टोचणी तरी नको; म्हणून मी जाणूनबुजून त्यांच्या मनाविरुद्ध कधीकधी सुद्धा गेले नाही.

सोवळेओवळे, सोयरसुतक आणि इतर सामाजिक व धार्मिक रूढींतील स्वच्छताविषयक किंवा आरोग्यविषयक तत्त्वांबद्दल त्यांनी कधीही अनादर दाखविला नाही. उलट आपल्या आचरणात त्यांनी त्यांचा पुरस्कारच केला. पण काहीकाही कल्पना मात्र त्यांना मूर्खपणाच्या वाटत व त्यांची टवाळी ते जरूर करत. उदाहरणार्थ, डाळीचे पीठ पाण्यात कालविले की ते खरकटे झाले व डाळ भिजवून वाटली तर ते मात्र तेवढे खरकटे होत नाही. त्यांच्या दृष्टीने दोन्ही गोष्टी सारख्याच. एक खरकटी तरी, नाहीतर दोन्ही साध्याच. अशा आणखीही कित्येक गोष्टी त्यांनी आपल्या निबंधांत दाखविल्या आहेत व त्या रूढींचा फोलपणा सिद्ध केला आहे.

आई वारल्यापासून नियम म्हणून म्हणा अगर सोसत नाही म्हणून म्हणा, गोपाळराव परान्न घेत नसत, हे मी मागे सांगितलेच आहे. त्यावरूनच एक गोष्ट आठवली ती इथे सांगून टाकते. टिळक वादावाद होऊन संस्थेतून निघाल्यापासून यांची व त्यांची सहसा भाषणे होत नसत; सडकेने भेटले तर एकमेकांस नमस्कार चमत्कारसुद्धा करीत नसत. लोकांनी यावर नाहीनाही त्या कंड्या उठविल्या होत्या. याच सुमारास झाली काय गंमत, टिळकांच्या मुलाची मुंज निघाली. टिळक आमच्या घरी आले व म्हणाले, 'गोपाळराव, तुमचेआमचे मतभेद आहेत, असू देत; पण माझ्या मुलाच्या मुंजीला मात्र तुम्ही आलंच पाहिजे. त्याचं आणि तुमचं काहीच वाकडं नाही.' तेव्हा ते म्हणाले, 'मी मुंजीला येणारच आहे; पण तुम्हाला माहीत आहे, माझी प्रकृती ठीक नसते, शिवाय आई वारल्यापासून मी कोणाकडं जेवावयासही जात नाही, मी परान्न सोडले आहे', त्यावर टिळक हसतहसत म्हणाले, 'एक पावभर तांदूळ द्या म्हणजे झालं; जातो घेऊन! मग कसलं आलं आहे परान्न?'

दोघांची भांडणे जशी तसा स्नेहही. एकदा काय झाले, टिळकांनी पंचहौद मिशन येथे काही जिन्नस खाल्ले. खाण्यापिण्याने धर्म बाटतो अशी त्यांची विचारसरणी नव्हतीच मुळी. यांनीही तेथे काही खाल्ले असते, परंतु परान्न वर्ज्यच असल्यामुळे ते या प्रकरणात सापडले नाहीत. पुढे सुधारकात यांनी टिळकांनी काही खाल्ल्याचे प्रसिद्ध केले;

पण टिळकांनी ते नाकारले. त्यामुळे अलबत्यागलबत्यांना जोर येऊन दोन्ही बाजूंची बाचाबाची सुरू झाली. होताहोता प्रकरण कोर्टात जाणार असा रंग दिसू लागला. त्या वेळी न्या.माधव गोविंद रानडे आमच्या घरी आले व म्हणाले, 'हे पाहा गोपाळराव, टिळक आहेत हेकेखोर आणि हट्टी. ते एकदा हट्टाला पेटले म्हणजे कुणाचंही ऐकणार नाहीत. तेव्हा तुमचं म्हणणं जरी खरं असलं तरी त्यापासून तत्त्वत: काहीच फायदा नाही; लोकांना मात्र दोन मित्र कसे भांडतात ही मजा पाहावयास मिळणार; तेव्हा तुम्ही हा विषय बंदच करून टाकावात कसा!' तेव्हा गोपाळराव म्हणाले, 'तुमच्यासाठी म्हणून मी ही गोष्ट कबूल करतो. नाहीतर टिळक तेथे गेले, जेवले हे आम्ही व आमच्या वाड्यातल्या सर्व मंडळींनी पाहिलं आहे, इतकंच नव्हे तर या पुण्यातल्या कित्येक लोकांनीही ही गोष्ट पाहिली आहे आणि आता नाही म्हणतात त्याला काय इलाज?' आणि यानंतर हा विषय बंद पडला आणि दोघांच्याही कोर्टकचेऱ्या चुकल्या. अशा अशा तऱ्हेने वडील माणसांपुढे नमते घेण्याची त्यांची जी लहानपणापासूनची सवय, तीमुळे हे भांडण मिटले.

खोटी नावे दिली म्हणून अब्रूनुकसानीची खटला झाला. शिक्षा झाल्या. चहा प्यायलेल्यांनी प्रायश्चित्त घ्यावे की नाही, कोणते प्रायश्चित्त घ्यावे यावर विचार करण्यासाठी शंकराचार्यांनी कमीशन पुण्याला पाठविले. वर्ष दीड वर्ष हे प्रकरण चालले होते. टिळकांना सर्वसामान्यांच्या भावना दुखवायच्या नव्हत्या. त्यांनी जाहीर केले की, काशीला जाऊन त्यांनी शास्त्रोक्त प्रायश्चित्त घेतले. त्यांनी लोकांचे समाधान झाले नाही, म्हणून पुण्यामध्येही त्यांनी प्रायश्चित्त घेतले.

प्रथमत: गद्र्यांच्या वाड्यात न्यू इंग्लिश स्कूल सुरू झाले. ते कै.वा.विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सुरू केले. नंतर त्यांना पूर्वीच वचन दिल्याप्रमाणे डेक्कन कॉलेजमध्ये शंभर रुपयांवर बोलावीत असताही एम.ए. झाल्यावर आगरकर व एल.एल.बी. झाल्यावर टिळक येऊन मिळाले. आपटे शाळा पाहायला म्हणून गेले आणि, बेळगावला ते दुसरे दिवशीच दीडशे रुपयांच्या नोकरीवर जाणार होते ते रहित करून, शाळेलाच मिळाले. त्यांची पत्नी आम्ही सर्व बायकाबायका गोष्टीत बोलत असू त्या वेळी ही हकिकत सांगे. गोपाळराव, आपटे, टिळक, चिपळूणकर, नामजोशी इत्यादी सातआठ मंडळी शाळेचे आजन्म सेवक म्हणून होती. त्यांना प्रथम तीस रुपये पगार मिळे; पण नंतर प्रत्येकाचा तीन हजारांचा विमा उतरावा असे ठरले. व ज्या दिवशी तो उतरला त्या दिवशी मला त्यांनी येऊन सांगितले की, 'आज मी तुझ्या ऋणातून थोडाबहुत तरी मोकळा झालो आहे.' शाळा सुरू झाल्यानंतर वर्ष सव्वा वर्षातच विष्णूशास्त्री चिपळूणकर वारले. टिळकांनी शाळेचा संबंध सोडला, तेव्हा यांनाही पंढरपुरास बोलवीत होते. लोकांच्या टीकेने त्रासून एखादे वेळेस हे म्हणत, 'जर माझ्यामुळं टिळक जात असतील, तर मलाही लोक बोलवीत आहेत, मीच जातो पंढरपूरला. टिळकांनी आपलं राहावं व शाळा चालवावी.' अर्थात् पुढे हे वाद शांत झाले.

शाळेला ग्रँट मिळाली व पगार पंचाहत्तर रुपये घ्यावा असे ठरले. पुढे न्यू इंग्लिश स्कूल नानांच्या वाड्यात गेले आणि गद्र्यांच्या वाड्यात फर्ग्युसन कॉलेज सुरू करण्यात आले. डेक्कन कॉलेजात सेल्बी म्हणून कोणी इंग्लिश प्रोफेसर त्या वेळी होते. गोपाळराव नेहमी त्यांचे एक वाक्य सांगत. ते म्हणत, 'घरी जेव्हा दोन तास वाचावं; तेव्हा कॉलेजमधे एक तास शिकवावं' आणि म्हणून नेहमी हे आपल्या वाचनलेखन व्यवसायात गढून गेलेले असत. ते इतके, की त्यांना आपल्या भोवतालच्या परिस्थितीचाही अगदी विसर पडून जाई.

तांब्यांच्या वाड्यात आम्ही प्रथम राहात होतो. नंतर एकदोन महिन्यातच टिळकही तेथेच राहावयास आले; आम्ही साधारणपणे नऊ वर्षे त्या वाड्यात राहात होतो. टिळकांनी पुढे तेथून आपले बिऱ्हाड बदलले. कारण काय झाले असावे याची कल्पना मला त्या वेळी आली नाही, तर आता कोठून येणार? टिळक गेल्यानंतर आम्हीही पुढे एकदोन वर्षात तो वाडा सोडून भाटवडेकरांच्या वाड्यात दोनतीन वर्षे राहिलो व नंतर फर्ग्युसन कॉलेजच्या माळावर एक झोपडी बांधून तीत राहावयास गेलो. तांब्यांचा वाडा ओंकारेश्वराचा समंध म्हणून म्हणण्यात येई. दम्याच्या विकाराला कोरडी हवा चांगली त्यामुळे व अभ्यासालाही एकांत मिळावा म्हणून हे एकदा तीन महिने केडगावला जाऊन राहिले होते. त्या वेळी त्यांना ते गाव फारच पसंत

पडले. हवा चांगली व पुण्यापासून जवळच त्यामुळे त्यांनी तेथे एक जागाही खरेदी केली. तिच्यावर एक छोटीशी झोपडी बांधून तिथेच राहण्याचा त्यांचा विचार होता. पण तो विचार त्यांच्या अकाली निधनाने पूर्ण झाला नाही. ती जागा गावचा पाटील, आमचा वंशज निघत नाही अशा समजुतीने गडप करण्याच्या विचारात होता; पण नंतर ती आम्ही इकडचे (वऱ्हाडातील) एक गृहस्थ पुण्याला राहात त्यांना विकली. अजून म्हणजे परवापरवा आठ दहा वर्षांपर्यंत आगरकर झाले व गेले, त्यांचे नावनिशाण म्हणजे फक्त त्यांचे कार्य व कीर्ती यांखेरीज काही नाही. त्यांची मुले माणसे या जगात असतील, ही गोष्टच लोकांना खरी वाटत नसे. कारण त्यांच्या मरणानंतर आम्ही जे पुणे सोडले ते सोडलेच. त्यामुळे महाराष्ट्राशी मुळी आमचा संबंधच येऊ शकला नाही. त्यानंतर मीही काही मोठी शिकलीसवरलेली बाई नव्हे; माझा मोठेपणा काय तो त्यांच्यामुळे.

आम्ही तांब्यांच्या वाड्यात राहात असताना एकदा काय झाले, रात्रीच्या वेळी आमच्या घरात चोर शिरले. घरात मी, माझा चवदा पंधरा वर्षांचा लहान भाऊ, गोपाळराव व माझा मुलगा यशवंता -तो असेल त्या वेळी दीड दोन वर्षांचा, इतकी माणसे होतो. गोपळरावांची झोप फारच सावध असे व एकदा झोपमोड झाली की पुन्हा मग त्यांना झोप लागतही नसे; त्यामुळे फार त्रास होई त्यांना. म्हणून आम्ही कोणी तसे काही कारण असल्याशिवाय त्यांना कधीच उठवीत नसू. आमच्या गडबडीमुळे त्यांची झोपावयाची खोलीसुद्धा अगदी स्वतंत्र बाजूला ठेवली होती. मी, माझा भाऊ व मुलगा यशवंता असे आम्ही एका खोलीत निजलो होतो. रात्री एकदीडच्या सुमारास माझा भाऊ मला एकदम म्हणाला, 'अक्का, मला कोणीतरी घरात शिरल्यासारखं वाटतंय. आपल्या इथं चोर आले असावेत असं वाटतं.' मी त्याचे म्हणणे ऐकले न ऐकलेसे करून तशीच निजले. पुन्हा त्याने मला तसेच सांगितले म्हणून मी उठले व दिवा मोठा केला, तो खरेच समोरचे दार उघडे दिसले. मला वाटले, लावायचे विसरले असावे. म्हणून मी दार बंद केले व झोपले. चोर येतील अगर आले असतील ही कल्पनाच नाही मुळी! वाटे, आपल्यासारख्या दरिद्र्याच्या घरातून चोर चोरून तरी काय नेणार? नंतर मागच्या गच्चीने चोर यांच्या खोलीत गेले. हे पलंगावर मच्छरदाणी सोडून झोपत. पलंगाच्या खाली एक महत्त्वाच्या कागदपत्रांची पेटी असे व तिच्यात कधीकधी पंधरावीस रुपयांपर्यंत रोकड असे. मी लहान असे पर्यंत एकदोन वर्षे तेच घरी सर्व पाहात असत. पण आता घरखर्चासाठी नेहमी पंधरावीस रुपये माझ्याकडे देऊन ठेवीत व संपल्यावर पुन्हा मागून घ्यावेत अशी पद्धत असे. मी वर सांगितलेच आहे की, यांची झोप फार सावध म्हणून. त्यामुळे चोर खोलीतून यांची पेटी घेऊन जायला व हे जागे व्हायला एकच गाठ पडली. यांना वाटले, तो आपला मेहुणा केशव असावा व मुद्दाम ज्या अर्थी खोलीत आला आहे, त्या अर्थी तसेच उठविण्यासारखे काही कारण असेल. म्हणून त्यांनी एकदम, 'काय रे केशव' म्हणून हाक मारली. त्याबरोबर चोराने हातातील दिवा विझवून पोबारा केला. खाली माझा भाऊ जागाच होता. त्याने हाका ऐकल्या व मला जागे करून तो 'चोर चोर' म्हणून ओरडला; आजूबाजूचे लोक जमा झाले. पण चोरांनी जाताना गच्चीच्या दाराना आतून कड्या घातल्याने आम्हाला त्यांना शोधणे अगर त्यांचा पाठलाग करणे शक्य झाले नाही. दारे वगैरे उघडून आम्ही घरात शोधाशोध केली, पण चोर केव्हाच पसार झाले होते. नाही नाही म्हटले तरी ब्राह्मण कुटुंबातून शंभरदीडशे रुपयांचा ऐवज निघतोच. आमच्या घरातूही काही भांडीकुंडी व रोकड मिळून दीडदोनशे रुपयांचा माल शेवटी चोरीला गेलाच. गोपाळरावांनी जणू काही गोष्ट घडलीच नाही इतके तिकडे दुर्लक्ष केले. ते म्हणत, 'माझं स्वत:चं जेवढं असेल तेवढंच मजपाशी राहील. ते चोराला नाही, महाचोरालाही नेता यावयाचं नाही.'

पुढे हे एकटेच फर्ग्युसन कॉलेजच्या माळावर झोपडीत कोरडी हवा म्हणून राहात. त्या ठिकाणी ते सरासरी पंधरा दिवस असावेत. गड्याकडून त्यांना डबा पोचविण्यात येत असे. त्या काळी गड्याकरवी डबा नेऊन जेवण करणारे ते एकटेच असावेत. आता खाणावळीचे डबे सर्रास गड्यांकरवीच जातात व त्याची चिकित्साही पण कोणी फारशी करीत नाही. डबा पोचविण्याने थोडीशी आबाळ होते व रोजच्या रोज ते जमतही नाही, असे दिसून आल्यावर आम्ही सर्वच्या सर्वजणांनी त्या झोपडीत राहण्यास

जाण्याचे ठरविले. माझ्या घरातल्या वडीलधाऱ्या मंडळींनी मला अनेक तऱ्हांनी भीती घातली. पण एक तर घरी नुकतीच चोरी झाली असल्याने आमच्यापाशी काहीही नव्हते, तेव्हा ती भीती व्यर्थच होती. शिवाय दिवसभर माणसांची ये जाही असेच. रात्री फक्त मी, माझा भाऊ, यशवंता, गोपाळराव व एक गडी इतकी मंडळी त्या माळावरील झोपडीत वसतीला असू. आमच्या झोपडीपासून साधारणपणे हाकेच्या अंतरावर भांबुर्ड्यांच्या पाटलाच्या शेतावरील माणसांची वसती. ही सध्याची कॉलेजची जागा पहिली त्या पाटलाचीच होय. हल्ली लकडीपुलाच्याकडे पुण्याचा खूपच विस्तार झाला आहे. पण मी सांगते आहे त्या काळी लकडी पुलाच्या पलीकडे सर्व गवताच्या गंजा असत व त्याच्याही पलीकडे दाट झाडी असून तिला आंबराई म्हणत. साधारणपणे रात्री साडेसहा ते साडेसातपर्यंत फिरून जाणाऱ्यांची रहदारी या बाजूला असे. नंतर फिरून पडाटे साडेपाच सहाच्या सुमाराला ती सुरू होई व मग दिवसभर चाले. पण यांना यावयास कधी कधी नऊ साडेनऊही वाजत. त्यामुळे आम्हाला एकसारखी काळजी वाटे. पुण्याचे लोक यांच्याविरुद्ध वाटेल तसे लिहीत आणि म्हणून यांना ते मारतीलबिरतील की काय अशी भीती वाटे. पण पुण्याच्या लोकांना नुसत्या कागदी शिव्या देण्यापलीकडे काही करण्याची शक्तीच नाही म्हणा किंवा आणखी काही म्हणा, पण यांच्यावर हात टाकण्याचे धाडस मात्र कोणी केले नाही, एवढे खरे.

आमच्या घरापासून जवळच एक चौकीदार राहात असे. तोही एकटा, आम्हीही एकटेच. त्यामुळे शेजारी म्हणून तो कधीकधी आमच्याकडे येत असे. इंदूरच्या महाराजांचे यांच्यावर भारी प्रेम. महाराजांच्या बरोबरील कोणा एका गृहस्थाची व चौकीदाराची काही माहिती असावी; कारण महाराज जे जे काही यांच्यासंबंधी स्तुतीपर बोलत, ते ते तो चौकीदार येऊन आम्हाला सांगे.

●●●

## ३. टिळक आणि आगरकर

एकदा महाबळेश्वरचे कोणी एक गृहस्थ आमच्याकडे आले होते. त्याच वेळी इंदूरच्या महाराजांची यांना बोलवणे करणारी तार आली. या गृहस्थांनी ती तार घेतली व मला खाली येऊन सांगू लागले, 'वैनी, चला तयारी करा. इंदूरला जायचं आहे.' मला ते काही खरे वाटले नाही. मी म्हणाले, 'असं कसं होईल? मला स्वत:ला ते सांगतील अन् मग करू तयारी. तयारीला काय उशीर!' पण मला ते पुणे सोडून जातील हे हजार वाट्यांनी अशक्य वाटले आणि गोष्ट होतीही तशीच. यांनी महाराजांचा योग्य आदर राखावयाचा म्हणून त्यांना आभाराची उलट तार पाठविली व येऊ शकत नसल्याचे कळविले. त्या गृहस्थांनाही त्यांनी माझ्या मनावरसुद्धा या साध्या राहाणीचा आणि आवडींचा इतका परिणाम केल्याचे पाहून गोपाळरांबद्दल आदर व कौतुक वाटले. पुढे तर इंदूरच्याच महाराजांनी दरमहा पंधराशे रुपये देण्याचे ठरवून बोलावणे केले; पण यांनी तेही नाकारले आणि नम्रपणे कळवले, 'माझ्या आयुष्याचं इतिकर्तव्य ठरलं आहे आणि त्याला आवश्यक एवढा पैसाही मिळत आहे. आपल्या कृपेबद्दल फार फार आभारी आहे. '

माझे मामे-सासरे म्हणजे गोपाळरावांचे एक मामा सदाशिवराव भागवत यवतमाळला पी.डब्ल्यू.डी. मध्ये इंजिनियर होते. त्यांची मुलगी वेणू ही माझी मामे-नणंद. रूपाने अगदीच सामान्य होती ती. त्यामुळे तिच्या लग्नासाठी त्यांनी गोपाळरावांना स्थळ पाहण्यास सांगितले; कारण यांची शाळा व खूपशा ओळखी, तेव्हा यांच्या माहितीने एखादे चांगले स्थळ मिळेल ही आशा. यांच्या शाळेत शिकणारा एक गरीब पण हुशार मुलगा होता. त्याचे नाव राम नामजोशी. त्याला चुलता आणि चुलतीखेरीज दुसरे कोणीही नव्हते. तो मॅट्रिकला शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवून उत्तम प्रकारे पास झाला. त्याला आपली मामेबहीण द्यावी असा गोपाळरावांनी मनाशी बेत ठरविला आणि

त्याप्रमाणे त्याला घरी बोलावून त्याबद्दल बोलणे काढले. मी त्या वेळी तिथेच होते. माझ्या मामेसासूबाई म्हणजे सदाशिवरावांच्या पत्नी काहीशा तऱ्हेवाईक असल्यानेच आपल्या मामांचे आयुष्य दु:खी झाले, अशी गोपाळरावांची ठाम समजूत होती. सदाशिवराव त्यामुळे थोडेफार व्यसनी झाले होते; तेव्हा त्यांनी बोलताबोलता या मुलाला सांगितले, 'जर ही मुलगी आपल्या आईप्रमाणेच निघाली आणि तुला मनस्ताप होऊ लागला, तर तू बेशक दुसरं लग्न करून मोकळा हो. पण ती रूपानं फक्त तितकीशी चांगली नाही एवढ्यावरूनच मात्र तिचं आणि तुझं आयुष्य दु:खी होऊ नये.' रामने त्यांचे म्हणणे कबूल करून लग्नाला संमती दिली. लग्न झाले, चारपाच वर्षे लोटली, पुण्याला तो मुलगा कॉलेजमध्ये शिकत असता एकाएकी वारला! आता वेणूच्या आयुष्याचे कसे होणार? तिचा जन्म कसा जाणार? म्हणून आम्ही सर्वजण अगदी दु:खात होतो. गोपाळराव त्या वेळी काही कामानिमित्त मुंबईला गेले होते; ते परत आले तेव्हा त्यांना ही गोष्ट समजली. आमच्याप्रमाणेच त्यांनाही फार दु:ख झाले.

वेणू त्या वेळी माहेरी होती. दुपारी सुमारे अकरा वाजण्याच्या वेळी घरातील आम्ही सर्व माणसे उदासीन, खिन्न होऊन दु:खी मनाने आपापले व्यवहार करीत होतो; तेव्हा गोपाळराव आम्हाला म्हणाले, 'आता दु:ख करून काय होणार? वेणूच्या जन्माचा प्रश्न सोडवला पाहिजे. मी तर तिच्याबद्दल काय करायचं ते ठरवून टाकलं आहे. या वेळी वेणूला काहीतरी शिक्षण देऊन स्वावलंबी केलं तरच तिचं आयुष्य काहीतरी बरं जाईल, नाहीतर तिचा जन्म फुकट! तिचे हाल कुत्राही खाणार नाही.' तिला काहीतरी युक्ती करून तिच्या आईपासून दूर पुण्याला आणून तिच्या मनाची तयारी केली पाहिजे अशा निश्चयाने तिच्या वडिलांना तिला पुण्यास पाठवून देण्याबद्दल लगोलग पत्र लिहिले. गोपाळरावांच्या मामांनी आपली सर्व जिंदगी व्यसनात आणि एका बाईच्या पायात खलास केली होती! एक राहता वाडाच काय तो शिल्लक राहिला होता, आणि तोही जर मामी तिथून हालल्या, तर ती बाई बळकावेल म्हणून, गोपाळराव मामींनी मुलीबरोबर पुण्यास येऊन राहण्याच्या अगदी विरुद्ध होते. शिवाय जुन्या मताची व तऱ्हेवाईक बाई असल्याने वेणूच्या मार्गात कदाचित तिचा अडथळा होईल ही एक भीती होतीच. पण 'आम्ही मायलेकरे एकत्रच राहणार; मी नाही वेणूला एकटीला पाठविणार!' असा हट्ट मामी धरून बसल्या.

गोपाळरावांची आणखी एक विचारसरणी म्हणजे घरात बायकामाणसे असणे हा पुरुषांच्या वर्तनाला एक प्रकारे लगामच असतो व ती नसली तर चांगले पुरुषसुद्धा बेताल होण्याचा संभव असतो. मग अगोदरच बसफैली व व्यसनी असलेल्या पुरुषांच्या आयुष्याचे तारू किती भरकटेल याचा काय नेम आणि या दृष्टीनेही पण मामींनी घर सोडणे रास्त नव्हते. शेवटी होय-ना करता करता गोपाळरावांनी एक युक्ती योजली. वेणूचा सासरा अत्यवस्थ असल्याचे एक पत्र लिहून तिला ताबडतोब बोलावणे केले; तेव्हा ती एकदाची आली. परंतु आल्यावर जेव्हा तिला आपल्याला लबाडीने बोलवून घेतल्याचे कळले, तेव्हा 'मला परत आईकडे पोचवा' म्हणून ती हट्ट घेऊन बसली. शेवटी नाना प्रयत्नांनी तिची समजूत करून तिला पंडिता रमाबाईंच्या शाळेत घातले. नंतर जेव्हा ती शाळा मिशनरी लोकांची झाली, तेव्हा हिला तिथून काढून हुजूरपागेत घातले. तिथून मॅट्रिक झाल्यावर कर्वे युनिव्हर्सिटीत दाखल झाली. तिथला शिक्षणक्रम संपल्यावर काही दिवस महिलाश्रमाचे काम करून आणि आता पुनर्विवाह करून ती आपले आयुष्य कंठीत आहे.

आम्ही सर्वजण तिच्या आयुष्याचा विचार मनात आणून दु:ख करण्यापलीकडे काही करू शकलो नसतो; पण त्या तशाही काळात घरच्या व बाहेरच्या दोन्ही आक्षेपांना तोंड देऊन गोपाळरावांनी त्या मुलीचे आयुष्य सुखमय करण्याचा प्रयत्न केला. याच सुमारास कऱ्हाडचे त्यांचे मामा रामभाऊ भागवत यांचा थोरला मुलगा वारला होता; त्याचीही बायको होती. ते वेणूलाही शिकविण्याच्या वगैरे विरुद्ध होते. आणि असा कोटिक्रमही लढवीत की - 'पाहा, दोघीही मुली बरोबरीच्याच. एकीनं शिकावं आणि एकीनं अंधारात बसून आयुष्य कंठावं, हे तुला बरं दिसतं का?' त्यावर गोपाळराव म्हणत, 'मामा, तुमची स्थिती चांगली आहे. तुम्ही आपल्या सुनेला कशीही पोसू शकाल; तशी वेणूची स्थिती नाही. तिची सासरची स्थिती अगदी

गरिबीची आहे. पोळपाटलाटणं घेऊन दारोदार हिंडत अपमानास्पद जिणं तिनं जगावं असं तुम्हाला वाटतं का? मी या गोष्टीला कधीही कबूल होणार नाही. तुम्ही आपल्या सुनेला शिकवावं असंही मला वाटतं; पण जर तुमची इच्छा नसेल तर माझा नाइलाज आहे. पण वेणूच्या बाबतीत माझा निश्चय अढळ आहे.'

आम्ही फर्ग्युसन कॉलेजजवळ जे घर बांधले, त्याची हकिगतही मोठी सांगण्यासारखी आहे. आम्ही पुण्यासारख्या ठिकाणी घर बांधण्याइतपत श्रीमान नव्हतो आणि नाहीही. गोपाळरावांच्याजवळ सुमारे तीनचारशे रुपयांची पुंजी साठली होती. त्यांना एकांत मिळावा व प्रकृतीच्या दृष्टीने हवेशीर जागी राहावयास मिळावे असे वाटत असल्याने त्यांनी काहीतरी करून फर्ग्युसन कॉलेजजवळ घर बांधण्याचे ठरविले व त्यासाठी आपले स्नेही श्री.शंकरराव बापट यांजपाशी आठशे रुपयांसाठी शब्द टाकला व त्यांना म्हणाले, 'शक्य झालं तर तुमचे पैसे फेडीन, नाहीतर बुडाले असं समजून मला आठशे रुपये द्या.' त्यांनीही पण त्याप्रमाणे मागेपुढे न पाहता लगेच आठशे रुपये दिले व घर बांधले गेले. पुढे त्या वेळी मॅट्रिकबरोबरच एस्.एफ.ची परीक्षा होत असे; तिचे हे परीक्षक झाले व त्यांनी एका वर्षातच सर्व पैसे फेडून टाकले.

शंकरराव बापट, यांचे मामा दत्तोपंत भागवत, मिरजकर आणि हे असे चौघेजण फार जिवलग मित्र होते. त्यांनी आपआपसात अगदी पहिल्यापासून एकमेकांच्या अडीअडचणींत एकमेकांना उपयोगी पडण्याचे व जर कोणाचे बरेवाईट झाले तर त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याचे ठरवून ठेवले होते. त्याप्रमाणे मिरजकरांवर प्रथम प्रसंग आला; परंतु लगेच दुसरेच दिवशी त्यांची बायकोही वारल्याने सर्वच प्रश्न आटोपला! पैकी श्री.भागवतांची बायको अगोदरच वारली. बापट पतीपत्नी हयात आहेत. प्रसंग खरा आला तो माझ्यावरच आला आणि हे मित्र ठरल्याप्रमाणे वागलेही. श्री.बापटांनी मला काही मदत पाहिजे काय याबद्दल चौकशी केली; पण माझी सर्व सोय श्री.दत्तोपंत भागवतांनी करण्याचे अंगावर घेतल्याने त्यांची मदत घेण्याचा प्रसंगच आला नाही. सांगण्याचा मुद्दा एवढाच की, गोपाळरावांनी आपल्या अंत:करणाची अशी जी तीनचार माणसे जोडली होती, त्यांनी मला काहीही कमी पडू दिले नाही. माझ्याशी बोलताना ते वारंवार म्हणत, 'आमचं एकमेकांवर किती प्रेम आहे याची तुला कल्पनाही येणार नाही.'

यांचे सुधारकातले लेख वाचून व मते ऐकून अनेक लोक त्यांना भेटण्यासाठी म्हणजे वादविवाद वा विचारविनिमय करण्यासाठी, काही तर निव्वळ यांना पाहण्यासाठी म्हणून येत. त्या वेळी काही लोक मुद्दाम कुत्सितपणे यांना विचारीत, 'तुम्ही आपली मतं प्रथम आपल्या पत्नीला नीट समजावून देऊन तिच्या मनाची तयारी केली आहेत का?' यावर अर्थातच ते होकारार्थी उत्तर देत आणि ही गोष्ट खरीही होती. माझ्यापासून ते कोणत्याही गोष्टी लपवीत नसत. सर्व गोष्टी सरळ समजावून देत. मुलाबाळांच्या बाबतीत किंवा कोणत्याही घरगुती गोष्टीसाठी त्यांच्यावर अवलंबून बसलेले त्यांना आवडत नसे. 'सर्व घरगुती गोष्टी तुझ्या तू करीत जा' म्हणून मला ते बजावीत असत. त्यांनी आपले बहुतेक लेख व मते मला समजावून सांगितली आहेत आणि त्याप्रमाणे वागण्याबद्दलही मोठ्या आग्रहाने कित्येक वेळा सांगितले आहे.

यांच्या सुधारकी मतांमुळे हे मुलांच्या मुंजी तरी करतात की नाही, अशी शंका आमच्या सर्व आप्तसंबंधियांना वाटे. यांचे मामा रामभाऊ भागवत यांच्या पुतण्याची मुंज निघाली; तेव्हा यांना म्हणाले, 'माझ्या पुतण्याच्या मुंजीबरोबरच करून टाका यशवंताची मुंज.' मुंज करायवयास यांची कोणतीच हरकत नव्हती; पण घरात मला ते पसंत पडणार नाही म्हणून त्यांनी परस्पर सांगितले, 'राहू दे; पुढल्या वर्षी पाहू.' पण माझ्या मामेसासऱ्यांनी 'तुझी काही हरकत नाही ना?' म्हणून मलाच विचारले. अर्थात आपल्या पहिल्या मुलाची मुंज दुसऱ्याच्या दारात व्हावी, असे कोणत्या आईला वाटेल? पण आमची घरची गरिबी असल्याने माझे सख्खे सासूसासरे नेहमी भागवतांच्याकडेच राहात. गोपाळरावांनाही आजपर्यंत त्यांचाच आधार होता. तेव्हा मनातून तर नकोसे वाटत होते; पण फिरून विचार केला, इतके दिवस ज्यांच्यावर अवलंबून राहिलो त्यांना जर आता

मी 'नाही', म्हटले, तर असे वाटायचे की - पाहा, आजपर्यंत आमच्याशी अगदी घरच्याप्रमाणे वागले, पण आता जरा कुठे कर्तेसवरते झाले तो यांचा घरोबा लागला आपला ओहोटीला! यांचा आपलेपणा जाऊन यांना आता परकेपणा वाटू लागला! तेव्हा एवढा विचार करून मी त्यांना आपली हरकत नसल्याचे सांगितले, त्यावर मला गोपाळराव म्हणाले, 'तुझी काही हरकत नाही असं आता म्हणते आहेस; पण पाहा, मग तुला वाईट वाटलं तर मी जबाबदार नाही हो! आपलं आताच सुधारून घे पाहिजे तर. त्यांना अजून नकार दे. मुंज काय, पुढं करून टाकू.' पण मला काही नकार द्यावासा वाटला नाही आणि यशवंताची मुंज पुण्यालाच पण भागवतांच्या मुंजीत झाली. लोकांनी त्या वेळी यांचे मुंजीतले फोटो वगैरे घेऊन ठेवले. हेतू हा की, सुधारक म्हणविणारे हे आपल्या मुलाची मुंज वगैरे धार्मिक कृत्ये करतातच हे जगजाहीर करावे. अर्थात अर्थपूर्ण धार्मिक संस्कारांना त्यांचा कधी विरोध नव्हताच; पण एवढी मार्मिकता दाखविण्याचे सौजन्य त्यांच्या टीकाकारांना दाखविण्याची बुद्धीच झाली नाही! लोकांना भलत्याच काही गोष्टी वाटत त्याला हे काय करणार? असो, मुंज झाली हे एकापरीने बरेच झाले. कारण पुढे हे एकसारखे अतिशय आजारीच असत.

मी मागे सांगितलेच आहे की, इंदूरच्या महाराजांचा यांच्यावर फार लोभ म्हणून. तेव्हा शाळेकरिता पैसे मागण्यासाठी इंदूरला जाण्याबद्दल सर्व मंडळी यांना फार आग्रह करीत. ते म्हणत, 'तुम्ही आजारी असला तर दोन गडीमाणसं बरोबर घेऊन जा; पण इंदूरच्या महाराजांकडे तुम्हीच गेलात तर, चारदोनशे रुपये जास्त मिळण्याचा संभव आहे.' इंदूरचे महाराज, सांगलीकर, मिरजकर वगैरे संस्थानिकांची ओळख यांच्या लेखांमुळे व शाळेच्या कामामुळे झालेली. या सर्व संस्थानिकांचा पुण्याशी फार संबंध व यांच्या शाळेचा सर्व महाराष्ट्रभर फार लौकिक झालेला. त्यामुळे शाळेला, कॉलेजला भेटी देण्यासाठी हे संस्थानिक वगैरे मोठेमोठे लोक येत. त्यामुळे त्यांची ओळख होई. यांची प्रकृती नीट नसल्याकारणाने कित्येक वेळा मिरजकरांनी यांना आग्रहाने मिरजेला येऊन राहण्याबद्दल सांगितले. मिरजेची हवा कोरडी असल्याने दम्याला आराम पडण्याचा फार संभव होता. ते सर्व व्यवस्था करायवयास तयार होते. राहावयास बंगला वगैरे देतो म्हणत; पण हे मला सांगत - 'काय करायचं जाऊन? थोर माणसं बोलावतात हेच पुष्कळ आहे.' अर्थात हे मिरजेला कधी गेलेच नाहीत.

इंदूरच्या कारभाऱ्यांचा मुलगा एकदा काही कामानिमित्त पुण्याला आला होता. तो त्यावेळी आमच्याकडे येऊन यांना भेटला व आग्रहाने यांना इंदूरला येण्याबद्दल सांगू लागला. तिथे आल्यावर निरनिराळ्या लोकांच्या गाठीभेटी करवून देऊन शाळेला खूप मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करीन अशा थापा - हो, त्या सर्व थापाच होत्या असे पुढे सिद्धच झाले - मारल्या. यांनाही इंदूरला जावयाचेच होते; कारण सर्वांचाच तसा आग्रह होता. तेव्हा त्यांनी जाण्याचे नक्की ठरविले. त्याप्रमाणे इंदूरला गेल्यावर त्यांनी त्या कारभारीपुत्राची स्वाभाविकच चौकशी केली. त्या वेळी सदर कारभारीसाहेबांनी यांच्याकडे तिरस्कारपूर्ण दृष्टीने पाहून चारदोन शब्दांतच तुसडेपणाने संभाषण संपविले! अर्थातच यांनी बारीक चौकशी केली; तेव्हा समजले की, तो मुलगा अत्यंत वाईट चालीचा असल्याने आपल्या मुलाची इतकी कसून चौकशी करणारे हे त्याच्या ओळखीचे गृहस्थ त्याच्याच लायकीचे असावेत, असा ग्रह झाल्याने त्यांच्याकडून असे वर्तन झाले. पुढे इंदूरची सर्व कामे वगैरे आटोपून हे पुण्याला परत आले. नंतर काही दिवसांनी तोच त्या कारभाऱ्यांचा मुलगा आमच्याकडे पुन्हा आला. त्या वेळी आमच्याकडे कोणी एक पाहुणे आले होते. त्यांच्यादेखतच यांनी त्या मुलाला 'आमच्याकडे फिरून न आलात तर फार बरं' असे अगदी स्पष्ट शब्दांत सांगितले. अर्थात चिरंजीव आल्या पावलीच परत फिरले! नंतर यांनी इंदूरला घडलेली ती सर्व हकीकत पाहुण्यांना सांगून आपल्या वर्तनाचा खुलासा केला.

इंदूरच्या महाराजांना यांच्याबद्दल फार कौतुक वाटे . आम्हाला मदत करण्याची त्यांची फार इच्छा. हे वारल्यानंतर सुद्धा यशवंत शिकत होता तोपर्यंत त्यांच्याकडून त्याला दरमहा सोळा रुपये शिष्यवृत्ती म्हणून मिळत असत.

पैशाच्या बाबतीत ते सहसा उधळमाधळ करीत नसत.

परंतु मुलांच्या शिक्षणासाठी मात्र वाटेल तितका पैसा खर्च करावा, असे त्यांना वाटे. बाकीच्या बाबतीत सर्वसामान्य माणसांप्रमाणेच त्यांची राहणी असे. यशवंताला एका अगदी वयोवृद्ध म्हणजे त्याचे आजोबा शोभतील अशा मास्तरांची शिकवणी ठेवली होती. त्यांना मास्तरांचा अनादर केलेला अगर उलट बोललेले मुळीच खपत नसे. हे मास्तर आल्याबरोबर रोज त्यांना कॉफी किंवा लापशी काहीतरी हे यशवंताच्या हाती देत असत. (त्या वेळी चहा हल्लीइतका रूढ झाला नव्हता व चहाची पद्धतच मुळी आमच्याकडे नव्हती व नाहीही.) नंतर यशवंताच्या शिक्षणास आरंभ होई. हेतू हा की, आपल्या शिक्षकांचा आदरसत्कार करण्याची तसेच मानसन्मान ठेवण्याची सवय याला लागावी.

यांचे मामा म्हणजे दत्तोपंत भागवत हे अकोल्याला राहात; पण वऱ्हाडातला उन्हाळा फार कडक, त्यामुळे वर्षातून साधारणपणे दोन महिने ते कऱ्हाडास आपल्या वडील बंधूंकडे येत असत. त्यांचे वडील बंधू रामकृष्णपंत भागवत, हे व दत्तोपंत यांच्या वयात खूपच अंतर होते. दत्तोपंत आपल्या वडील बंधूंना वडिलांच्या ठिकाणी मानत. दत्तोपंतांचा व गोपाळरावांचा अतिशय स्नेह हे मी वर सांगितलेच आहे. त्यामुळे कऱ्हाडला जाताना आणि परत अकोल्याला जाताना चारसहा दिवस ते आमच्याकडे पुण्याला मुक्काम करीत. आपल्या मुलाबरोबर त्यांनी आपल्या मेव्हण्याचा मुलगाही शिकावयास ठेवला होता. या सर्व मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी एक मास्तरही ठेवले होते. एके दिवशी तो - त्यांच्या मेव्हण्याचा मुलगा - मास्तरांना काहीतरी बोलला, ते त्यांनी खोलीतून ऐकले. त्या दिवशी सायंकाळी जेवताना मामांना यांनी त्या मुलाची खोडी सांगितली व म्हटले, 'अशा रीतीनं मास्तरांचा अपमान केलेला मला आवडत नाही.' सामान्यत: त्या वेळी विद्यार्थ्यांतही शिक्षकासंबंधी अलीकडच्या मानाने अधिक आदर असे. शिक्षकांचा अपमान विद्यार्थ्यांनी केलेला यांना बिलकुल सहन होत नसे. त्याचप्रमाणे वडील माणसांचा अनादर करणे यांना पसंत नसे आणि तसे होऊ नये म्हणून ते नेहमी दक्ष असत.

यशवंताच्या अभ्यासासंबंधी एक गोष्ट आता सहजच आठवली म्हणून सांगते. यशवंता त्या वेळी असेल सातआठ वर्षांचा. खाऊचे का बक्षिसाचे म्हणून मिळालेले सातआठ आणे त्याच्यापाशी होते. ते कसेही खर्च करण्याची त्याला परवानगी होती. तो आणि त्याचा एक मित्र असे दोघेजण बाजारात गेले आणि त्यांनी एकदोन आण्याचा एक चेंडू घेतला, आणखी काही खेळ घेतला व उरलेल्या चारदोन पैशांचा खाऊ घेऊन तो खाऊन टाकला. घरी आल्यानंतर कसकसे पैसे खर्च केलेस म्हणून विचारताच त्याने सर्व हकिकत सांगून टाकली. तेव्हा हे म्हणाले, 'वेडा आहेस झालं.' अशा रितीने त्याने पैसे खर्च करणे व बाजारचा खाऊ घेऊन खाणे त्यांना मुळीसुद्धा आवडले नाही. यानंतर पुढे दर दहा इंग्रजी शब्द पाठ करण्याबद्दल एक पैसा याप्रमाणे त्याला हे बक्षीस देत. अशा युक्तीने मुले अभ्यास चांगला मन लावून करतात, असे त्यांचे म्हणणे असे. अशा रीतीने यशवंताने साठविलेल्या पैशातूनच त्यांनी यशवंताला पुढे एक छानदार सूट करून दिला होता. तो घालून मिरवण्यात यशवंताला त्या वेळी कितीतरी अभिमान वाटे; कारण तो त्याच्या स्वत:च्या मिळकतीचा होता.

यांच्या सर्व मंडळीचा असा एक परिपाठ होता, की दर पंधरा दिवसांतून एकेकाने शाळेची तपासणी करावयाची व ती करणारा आपल्यावरचा अधिकारी आहे असे समजून त्याप्रमाणे सर्वांनी त्याच्याशी वागून त्याचा मान ठेवायचा व त्याला सर्व माहिती द्यावयाची. अशीच एकदा यांची तपासणीची पाळी आली. हे एका वर्गात तपासणीसाठी म्हणून गेले. तेथे टिळकांचा तास होता. टिळक शिकवण्यात गढून गेले असल्याने म्हणा किंवा मुद्दाम म्हणा, पण हे गेल्यावर ते उठून उभे राहिले नाहीत. तेव्हा यांनी तास संपल्यानंतर टिळकांना बराच दोष दिला. ते म्हणत, 'आपण ठरविलेल्या गोष्टी आपण पाळल्याच पाहिजेत. मला मान पाहिजे, अशातला भाग नाही व टिळक उठले नाहीत म्हणून माझा मोठा अपमान झाला, अशातलाही भाग नाही; पण जो नियम तो नियम. आपणच करून आपणच त्याला पायाखाली तुडवू नये, असं मला वाटतं.'

शाळा सोडल्यापासून टिळकांचे व आमचे सूत नव्हते. टिळक मुलाच्या मुंजीच्या वेळी काय ते आमच्या घरी आले होते व तेव्हाच काय ते मोकळेपणाने बोललेही पण.

नंतर मात्र ते आमच्या घरी कधी आलेले मला आठवत नाही. यांना मात्र टिळकांशी वाकडेपणा ठेवून आपला अंत होऊ नये असे वारंवार वाटे. या भांडणाबद्दल त्यांना फार हळहळ वाटे. शेवटी युनिव्हर्सिटी बोर्डावर हे सरकारनियुक्त सभासद म्हणून आले, त्या वेळी टिळकही तेथे लोकनियुक्त म्हणून आले होते. त्या वेळी प्रथम गोपाळरावांनी टिळकांना पत्र लिहून आपले मत त्यांच्यासाठी राखून ठेवल्याचे कळवले होते. यानंतर वारंवार मुंबईला त्यांच्या बैठकी होत, त्या वेळी हे मुंबईला जात. अगदीच पहिल्या सभेच्या वेळी हे निघाले तेव्हा यांची प्रकृती ठीक नव्हती, म्हणून आम्ही 'कशाला जाता?' म्हणून म्हटले. त्यावर, 'मुंबईला एक डॉक्टर आहे, त्यांच्याकडं जातो. उगीच मनाला आपण औषधोपचार केले नाहीत असं असमाधान वाटायला नको आणि जातोच आहे तर सहज सभेचंही काम होईल' असे म्हणून गेले. त्या वेळी टिळकही त्याच गाडीने निघाले होते आणि या प्रसंगाने या जिवलग मित्रांचा बऱ्याच दिवसांचा अबोला तुटला व ते पुन्हा एक झाले आणि एकाच कार्यक्षेत्रात काम करताना दिसू लागले.

मुंबईला कामानिमित्त यांचे वारंवार जाणे-येणे घडे. एकदा काय वाटले कुणास ठाऊक, ते मला म्हणाले, 'चल, तुला मुंबई दाखवतो.' मला बरोबर घेऊन मुंबईला गेले, तेव्हा तिथे काँग्रेसचे अधिवेशन होते. अर्थात मला एकदम मुंबईला आलेली पाहून तेथील माहितीची सर्व मंडळी आश्चर्यचकित झाली! मला आपल्या भावाकडे म्हणजे माझ्या दिराकडे सोडून आपण राष्ट्रीय सभेच्या मंडपाकडे ते निघून गेले. अर्थात मला भाऊजींनीच सर्व मुंबई दाखविली. मला बरोबर घेऊन ते स्वत: काही मुंबईभर हिंडले नाहीत. मला जेव्हा यांनी भाऊजींच्याकडे पोचवले, तेव्हा चाळीतील सर्व लोक डोकावून सुधारक आगरकर म्हणून यांच्याकडे पाहात होते. हे बाहेर गेल्यानंतर ती मंडळी आपापसात विनोदाने म्हणत, 'हेच का ते सुधारक? यांच्या तर पागोट्याचे बंद गळ्यात लोंबताहेत!'

त्या वेळी हल्लीप्रमाणे टोप्यांचा प्रघात नव्हता. रुमाल बांधण्याची पद्धत मात्र होती. यांचे एक भले मोठे पागोटे असे. ते पाहूनच या मंडळींनी चेष्टा केली! पुढेपुढे ते पगडी घालीत. पगडी अगदी शेवटीशेवटी व फक्त कॉलेजला जाताना तेवढी वापरीत. नेहमी पागोटेच. यांना छानछोकीची राहाणी बिलकुल आवडत नसे आणि त्या वेळी छानछोकीच्या कल्पनाही इतक्या पुढे गेलेल्या नव्हत्या. त्यांच्या मामेबहिणीची म्हणजे वेणूताईची हकीकत मी मागे सांगितलीच आहे. तिला नीटनेटके राहाण्याची आवड फार. तेव्हा हे तिला नेहमी म्हणत 'वेणूताई, माणसानं कसं अगदी साधं राहावं.'

आम्ही राहात होतो त्या बाजूला त्या वेळी पुणे हल्लीइतके वाढले नव्हते. लकडी पुलापलीकडे असलेल्या गवताच्या गंजांवरून टिळक कधीकधी 'गंजीवरील कुत्रा' म्हणून यांचा उल्लेख करीत. टिळकांचा आणि यांचा मतभेद झाल्यानंतर टिळकांनी त्यांच्यावर खूपच टीका करून त्यांना छळले. त्या टीकेत एक प्रकारची कुचेष्टा भरलेली असे. पण या सर्वांत टिळकांनी त्यांना 'स्वार्थसाधू' म्हटले याचे त्यांना अत्यंत वाईट वाटे. अंत:करणाचे सरळ व कोवळे असल्याने मर्मावर घाव घालण्याची कला त्यांना साध्य नव्हती आणि तिचा त्यांना तिटकाराही वाटे. दोन्हीही व्यक्ती थोर आणि दिवंगत. कदाचित परमेश्वराच्या दरबारात दोघेही गळ्यात गळा घालून बसले असतील. अशा स्थितीत ही खपली फिरून टोकरून काढू नये, असे वाटत होते. पण काय करू? अजूनही त्यांचा तो मनस्ताप डोळ्यापुढे उभा राहतो व इच्छा नसताही सांगणे भाग पडते. टिळक यांना 'माळावरील महारोगी' म्हणूनही संबोधीत. सोसायटी सोडल्यापासून केसरीचा असा एकही अंक नसे की, ज्यात यांच्यावर काही ना काही कुत्सित टीका नाही! प्रथम केसरी, मराठा, शाळा, कॉलेज सर्व काही या सर्व मंडळींच्या तंत्रानेच चाले. पहिली सातआठ वर्षे तर गोपाळराव केसरीचे संपादक होते आणि त्या वेळी केसरीत ते आपली मते मांडीत. यांचा स्वभाव जसा टिळकांच्या नजरेत आला, तशी मतभेदाला सुरुवात झाली. आपटे मागाहून आलेले; पण पहिले 'प्रिन्सिपॉल' झाले. गोखले यांच्याच तंत्राने चालत. मतभेदाला खरा रंग चढला काही पगाराच्या बाबींमुळे आणि काही आजीव सेवकांनी इतर काही मिळकतीची कामे करावीत का न करावीत या मुद्द्यामुळे! पुढे टिळकांनी राजीनामा दिला. मला ते नेहमी घरात म्हणत की, 'टिळकांनी सोसायटी सोडून जाण्याइतका वाकुडपणा

दाखविण्याचं काही कारण नव्हतं.' त्यांना याबद्दल नेहमी वाईट वाटे. त्यांचे मतभेद या वेळी तरी अगदी खासगी स्वरूपाचे होते. सार्वजनिक कार्यात ते चव्हाट्यावर आणून यांच्यासंबंधी नाही नाही ते गैरसमज यांच्या हयातीत आणि माघारी पसरविण्यात आले.

टिळक सोसायटीतून निघून गेल्यानंतर वर्तमानपत्रे आणि सोसायटी निराळी करण्यात आली व केसरीत आगरकरांचे लेख येण्यास कठीण पडू लागले; म्हणून यांनी आपले स्वत:चे 'सुधारक' म्हणून पत्र काढले. सुधारक निघण्याच्या आधी वर्ष दीड वर्ष या दोन मित्रांच्या एकीचा खूप प्रयत्न करण्यात आला; पण त्याचा उपयोग झाला नाही! कोल्हापूर प्रकरणामुळे झालेले कर्ज बरेच होते, त्याच्या वाटण्या करण्यात आल्या. टिळकांची स्थिती यांच्या मानाने बरी असल्याने त्यांनी ते ताबडतोब फेडून टाकले. यांना आपले केसरीचे काम कर्ज फिटेपर्यंत करावे लागले. कारण हे पडले जन्मदरिद्री! ते सर्व कर्ज फिटले त्या वेळी केसरी-मराठ्याचे काम करणे आगरकरांना अशक्य झाले व म्हणूनच त्यांनी सुधारक पत्राला जन्म दिला. पहिली पाचसात वर्षे सामाजिक आधी का राजकीय आधी हा वाद मुळीसुद्धा निघाला नाही. विष्णुशास्त्री अगदी कट्टर सनातनी; पण त्यांच्या मनाला सुद्धा यांची गंभीर व मूलग्राही विचारसरणी पटत असे. सर्व काही सुसूत्र चाले. परंतु पुढे सोसायटीच्या स्थापनेपासून नवीन नवीन माणसे पुढे येऊ लागली व त्यांनी पुढे यावे असेच धोरण यांनी ठेवले. त्यामुळे वरील भांडणाचे मूळ रुजले व त्याचा एवढा वृक्ष झाला! टिळकांचा व त्यांचा खरा मतभेद येथे आहे असे मला ते नेहमी सांगत आणि एकदा मतभेदाला सुरुवात झाल्यानंतर स्वाभाविकच क्षुल्लक गोष्टींना भलतेच महत्त्व देऊन भांडण्याची प्रवृत्ती टिळकांनी दाखविली. असे मी आता त्यांच्या माघारीच म्हणते आहे असे नाही; माझ्या म्हणण्याला मी प्रकट स्वरूप देते आहे एवढेच. होळकरांच्या पैशाबाबत यांनी मुळीच स्वार्थ दाखविलेला नाही; त्यातील एक पैही घरी आम्ही कुणी पाहिली असेल तर शपथ! बरे, त्या पैशावर यांचा हक्क नव्हता अशातला भाग नाही. वेळ आली म्हणून आता सांगतेच ती सारी हकीकत.

मी मागे सांगितलेच आहे की, होळकरांचा यांच्यावर फार लोभ असे म्हणून. त्यांनी यांना इंदूरला येण्याबद्दल परोपरीने विनविले. नऊशे रुपये पगार देऊ, अशी त्यांची एकदा तारही आली होती. नंतर पंधराशे रुपये देऊ केल्याबद्दलचा निरोप घेऊन त्यांचा मेव्हणा आला; पण यांनी त्याबद्दल त्यांचे आभार मानून आपला नकार कळवला आणि तिकडे न जाता अंगीकृत कार्यालाच चिकटून राहिले. अनायासे आलेली संधी लाथाडून जन्मभर दारिद्र्य आणि हालअपेष्टा यांनी सहन केल्या आणि त्याच होळकरांकडून आलेल्या चारशे रुपयांसाठी आगरकर स्वार्थी ठरले, त्यांना पैशाचा लोभ होता अशा तऱ्हेचे प्रवाद पसरवण्यात आले! ही सर्व हकीकत मला पूर्ण ठाऊक आहे. ती देताना दोषी कोण व निर्दोषी कोण हे ठरविण्याचा माझा उद्देश नाही. त्यातून त्या व्यक्तीही आता हयात नाहीत.

त्या वेळी राजेरजवाड्यांकडून विद्वानांचा सत्कार होत असे आणि त्याप्रीत्यर्थ ज्या देणग्या देण्यात येत, त्यांना 'शेलापागोटे' म्हणत. शाळेसाठी नामजोशी फिरत, त्यांना शेलापागोट्याच्या स्वरूपाने कित्येक देणग्या मिळाल्या होत्या, त्या त्यांनी संस्थेकडे जमा केल्या नाहीत. ही सर्व भिक्षुकमंडळी आणि त्यांना मिळणारी वरील प्रकारची संभावना अर्थातच खासगी मालकीची समजली जाई. टिळक आणि हे इंदूरच्या महाराजांकडे गेल्या वेळी त्यांना महाराजांनी सातशे रुपये दिले व ते सर्व शाळेकडे जमा झाले; परंतु महाराजांनी पत्र पाठवून खुलासा केला की, वरील सातशे रुपये शेलापागोट्याच्या स्वरूपाचे असून त्यातील चारशे रुपये गोपाळरावांना त्यांच्या 'वाक्यमीमांसा' या पुस्तकाबद्दल बक्षीस म्हणून देण्यात यावेत आणि उरलेले तीनशे रुपये सर्वांनी महाराजांचे शेलापागोटे म्हणून वाटून घ्यावेत. अर्थात वरील रकमेपैकी चारशे रुपये निव्वळ गोपाळरावांचे म्हणून असताना त्यांच्यावर केवढे काहूर उठवण्यात आले! त्यांना स्वार्थी म्हणण्यात आले, त्यांचा दुर्लौकिक करण्यात आला! आणि एवढे होण्यास गोपाळरावांनी ते पैसे तरी घेतले होते म्हणावे, तर तेही नाही! त्यातील एका दमडीलाही ते शिवले नाहीत. होळकरांची पंधराशे रुपयांची नोकरी नाकारणाऱ्या आगरकरांना, त्यांनाच मिळालेल्या चारशे रुपयांसाठी टिळकांनी दोषी ठरविले! नंतर हे वारल्यावर मी अकोल्यास

असताना काही प्रसंगाने कोणत्याशा मासिकात ही इंदूरच्या पैशाची गोष्ट प्रसिद्ध झाल्याचे आम्हाला कळले. त्या वेळी यशवंताने टिळकांकडे चौकशी केली व लिहिले, 'आई हयात आहे. तिला या सर्व गोष्टी माहीत आहेत. माझे वडील मेल्यानंतर त्यांच्यासंबंधी असे गैरसमज पसरविणे बरे नाही. ते असते तर त्यांनी उत्तर दिलेच असते. आपण हा प्रचार आता तरी बंद करावा.' पण यावर त्यांच्या भाच्याने 'आमच्याकडे पुरावे आहेत' असे उत्तर पाठविले. वास्तविक मृतांच्या गोष्टी उकरून काढून काय फायदा होता? आणि काढल्या, तरी सत्य तरी काढावयाच्या होत्या. आणि टिळकांसारख्या थोर विभूतीने तर यांत मुळीच मन घालावयास नको होते. मला या सर्व गोष्टींचे अत्यंत वाईट वाटले.

मनात वारंवार येई, की आज जर हे हयात असते; तर या सर्व पुराव्यांना चोख उत्तर देते. टिळक हयात असताना त्यांनी या प्रचाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला नाही. उलट 'पुरावा आहे' अशा तऱ्हेचे उत्तर पाठविले याचे मला राहूनराहून आश्चर्य वाटते. टिळकांच्या मृत्यूनंतर तरी सर्व स्वस्थ झाले म्हणावे तर तेही नाही! टिळकचरित्राच्या निमित्ताने यांच्यावर फिरून शिंतोडे उडविण्यात आले. या दोन जिवलग मित्रांच्या खासगी भांडणाचा परिणाम इतका विकोपाला जावा व शहाणे म्हणविणारांनी आगीत तेल ओतण्याचा उपक्रम सतत चालू ठेवावा, ही खरोखर खेदाची गोष्ट आहे. गोपाळराव, टिळक, आपटे, गोळे, गोखले सर्व एकत्र राहिलेले, गप्पागोष्टी केलेले लोक. रात्री एकएक वाजेपर्यंत आम्ही एकत्र असताना टिळक-आगरकरांचे वाद चालत आणि अशा स्थितीत टिळकांच्या मनात यांच्यासंबंधी एवढी अढी का निर्माण व्हावी, काही कळत नाही! यांना मात्र राहून राहून वाईट वाटे. ते म्हणत, 'निदान मरताना तरी आम्ही एकत्र यावं! टिळकांशी वाकडेपणा असताना मला शांतपणानं मरण येणार नाही.'

यांना मुंबईला युनिव्हर्सिटीच्या कामासाठी जावे लागे. त्याचप्रमाणे शेवटी शेवटी दोनतीन वर्षे हे युनिव्हर्सिटीत परीक्षक म्हणूनही होते, त्या वेळी त्यांना पेपर तपासण्यासाठी मुंबईस जावे लागे. बरोबर आम्हा सर्वांना नेत असत. यामुळे आम्हाला चांगले दीडदोन महिने मुंबईत राहावयास मिळे. एका वर्षी शीवला आम्ही राहिलेले मला आठवते. एकदा वाळकेश्वरी बंगला घेऊनही राहिलो होतो. त्या वेळी युनिव्हर्सिटीत यांच्या जोडीला पितळे म्हणून कोणी गृहस्थ होते. जगन्नाथ शंकरशेठ यांचे व्याहीच मुळी ते. त्यांनी आम्हाला आग्रह करकरून फराळाला बोलावले. त्यांच्या पत्नी म्हणाल्या, 'आमचं पाणी तुम्हाला चालणार नाही; तेव्हा तुम्ही येताना आपल्याबरोबर पाण्याचा एक तांब्या भरून आणा म्हणजे झालं.' अर्थात इतक्या प्रेमाने आम्हाला बोलावणारे गृहस्थ सर्व पदार्थ निर्लेप करणार हे ठरलेलेच होते. अशा तऱ्हेने आमच्यासाठी एवढी उसाभर करण्यास ते तयार असताना त्यांचे आमंत्रण नाकारणे शक्यच नव्हते आणि अशा प्रेमळ ठिकाणी स्वत:चे पाणी तेवढे नेण्याचा असभ्यपणा करण्याइतके कोते विचारही त्यांच्या सहवासाने माझ्या ठिकाणी नव्हते. म्हणून मी त्यांना म्हटले, 'इतकं प्रेम तुम्ही दाखवता, तर आम्हाला तुमचं पाणीही चालेल. आणि न चालायला तरी काय झालं? साऱ्या जगाला शुद्ध करणारं पाणी, त्याला कसला आला आहे विटाळ?' मग ठरला एक दिवस त्यांचा बेत व त्या दिवशी आम्ही सर्व त्यांच्याकडे फराळाला गेलो. अर्थात हल्लीप्रमाणे बायकापुरुषांनी एकत्र बसून गप्पा छाटीत फराळ करण्याचा प्रघात त्या वेळी नव्हता. बाहेर पुरुषमंडळींची वेगळी सोय होती व आत आम्ही बायकामुलं होतो. आमच्यासाठी त्यांनी मुद्दाम केळ्यांचे पदार्थ तयार केले होते. आम्ही बायकाबायकांनी गप्पागोष्टी करीत फराळ केला. नंतर या पितळ्यांचा एक बगीचा होता तोही हिंडून पाहिला. फराळ संपला, हिंडणे संपले आणि परत जाताना पाहते तो यांचे ताट आपले जसेच्या तसेच परत आले! त्यांनी कशाला बोटसुद्धा लावले नव्हते! प्रकृतीला मानवत नाही, असे सांगून मालकाची समजूत केली होती. पितळ्यांच्या पत्नीला याची फार हळहळ वाटली. त्या म्हणाल्या, 'तुम्ही आम्हाला अगोदर सुचवलं असतं, तर यांच्यासाठी आम्ही आणखी दुसरे काही पदार्थ तरी तयार केले असते.' असो. नंतर आम्ही घरी निघालो. वाटेत गाडीत मला यांनी विचारले, 'तू केलास का फराळ?' मी म्हणाले, 'हो, केला. केळ्यांचे सर्व पदार्थ होते, काय हरकत होती?' त्यावर हे म्हणाले, 'मला त्यात अंडी असावीसं वाटलं,

म्हणून मी काही खाल्लं नाही.' मला नेहमी हे आपली मते सांगत. मांसाहाराबद्दल त्यांना काही वाटत नसे; परंतु त्यांना स्वत:ला त्याची किळस येई. त्यामुळे एखाद्या पदार्थाचा संशय आल्यास ते त्याचा स्वीकार करीत नसत.

एकदा खुद्द पितळ्यांशीच अंडी खाण्याबद्दल यांचा वादविवाद झाला होता व अंड्याची आपणास अगदी किळस असल्याचे त्यांनी बोलून दाखविले होते. त्यावर पितळ्यांनी हा डाव केला होता. गोपाळराव हे सर्व ओळखून असल्याने त्यांनी ते पदार्थ खाल्ले नाहीत; पण आपणास त्याचा विधिनिषेध नाही हेही त्यांनी सिद्ध केले. कारण मला याची काहीच कल्पना नसल्याने मी सारे चापून फराळ केला! असो. जाताना त्यांनी मला 'तो पाहा डोंगरीचा तुरुंग' म्हणून तो दाखविला. अर्थात बोलण्याच्या ओघात माझे तिकडे लक्ष नव्हते व देण्याचा प्रयत्न पण मी केला नाही. कारण त्या नुसत्या शब्दांनीच यांच्या शिक्षेची आठवण होऊन मला धस्स झाली!

प्रथम प्रथम नुसत्या शाळेतील पगारावरच आम्हाला गुजराण करावी लागत असल्याने तो अगदी अपुरा पडे. त्यामुळे त्यांना खर्च भागविण्यासाठी हरिभाऊ दामले यांना पुस्तके लिहिण्यास मदत करावी लागे व ती करून वर्षाकाठी शंभर-सव्वाशे रुपये त्यांच्याकडून घेत असत. प्रकृती अशक्त असल्याने औषधपाणी वगैरेसाठी खर्च बराच करावा लागे. पुण्याला या सर्व मंडळींचे मित्र असे एक डॉक्टर होते. त्यांचे नाव डॉ.गद्रे. त्यांना दवाखाना घालण्याच्या कामी या सर्व मंडळींची सहानुभूती होती; तेच त्यांना औषध देत असत. आपल्यासाठी दुसऱ्यांना कष्ट देणे त्यांना बिलकुल पसंत नसल्यामुळे फुकट औषध घेण्याचा त्यांना फार संकोच वाटे व मोठ्या आग्रहाने निदान औषधांच्या किंमतीइतके पैसे तरी ते डॉक्टरांना घ्यावयास लावीत. पुढेपुढे मग मुलेबाळे झाल्यावर आम्ही फी वगैरे व्यवस्थित देऊ लागलो.

मुलांच्याबद्दल त्यांना फार काळजी वाटे. मी पूर्वी सांगितलेच आहे की, आम्ही त्यांना सहसा रात्री उठवीत नसू. पण एकदा माधव- माझा धाकटा मुलगा- फारच आजारी होता. त्या वेळी तो असेल दीड वर्षाचा. मला त्याचे हातपाय गार पडल्यासारखे वाटले म्हणून मी घाबरून गेले! रात्री एकदीडची वेळ. सर्व मंडळी अगदी गाढ झोपलेली. शेजारीपाजारीही कोणास हाक मारण्यासारखी सोय नाही. मग मात्र मी जाऊन त्यांना उठविलेच. त्यांनी माधवाच्या अंगास नीट हात लावून पाहिले. माझा तो नुसता भासच होता. माधवाला काहीही झाले नव्हते. नंतर त्यांनी मला बराचसा धीर दिला. प्रकृती अशक्त असल्याने ते म्हणत, 'माझ्या मागं स्वतंत्रपणानं मुलांची काळजी घेऊन त्यांच्या सर्व गोष्टी तुलाच कराव्या लागण्याचा संभव! धीर धरून आल्या प्रसंगाला तोंड देत जावं. कोणत्याही वेळी गांगरून जाऊन दीनपणानं मदतीसाठी दुसऱ्याच्या तोंडाकडं पाहण्यात भूषण नाही.'

आम्हाला एकंदर चार अपत्ये झाली. दोन मुलगे व दोन मुली. पैकी एक मुलगी तर यांच्या हयातीतच वारली. दुसरी हे गेल्यानंतर सात आठ वर्षांची होऊन वारली. या मुलीच्या जन्माच्या वेळची गोष्ट. घरात माझी मावशी होती. त्या वेळी माझी बाळंतपणात व आजारीपणात सर्व व्यवस्था त्यांनीच केली. त्या वेळी मी जरा आजारी होते. सुखरूप सुटका झाल्याचे कळले, तेव्हा त्यांना बरे वाटले. ते नेहमी म्हणत, 'मुलांना एक आई किंवा बाप कोणीतरी पाहिजेच. दोघेही नसतील तर त्या बिचाऱ्यांचे फार हाल होतात.' आपल्या प्रकृतीमुळे ते नेहमी काळजीत असत व मुलांची सर्व जबाबदारी मी घेऊन, त्यांची जोपासना करून, शिक्षण देऊन त्यांना लहानाची मोठी मीच करावीत असे ते मला नेहमी सांगत. आपण फार दिवस वाचत नाही, मुलांची सर्व जबाबदारी आपल्या पत्नीवरच आहे, असे त्यांना वारंवार वाटे. म्हणून ते माझ्या एवढ्याशा आजाराची सुद्धा उपेक्षा होऊ देत नसत. माझा भाऊ व मी अशी दोघेही एकदा आजारी होतो. त्या वेळी घरात गडी, स्वयंपाकी सर्व होते; पण लहान माधवाला न्हाऊ घालणे, दूध पाजणे वगैरे सर्व गोष्टी ते स्वत: करीत. मुले गडीमाणसांच्या हवाली करण्याचा प्रघात त्या काळी इतकासा नव्हता व तो त्यांना पसंतही नव्हता. त्या वेळी पंधरावीस दिवस या कौटुंबिक अडचणींमुळे त्यांना शाळेतही जाता आले नाही. पुढे मग माझी आई आली आणि मग हे शाळेत जाऊ लागले.

पुण्यास राहावयाला आल्यापासून मी फार तर दोनतीन वेळा माहेरी गेले असेन. माझी आई नेहमी लेकीला माहेरी

पाठवीत नाही म्हणून नाराज असे. माझे वडील एकदोन वेळा फार तर पुण्यास आले असतील. गोपाळराव त्यांना नेहमी म्हणत, 'माझी प्रकृती ही अशी. तेव्हा मी हिला काही पाठवीत नाही. तुम्हीच इथं येऊन राहात चला म्हणजे झालं. त्यात काय आहे?' पण माझ्या आईला ते फारसे आवडत नसे. अगदीच नडीच्या प्रसंगी अशी ती पुण्याला फार तर दोनतीन वेळा आली असेल. पूर्वी आपली आप्तस्वकीय मंडळी कोणी गावी जावयास निघाली, म्हणजे त्यांना पोचविण्यास जाण्याचा प्रघात फार असे. त्याप्रमाणे माझी आई परत निघाली, म्हणजे आम्ही स्टेशनपर्यंत तिला पोचवायला जात असू. त्या वेळी मला आई निघाल्याचे दु:ख आतल्या आत दाबावे लागे; कारण हे तिथेच असत. माझी आई वारली त्या वेळी मी आजारी होते. मला एकदम धक्का बसेल; म्हणून मला त्यांनी ती गोष्ट सांगितलीच नाही! आपोआप कळेल तेव्हा कळेल, हा स्वारीचा विचार. पुढे पाचसहा दिवसांनी मला साधारण बरे वाटत असता निरनिराळ्या गोष्टी बोलता बोलता ते मला म्हणाले, 'तुझी आई फार अत्यवस्थ आहे. या यातनांपेक्षा सुटली तर बरं नाही का?' अर्थात मला तर वाईट वाटलेच, पण मीही 'बरं होईल एकदा सुटली तर!' असेच म्हटले. पण त्यानंतर रोज पोस्टमनकडे माझे डोळे लागलेले असत. शेवटी सातआठ दिवसांनी एक पत्र आले, त्यात माझ्या आईला मरून बारा दिवस झाल्याचा उल्लेख होता. मला अत्यंत दु:ख झाले; पण त्याचा आवेग मला आजारात जितका दु:सह झाला असता तितका झाला नाही.

छानछोकी आणि विलासी राहणी यांना अगदी पसंत नसे. नाटके पाहणे, फोटो काढणे अशांसारख्या गोष्टी त्यांना अगदी पसंत नसत. त्यांच्या हयातीतला काही माझा फोटो नाही. त्यांचाही पण काही निमित्ताने फोटो निघाला तरच आणि तोही अगदी दुर्मीळ! उभ्या आयुष्यात फार तर दोन अगर तीन वेळा त्यांचा फोटो निघाला असेल! त्यांच्या प्रसिद्ध असलेल्या फोटोची हकीगत मोठी मजेशीर आहे.

ग्वाल्हेरला केतकर म्हणून कोणी एक गृहस्थ होते. त्यांचा मुलगा यांच्या हाताखाली शिकण्यासाठी होता. त्याची इच्छा आपण मेकॅनिकल अभ्यासक्रम घ्यावा अशी, तर त्याच्या वडिलांची व आईची इच्छा याने वकील होऊन ग्वाल्हेर दरबारी वकिली करावी अशी. त्यासाठी मुलाचे मन वळवा म्हणून यांना पत्रांवर पत्रे येत. तो मुलगा अगदी लहानपणापासून यांच्या हाताखाली शिकत होता. आमच्या मुलांप्रमाणेच तोही यांना 'बाबा' म्हणे. सुधारक वर्तमानपत्र सुरू करताना छापखान्याची सर्व मांडणी यानेच केली होती. कित्येक प्रसंगी यंत्रांच्या नादुरुस्तीमुळे हताश होऊन आता अंक निघत नाही असे वाटे; त्या वेळी चालचलाऊ दुरुस्ती करून अंक वेळेवर प्रसिद्ध करण्याची कामगिरी या छोट्या मेकॅनिकल इंजिनियरने केलेली मला आठवते. यांना आपले विद्यार्थी बरोबरीने पुढे यावेत व त्यांनी आपले कार्य पुढे ढकलावे, असे फार फार वाटे.

तेव्हा एकदा काय झाले, की या मुलावर यांचे फार प्रेम व त्याचेही पण यांच्यावर. तो आपला जाताना 'मला तुमचा फोटो पाहिजे व मी तो घेऊनच जाणार' म्हणून हट्ट धरून बसला. त्या वेळी त्यांनी त्याच्या आग्रहासाठी म्हणून आपला फोटो काढू दिला. अलीकडे प्रसिद्ध असलेले त्यांचे बहुतेक फोटो याच फोटोच्या प्रती होत. यापूर्वी त्यांचे आणखी एकदोन ठिकाणी फोटो होते. ते म्हणजे एक ते डेक्कन कॉलेजमध्ये फेलो असल्यावेळचा व एकदा फर्ग्युसन कॉलेजमध्ये सर्वांचा एक फोटो काढला होता तो दुसरा! उभ्या आयुष्यात त्यांचे तीन फोटो निघाले. त्यापैकी पहिले दोन अगदीच अप्रसिद्ध आहेत. तिसऱ्या प्रसंगी आम्हा सर्वांचाच फोटो काढावयाचे ठरले होते; पण त्या दिवशी आम्ही कोठेतरी जेवावयाला गेलो असल्याने ती गोष्ट तशीच राहिली.

पुण्यात टिळक व हे वारंवार रानड्यांना भेटत. रानड्यांबद्दल यांना फार आदर वाटे. भावी आयुष्यात देशकार्याला वाहून घेण्याबद्दलचा सल्ला रानड्यांचा होता व त्यांच्याच सल्ल्याचा पुढेही उपयोग करून घेण्याचे यांनी ठरविले होते. रानड्यांबद्दल ते नेहमी माझ्यापाशी मोठ्या आदराने बोलत व म्हणत, 'पुण्यात काय किंवा सबंध महाराष्ट्रात काय, पुष्कळ लोक शिकून मानाच्या व अधिकाराच्या जागावर चढलेले आहेत; पण ते सर्व कोणी आपली संपत्ती वाढविण्याच्या खटपटीत आहेत, तर कोणी बायकामुलांत गुंग आहेत. पण रानड्यांच्या घरी आपलं केव्हाही या, देशोन्नतीचे विचार, चर्चा आणि तळमळ

यांविषयी त्यांच्या आपल्या काहीतरी योजना सुरू आहेत.' त्यांच्याकडे सतत लोकांची ये-जा सुरू असे. नाना लोक नाना तऱ्हांनी देशाच्या उन्नतीच्या कार्यात त्यांचा सल्ला घेण्यास येत असत. त्यांना केव्हाही पाहावे, देशकार्यांच्या गोष्टी करण्यातच गढून गेलेले दिसत ते. त्यांचा हा आयुष्यक्रम पाहून यांना आपला आजार व प्रापंचिक गोष्टींत फार वेळ जातो म्हणून फार हळहळ वाटे.

माझ्या वडिलांना गोपाळरावांच्या संबंधी फार आदर वाटे व थोडीशी भीतीही पण वाटे. त्यांना वाटे, ही सुशिक्षित मंडळी, जर आपण आपल्या जुन्या मतांप्रमाणे काही करावयास गेलो व यांना पसंत पडले नाही, स्वारी खवळली; म्हणजे उगीच अपमान व्हायचा! आणि या विचाराने मला भेटण्याची त्यांना इच्छा असूनही ते पुण्याला येण्याचे टाळीत. पण एकदा काही निमित्ताने त्यांना पुण्यास यावेच लागले व तो समज साफ चुकीचा असल्याचे त्यांना कळून आले. यांनी त्यांना अगदी योग्य सन्मानाने व आदराने वागविले. वडील माणूस, मग ते कोणीही असो, त्याचा आदरसत्कार केलाच पाहिजे अशी त्यांची समजूत होती व तशी सवयही पण त्यांनी आपणाला लावून घेतली होती. सुधारकपणा म्हणजे वडील मंडळींचा अनादर ही कल्पना त्यांना कधीही पटली नसती. ही अगदी अलीकडे होऊ लागलेली चुकीची समजूत आहे. ते नेहमी म्हणत, 'आपल्याला नवीन पिढीशी काम. ही जुनी माणसं आपल्या काहीही कामाची नाहीत, उपयोगाची नाहीत. तरीपण जरा तंत्रानं घेतल्यास निदान आपल्या कार्यात अडथळा तरी ती करणार नाहीत. मग उगीच त्यांचा अनादर करून त्यांची मनं तरी का दुखवा?'

●●●

## ४. आगरकर - पती, पिता, शिक्षक

माझे धाकटे भाऊजी दामोदरराव यांचे शिक्षण पुण्यालाच आमच्याकडे झाले. मॅट्रिक झाल्यानंतर पुढे आपणास झेपणार नाही म्हणून त्यांनी शिकण्याचे सोडून दिले. पुढे गोपाळरावांनी त्यांना तारखात्यात नोकरी लावून दिली. परंतु रात्रपाळी, दिवसपाळी या कटकटी आणि शिवाय सुटी नाही, यामुळे त्यांची प्रकृती खालावली आणि नोकरी सोडून ते पुन्हा पुण्यास येऊन राहिले. त्या वेळी ती सर्व हकीकत ऐकून सुधारकातून रेल्वेच्या कार्यपद्धतीवर सडकून टीका केली व नोकरांना वागविण्याच्या पद्धतीत सुधारणा करावी, असे लिहिले. तेव्हापासून पुढे रेल्वे-कामगारांना महिना दीड महिना सुटी मिळू लागली. नाहीतर अगोदर त्यांना कधीच सुटी नसे! आम्ही आमचे सामान उंब्रजहून पुण्यास पाठविले, त्या वेळचा असाच एक प्रसंग. सामानाची नासधूस होते, पार्सले वेळेला मिळत नाहीत इत्यादी टीका सुधारकातून त्यांनी नुकतीच केली होती आणि त्याचाच उपयोग आम्हाला झाला. कारण स्टेशन-मास्तरने सामानावरील नाव वाचून त्याची पार्सले व्यवस्थितपणाने व जलद आमच्या स्वाधीन केली.

भाऊजींना पुढे दत्तोपंत भागवतांनी बोलावून घेऊन त्यांना नोकरी दिली, त्या वेळी मी यांना म्हणाले की, 'मामांनी दामूला नोकरी लावून दिली तीच पाचसहा वर्षांपूर्वी दिली असती; तर इतकी यातायात ती कशाला पडली असती व त्याची प्रकृती तरी कशाला बिघडली असती?' त्यावर हे म्हणाले, 'हे मी काय सांगणार? त्यांना आता वाटलं, त्यांनी आता दिली.' यांच्या मोठमोठ्या ठिकाणी ओळखी होत्या, त्या वेळच्या मानाने मॅट्रिकपर्यंत शिक्षण म्हणजे काही कमी नव्हते. त्यांनी शब्द टाकला असता, तर सहज पाचपन्नास रुपयांची नोकरी मिळाली असती. पण आपल्या भावासाठी शब्द या विचाराने किंवा काही म्हणा, पण त्यांच्याने भावाला नोकरी लावून देण्याची खटपट झाली नाही. अखेर मामांना ती कामगिरी करावी लागली.

याच दामोदरभाऊजींची आणखी एक गोष्ट सहज आठवली म्हणून आता सांगते. यांच्या मरणानंतर पाचसहा दिवसांनीच हे मला घेऊन पुण्याहून अकोल्यास जाण्यास

निघाले. वाटेत फारच हाल आणि त्रास झाला. माधवाला भूक लागली, तो रडू लागला, तेव्हा तिथल्या एका स्टेशनवर कोणी एक आगरकर होता, त्याने दूध घेऊन आणले. अकोल्याला अचानक आम्ही आलेले पाहून सर्व मंडळींना मोठे आश्चर्य वाटले. कारण त्या सर्वांची कल्पना आम्ही बारावा दिवस आटोपून येऊ अशीच होती. पण आम्ही आपले दत्त म्हणून हजर!

दत्तोपंत भागवत म्हणाले की, 'क्रियाकर्मांतर आटोपून यायचं सोडून असं एकदम काय आलात?' त्यावर मी भाऊजींच्याकडे बोट दाखविले, भाऊजींनी लोणकडी थाप दिली की, 'वहिनी म्हणाल्या, की त्यांना क्रिया वगैरे करणं पसंत नसल्यानं चला आपण तसेच जाऊ.' वास्तविक पुण्याहून निघताना 'आपण वाटेत नाशकाला क्रिया वगैरे उरकून घेऊ' असे तेच मला म्हणाले होते. असो. अशा रीतीने आम्ही येथे आल्यावर जगरूढीप्रमाणे सर्वांनी बारावा दिवस करण्याचे ठरविले. त्या वेळी तर या दामूभाऊजींनी अगदी कहरच केला! 'वहिनीनं मला खोटं ठरविलं' म्हणून स्वारीने आकांडतांडव सुरू केले! मला नाही नाही ते फाडफाड बोलू लागले. इकडे ब्राह्मण जेवावयास बसण्याची वेळ झाली, तरी आपला घरात हा धिंगाणा! शेवटी त्यांना एका खोलीत कोंडून घालून दत्तोपंत भागवत व महाजनी असे दारात उभे राहिले. त्यांना कोंडून घालणे भागच पडले. कारण ते म्हणू लागले की, 'मी ते पिंडच खाऊन टाकतो मुळी! मला खोटं ठरवितात काय? मी जेवणार नाही, भावाचे पिंडच खाऊन राहणार!' अशा रीतीने आल्या प्रसंगातून आम्ही कसेबसे पार पडलो. श्राद्धाबद्दल त्यांनी मरताना काही सांगितलेले मला आठवत नाही. सोवळे न घेण्याबद्दल त्यांनी मला निक्षून सांगितले होते आणि मलाही त्यांचे म्हणणे पटले होते व त्याप्रमाणेच वागण्याचे मी ठरविले.

अशीच माधव लहान असतानाची गोष्ट. त्या वेळी मी बरीच आजारी होते. डॉक्टरांनी हवापालट करण्याचा सल्ला दिला. त्या वेळी मी त्यांना म्हटले, 'एवढे सर्व लोक हवापालट करा म्हणताहेत, तर जाऊ या. दुसरीकडं कुठं जाण्यापेक्षा अकोल्याला दत्तोपंत बोलावताहेतच, त्यांच्याकडंच जाऊन येऊ चार दिवस.' त्यांनी ते मान्य केले आणि आम्ही सर्वजण अकोल्याला गेलो. दत्तोपंतांनी यांची चांगली उत्तम व्यवस्था ठेवली होती. सकाळी त्यांच्या मळ्यात घोड्यावरून किंवा पायी फिरावे, थकल्यासारखे वाटल्यास बसून परत येण्यासाठी मागोमाग ते टांगा पाठवीत असत. त्या वेळी आमची ही दोन मुले व दत्तोपंतांची मुले एकदा वनभोजनास गेली. सर्व मुलांना अगदी कडकडून भुका लागल्या होत्या. एका झाडाखाली फराळाचे सामान ठेवून मुले आपली वाटण्या होण्याची वाट बघत बसली होती. आमच्या माधवाने आपला डबा सोडला व लाडू घेऊन एका कोपऱ्यात बसून खुशाल खाण्यास सुरुवातही केली. तेव्हा घरी आल्यावर मला हे म्हणाले, 'काही म्हण, माधव काही उपाशी मरणार नाही. वाटेल ते करून स्वत:च्या पायावर उभा राहील आणि आपलं पोट भरील.' आणि त्यांचे खरे ठरलेही! यशवंता बिचारा अशक्त, तो अगदी मऊ व भिऊन असे. माधवाचे सर्व काही याच्या उलट! त्यामुळे आम्हा सर्वांना यशवंताची विशेष काळजी वाटे आणि त्याच्यावर सर्वांचे लक्ष असे!

हे आपल्या लहानपणच्या काही गोष्टी सांगत. त्या आता सहजासहजी आठवल्या म्हणून सांगून टाकते. लहानपणी हे अतिशय व्रात्य आणि हूड होते. नेहमी धांगडधिंगा, खेळ, झाडावर चढणे, नदीत डुंबणे असा यांचा क्रम सुरू असे. एकदा असेच एका झाडावर ते चढले असताना मागाहून एका वानराने येऊन यांना पकडले.

झाले! आता काय करावे? मोठी पंचाईत पडली! तो वानर आल्याबरोबर खालची सर्व मुले भिऊन पळून गेली. हे आपले झाडाची फांदी धरून मुकाट्याने बसले. 'गोपाळला वानरानं पकडलं' म्हणून पोरांनी गावात गिल्ला केल्यावर दहापाच माणसे काठ्या वगैरे घेऊन आली व त्यांनी वानराला हुसकून लावल्यावर स्वारीची सुटका झाली! 'अंगी धीटपणा होता म्हणून बचावलो; नाहीतर झाडावरून पडून काही बरंवाईट होण्यास वेळ नव्हता!' असे ते नेहमी म्हणत.

यांचे मामा दत्तोपंत भागवत आणि हे मामा-भाचे, पण दोघांचे संबंध म्हणजे लंगोटी- मित्रासारखे. दोघांची भांडणेही नेहमीचीच. घरची गरिबी असल्याने यांचे बालपण आपल्या मामांच्या घरी कऱ्हाडासच गेलेले. यांचे वडील लहानपणी म्हणजे वयाच्या अगदी बाराव्या वर्षीच आपल्या आईवडिलांबरोबर काशीयात्रा करून आले होते. त्यांनी

आपली शेतीभाती पाहावी व परड्यातील फुले-तुळशी आणून लक्ष्मीनारायणाची पूजा करावी हा त्यांचा कार्यक्रम. लोक त्यांना नेहमी थट्टेने म्हणत, 'अण्णा आपले काशीला गेले आणि काशीविश्वेश्वराच्या पायावर आपली लेखणी वाहून आले.' गोपाळरावांच्या मातोश्रीही अगदी भाविक आणि देवभोळ्या होत्या. कऱ्हाडला ज्या ज्या वेळी मामा-भाच्यांची भांडणे होत, त्या त्या वेळी गोपाळराव म्हणत, 'ये तरी टेंबूला आमच्या देवळात, म्हणजे सांगतो काय ते! चांगला झोडपून काढतो. इथं काय तुझंच घर आहे, नाहीतर दाखविला असता इंगा!' मामाही पण त्यातलेच! लगेच दोघेही टेंबूला येत व देवळात खूप भांडत. तिथे कोण येणार सोडवायला? भांडण भांडून थकल्यावर समेट करून आपोआप दोघे घरी येत झाले!

घरची गरिबी, पण यांना भावंडे मात्र अकराजण. आठ बहिणी व तीन भाऊ. त्यांपैकी आठही बहिणी लवकर लवकरच वारल्या. शेवटी हे तिघे भाऊ मात्र राहिले. वडील बंधू मॅट्रिकपर्यंत शिकून साधू झाले, दुसरे हे व तिसरे दामू-भाऊजी! मोठ्या मुलाने आपल्या आकांक्षा विफल केलेल्या पाहून माझ्या सासू-सासऱ्यांना धक्काच बसला होता. त्यामुळे या दोन मुलांच्याबद्दल ते अगदी उदासीन होते आणि तशी परिस्थितीही होती म्हणा. माझ्या सासूबाई म्हणत, 'गोपाळच्या शिक्षणासाठी आम्ही सारे आठ आणे खर्च केले. त्यानं आपल्या हिमतीवर एवढं सारं शिक्षण केलं. त्याला अमुक कर आणि तमुक कर हे सांगण्याचा आम्हाला काय अधिकार? त्याच्या मनानं काय करायचं ते तो करील.'

यांनी आपल्या मातापित्यांची सेवा अत्यंत मनोभावाने केलेली आहे. एके प्रसंगी सासूबाईंचे दिवस भरलेले होते. घरातली गरिबी. टेंबू गाव असा की, काड्याची पेटी म्हटली की कऱ्हाडास यावे लागे! बाजेसाठी कोरा सुंभ आणावयास पाहिजे होता. स्वारी कऱ्हाडाहून सुंभ घेऊन नदीतीरावर आली, तर करकरीत तिन्हीसांज झाली. परत कऱ्हाडास जावे म्हटले, तर फिरून दोन मैलांचा हेलपाटा! टेंबूला यावे, तर नदीला पाणी आलेले! तशात तिन्हीसांजची वेळ! कर्मधर्मसंयोगाने त्याच वेळी सासूबाई नदीवर पाण्यास आल्या होत्या, त्यांनी मोठमोठ्याने हाका मारून नावाड्यास पाठवून देत असल्याचे सांगितले. नंतर वडिलांनी नावकरी आणून मुलाला नदीपार करून घरी आणले. अर्थात हे पोहणार तरबेज असल्याने आक्का नदीवर दिसल्या नसत्या; तर स्वारी खास तो सुंभाचा बिंडा घेऊन पोहून आली असती. नावाड्याने अवेळी नाव पाण्यात घालून यांना नदीपार आणल्याबद्दल त्याला दुसरे दिवशी जेवण व पोषाख देण्यात आला.

यांच्या शिक्षणासाठी आठ आणे खर्च झाले असे मी मागे म्हटले आहे, ते यांना रत्नागिरीला यांचे चुलते डे.ए.इन्स्पेक्टर होते त्यांच्याकडे जाताना बरोबर गडी दिला होता, त्यासाठी! हे गृहस्थ मोठे कडक व हट्टाग्रही असावे. यांनी आपल्या आयुष्यात काकांसंबंधी कधीही अनुदारपणाने उद्गार काढले नाहीत. फक्त काकूच्या स्वभावाची मात्र वारंवार तारीफ करीत. ते काकांपाशी फार दिवस राहू शकले नाहीत. त्यावरून व त्यांनी थालीपिठाची जी गोष्ट सांगितली त्यावरून मी काकांच्या स्वभावाबद्दल वरील अनुमान केले आहे. मला त्यांनी हकिकत सांगितली ती अशी -

'माझ्या काकांच्या घरी एक स्वयंपाकी ब्राह्मण होता. काकू काही घरी नव्हती. बाळंतपणासाठी की आणखी काही कारणासाठी ती माहेरी गेली होती. त्या स्वयंपाक्याने घरातून भाजणी हुडकून काढून आपल्यासाठी व माझ्यासाठी म्हणून एक थालीपीठ लावले. इतक्यात काका बाहेरून आले. हा खर्च विनाकारण का केलास, असे म्हणून काका त्याला खूप बोलले व थालीपीठ लाथेने उडवून दिले. आम्हा दोघांच्या पोटात थालीपीठ काही गेले नाही.!'

रत्नागिरीला हे फार दिवस राहिले नाहीत. तेथून आल्याबरोबर लगेच ते अकोल्यास गेले व तेथेच मॅट्रिकची परीक्षा पास झाले.

ज्या वेळी हे एम.ए. व यांचे मामा दत्तोपंत भागवत बी.ए. झाले, त्या वेळी गावातल्या मंडळींना मोठाच वचक बसला! कारण त्या वेळी बी.ए., एम.ए. झालेला मनुष्य तत्काळ मुनसफ, मामलेदार होत असे. खेड्यातील लोकांच्या नाना भानगडी असतात. यांची शेती, घर, जागा यांबद्दल गावकऱ्यांशी यांच्या वडिलांच्या नेहमी कटकटी सुरू असत. तेव्हा ते म्हणत, 'थांबा! मुलगा मामलेदार व मेव्हणा मुनसफ

म्हणून येईल, मग पाहतो मला कसा त्रास देता ते, अर्थात त्या दोघांनी त्यांचे सर्व मनोरे हवेतलेच ठरविले ती गोष्ट निराळी! यांनी त्याच वेळी आपल्या आईला पत्र लिहून आपल्या त्यागमय व खडतर भावी आयुष्याची कल्पना करून दिली आणि आपला मुलगा पुष्कळ पैसा मिळवून मोठा श्रीमंत होईल अशी आशा न करण्याबद्दल लिहिले.

फर्ग्युसन कॉलेजची इमारत नुकतीच बांधून पुरी झाली होती, तिचा उद्‌घाटनसमारंभ व्हावयाचा होता. त्या वेळी आम्हाला यांनी अगोदरच आत बसवून दिले होते. बाकीच्या मंडळींना हे तितकेसे रुचले नाही; तेव्हा हे म्हणाले, 'हा उद्‌घाटनसमारंभ औपचारिक आहे. गव्हर्नरसाठी पुढच्या दरवाजानं कुलूप उघडतील, ही मंडळी मागील दारानं आत येऊन बसली तर बिघडलं कुठं?'

एकदा कॉलेजमध्ये असेच कोणी एक मोठे गृहस्थ कॉलेज पाहण्यास येणार होते. त्या वेळी यशवंत आणि माधव यांना कपडे घालून पुढे जाण्यास सांगितले होते; कारण त्यांनी 'आम्ही येतो, आम्ही येतो' म्हणून सारखी मागे भुणभूण लावली होती. मुलांनाही समारंभाचे कौतुक असतेच. आमच्या घरापासून साधारणपणे हाकेच्या अंतरावर एक पाट होता. त्यावरून कॉलेजाकडे जाण्यासाठी पूल बांधून एक रस्ता केला होता. आणि दुसरीकडे जवळ पडावे म्हणून लोकांनी फळ्या टाकून एक तात्पुरती वाट तयार केली होती. माधव म्हणे, 'पुलावरून जाऊ.' पण यशवंत म्हणाला, 'चल तिकडून, मी तुला धरून नेतो म्हणजे चटकन जाऊन पोचू.' ते त्या फळीवरून निघाले, परंतु पायातील बूट घसरून दोघेही खाली पाटात पडले! यशवंत त्या वेळी असेल आठनऊ वर्षांचा व माधव तीनचार वर्षांचा! पाटात साधारण मोठ्या माणसाच्या गुडघ्याइतके पाणी होते. पडल्याबरोबर यशवंत उठून उभा राहिला व त्याने माधवलाही चटकन धरून उठविले. दोघांच्याही टोप्या पाण्यावरून वाहात चालल्या होत्या पुढेपुढे! तिकडून कॉलेजमधील दोन विद्यार्थी जात होते, त्यांनी त्या टोप्या काढून आणल्या. थोड्या वेळाने कॉलेजचा शिपाई या दोघांना चिखलाने भरलेले व रडत असलेले घेऊन आला. त्यांनी काय झाले म्हणून विचारताच यशवंताने पाटात पडल्याची हकीकत सांगितली. यामुळेच की काय कोण जाणे, पण त्यांच्या मनाला फारच उदास वाटले. ते समारंभाला काही गेले नाहीत. ते म्हणत, 'दैवयोगानं पाटाला पाणी कमी होतं म्हणून ठीक, मुलं वाचली, आणि त्यातल्या त्यात यशवंता होता म्हणून माधव तरी वाचला!'

मुलांना अगदी लहान वयात शाळेत डांबून टाकण्याची पद्धत यांना मुळीच पसंत नसे. त्यामुळे यशवंताकरिता एका मास्तरांची शिकवणी ठेवण्यात आल्याचे मी मागेच सांगितले आहे. मुलांनी मास्तरांचा आदर ठेवावा, यासंबंधी ते अगदी दक्ष असत. या मास्तरांचे नाव 'रानडे' असे असून ते यांच्याच शाळेत मास्तर होते. यांना कॉलेजमध्ये नेण्यासाठी व तेथून परत आणण्यासाठी एक घोड्याची गाडी असे. सर्वांनाच घोडागाडीसाठी म्हणून पंधरा रुपये अधिक मिळत, म्हणून यांनी घरीच घोडागाडी ठेवली होती. तेव्हा मधूनमधून गाडी रिकामी असल्यास यशवंताला हे म्हणत, 'यशवंत, मास्तरांना गाडीतून घरी पोचवून ये बरं.' ते बहुतेक त्यांना गाडीतूनच घरी पोचवीत. असेच एकदा मास्तरांना पोचविण्यासाठी म्हणून यशवंत गाडीतून गेला. मास्तर गावात राहात व वेळही बराच आहे असे वाटल्याने त्यांनी बंडगार्डनवरून असे मोठे चक्कर घेण्याचे ठरविले. आमच्या यशवंताला घोडागाडीची फार हौस! त्याच्यापुढे तो जेवणही विसरून जात असे! तेव्हा त्या दिवशी साहजिकच त्याला परत यायला रात्री चांगले नऊ साडेनऊ झाले! आमचा जीव सारखा खालीवर होत होता! उशिराबद्दल काही फारसा प्रश्न नव्हता; पण घोडी नवीन व बुजरी असल्याने नाहीनाही त्या शंका मनात डोकावत होत्या! म्हणतात ना, 'मन चिंती ते वैरी न चिंती.' शेवटी यशवंत आला एकदाचा. त्यावर यांनी विचारले, 'का रे, इतका वेळ लागला?' त्यावर त्याने आपले सरळ सांगितले 'मास्तर म्हणाले, आज जरा वेळ आहे, घेऊ जरा मोठी चक्कर म्हणून. त्यामुळं वेळ झाला.' त्यावर हे जरा रागातच असल्याने बोलून गेले, 'तू मूर्ख आणि तुझे मास्तर महामूर्ख!'

दुसरे दिवशी नेहमीप्रमाणे संध्याकाळी मास्तर शिकवावयास आले. त्यांना काल उशीर झाला असेल ही कल्पना होतीच; म्हणून त्यांनी येताच विचारले, 'काय रे यशवंत, काल बाबा रागावले का उशिराबद्दल?' यशवंताने 'होय' म्हणून सांगितले. स्वाभाविकच त्यांनी काय काय

म्हणाले म्हणून विचारले. यशवंताला कोठला एवढा पोच आणि मागचापुढचा विचार! त्याने अगदी सरळ सरळ सांगितले, 'तू मूर्ख व तुझे मास्तर महामूर्ख म्हणाले' म्हणून!

मुलांवर रागावण्याचे, बोलण्याचे प्रसंग त्यांना क्वचितच येत म्हणा अगर ते आणीत म्हणा, पण एकदा तो भर ओसरल्यानंतर मात्र त्यांना दिवसभर त्याबद्दल वाईट वाटे. रागाच्या वेळी बोलून जात, प्रसंगी दोनचार चापट्याही देत; पण मागाहून मात्र हळहळत बसत! यशवंताला गणित काही केल्या येत नसे. त्या वेळी कधीकधी हे स्वत: त्याला उदाहरणे सांगत, समजावून देत; पण त्याच्या काही लक्षात येत नसे! मग रागावून एकाददुसरी चपराक देत; पण मग दिवसभर ती गोष्ट ते मनाला लावून घेत व मला म्हणत, 'त्याला समजलं नाही यात त्याचा काय दोष? उगीच मारायला नको होतं मी!'

असाच एक रामनवमीचा प्रसंग. पुण्यात दाजीबा गोखले या नावाचे एक गृहस्थ होते. त्यांच्या घरी आमच्या मुलांच्या बरोबरीची मुले असत. यशवंत त्यांच्याकडे जाण्यासाठी कसा अगदी उत्सुक असे. पुढे आम्ही माळावर अगदी एकलकोंडे राहावयास लागल्यापासून मुलांना करमत नसे. त्यामुळे त्यांना बरोबरीच्या मुलांत जावे, खेळावे असे वाटणे साहजिकच होते. त्याप्रमाणे यशवंताने 'आज रामनवमी आहे, मी जाऊ का गोखल्यांकडे?' म्हणून मला विचारले. मीही 'जा' म्हणून सांगितले. त्या वेळी यांच्याकडे कोणी एक दुसरे गृहस्थ आले होते. यशवंत बाहेर निघालेला पाहून त्यांनी त्याला हाका मारल्या व त्याच्या दंडाला धरून म्हणाले, 'कुठं निघालास रे?' त्यावर तो रडतरडत म्हणाला, 'दाजिबांकडं.' 'तुला मी हाका मारतोय आणि न ऐकता, न विचारता निघालास काय?' असे म्हणून यांनी त्याच्या दोन तोंडात दिल्या! त्यावर त्याने 'मी आईला विचारलं होतं; तिनं जा म्हणून सांगितलं म्हणून निघालो!' असे सांगितले. त्यावर त्यांना इतके वाईट वाटले, की त्याची समजूत करून आपण स्वत: त्या तसल्या उन्हातून त्याला घेऊन दाजीबांच्या घरी गेले.

एकदा असेच सासूबाईंनी मला पोथीला घेऊन जाऊ का म्हणून गोपाळरावांना विचारले. त्यावर ते म्हणाले, 'आक्का, अद्यापि पोथ्या पुराणाला जाण्याइतकं हिच वय झालं नाही. तू एकटीच जा आपली.' यांना पोथ्यापुराणाला जाण्याबद्दल मुळीच आवड नव्हती. त्यातल्या त्यात गृहकृत्यात दुर्लक्ष करून पोथ्यापुराणे आणि व्रतेउद्यापने केलेली त्यांना बिलकुल पसंत पडत नसत! यांना स्वत:ला कीर्तनाला जाणे मात्र आवडे. पुण्यात हनुमानजयंतीचा उत्सव फार. ठिकठिकाणी मारुती, त्यामुळे जिथे चांगला हरिदास असेल तिथे हटकून हे कथेला जावयाचे. तसेच इतर वेळीही कोणी चांगला हरिदास आल्याची बातमी यांच्या कानावर आली की, हे हर प्रयत्नाने त्याची कथा ऐकून येत.

हे आपल्या एम.ए. परीक्षेच्या वेळची गोष्ट नेहमी सांगत. एम.ए. होण्यास सामान्यपणे दोन वर्षे लागत; पण हे म्हणत, 'मी एकाच वर्षात सर्व अभ्यास करून परीक्षा देणार' आणि त्याप्रमाणे त्यांनी परीक्षकांना कळविलेही. पण त्यांनी यांना 'तुम्ही परीक्षेला बसा, पण आम्ही काही तुम्हाला पास करणार नाही; उद्या प्रत्येकजण आपला एक वर्षात एम.ए. होतो असं म्हणू लागेल!' असे कळविले. ठरल्याप्रमाणे हे परीक्षेला बसले; पण त्याचा उपयोग झाला नाही! तेव्हा फिरून दुसऱ्या वर्षी बसले आणि पास झाले.

परीक्षेच्या आधी दोनच दिवस यांना इतका दमा लागला की, जागचे उठताही येईना! आता परीक्षेला काही बसता येत नाही असेच सर्वांना वाटत होतं. पण यांचा निश्चय म्हणजे अगदी अढळ! हे म्हणाले, 'काही झालं तरी परीक्षेला बसणारच!' शेवटी कसेबसे मुंबईला पोचले, त्या वेळी मुंबईला कोणीएक गृहस्थ राहत असत (मला त्यांचे नाव आता आठवत नाही) त्यांच्याकडेच हे उतरत. हे गृहस्थ जिथे राहात, त्याच्याच मागच्या बाजूला अण्णासाहेब पटवर्धन राहात असत. त्यांनी यांना अण्णासाहेबांकडे नेले आणि 'उद्या परीक्षेला बसायचं आहे, हा दमा तर असा आहे, तेव्हा काही औषध द्या' असे सांगितले. अण्णासाहेबांनी 'बरं आहे, देतो हं' असे म्हणून एक औषधी आणून दिली. तिने यांना चांगले बरे वाटले. दुसरे दिवशी पेपर वगैरे चांगले गेले. या प्रसंगाने त्यांचा अण्णासाहेबांवर विश्वास बसला. अण्णासाहेब म्हणजे त्या वेळचे प्रसिद्ध वैद्य आणि डॉक्टरीची परीक्षा पास झालेले कुशल डॉक्टर होते. या वेळेसारखाच श्वास त्यांना फिरून एकदा लागला होता,

त्या वेळी कॉलेजमध्ये काही समारंभ होता. तेव्हा अण्णासाहेबांनी दिलेले औषध शिल्लक होतेच; ते घेतल्यावर यांना तात्पुरते बरे वाटले आणि ते त्या समारंभालाही हजर राहिले. अतिशय दमा वाढेल त्याचवेळी ते औषध वापरा, असे त्यांनी मला सांगितले होते. यानंतर अण्णासाहेबांनी एक काढा चार महिने दिला, पण काही गुण आला नाही.

गोखले या सर्व मंडळींत वयाने लहान आणि दिसायलाही जरा पोसवदाच. त्यांनी आपली पहिली बायको टाकली होती. त्या वेळी ते पुण्यास एकटेच राहात असता म्हणत, की 'गोपाळराव, मी तुमच्या शेजारी राहावयास येतो. मला एकटं राहण्याची भीती वाटते! तुमच्या सहवासाला असलो म्हणजे, मला काही भीती नाही. माझ्याबद्दल कोणी आक्षेपही घेऊ शकणार नाही.' त्यावर हे म्हणत, 'लोक काही म्हणोत, आपण शुद्ध असलो म्हणजे लोकांचे आक्षेप टिकत नाहीत.' पुढे लवकरच गोखले आमच्याशेजारी राहावयास आले.

प्रिन्सिपॉल आपटे यांच्याआधीच तीनचार वर्षे वारले, त्या प्रसंगी आम्ही त्यांच्या घरच्या मंडळींकडे समाचारास म्हणून गेलो होतो. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई. त्यांचे यांनी जरा सांत्वन केले. पुढे बरेच दिवस या सोवळे न घेता होत्या, परंतु वर्षश्राद्धाच्या दिवशी त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांना ते घ्यावयास लावले. त्यानंतर एकदा हे आपट्यांच्या घरी गेले असता रमाबाई नेहमीप्रमाणे पुढे येऊन यांच्याशी बोलल्या नाहीत, जरा आडूनच बोलल्या. यांच्या मनात एकदम वस्तुस्थितीची कल्पना आली, डोळ्यांत अश्रू आले व ते पुसतच उदास, दु:खी मनाने ते घरी परत आले. घरी आल्यानंतर मला रमाबाईंच्या सोवळ्याची हकीकत त्यांनी सांगितली. ती सांगताना त्यांना फारच दु:ख झाले व म्हणाले, 'आता यापुढं काही मी त्यांच्या घराकडं फिरकणार नाही' आणि खरोखरच मरेपर्यंत ते तिकडे गेले नाहीत! मला यापूर्वीच त्यांनी या रूढीचा हा रानटीपणा समजावून दिला होता आणि माझ्याकडून तिच्या आहारी न जाण्याचे ते वचन घेत याचे मला आश्चर्य वाटे. आपट्यांनी आपल्या बायकोला आधी परिस्थिती समजावून दिली नाही; म्हणून बिचारीवर हा प्रसंग ओढवला, असे ते म्हणत व आपट्यांना याबद्दल दोष देत.

कॉलेजच्या परीक्षांच्या वेळी कितीतरी गमतीच्या गोष्टी घडत, शिक्षणाचे चांगले परिणाम जरी अनेक असले तरी; परीक्षा म्हणजे आयुष्याची इतिकर्तव्यता अशा प्रकारची विद्यार्थ्यांत निर्माण होऊ लागलेली प्रवृत्ती त्यांना कधीच पसंत नसे. एकदा एका विद्यार्थ्याला फॉर्म मिळाला नव्हता. त्या वेळी तो घरी आला व गयावया करून फॉर्म मागू लागला. यांनी त्याला फॉर्म देता येत नसल्याचे शक्यतोपरी समजावून सांगितले, तेव्हा तो मुलगा निराश होऊन निघून गेला. आमच्या घराच्या आसपास त्या वेळी दगडाच्या खाणी होत्या. त्यांतून काढलेल्या एका दगडांच्या ढिगावर तो मुलगा हताश होऊन स्वस्थ पडून राहिला. त्या वेळचा तो देखावा त्यांनी मला मुद्दाम बोलावून दाखविला व म्हटले, 'पाहा, किती निराश होऊन गेला आहे बिचारा! या परीक्षांनी हे असंच होणार!'

हे परीक्षक असल्यावेळी एकदा एका मुलाचा पेपर घेऊन माझ्याकडे आले व म्हणाले, 'पाहा, किती सुंदर पेपर लिहिला आहे तो! अगदी जावई करून घेण्यायोग्य मुलगा आहे.' अर्थात मला इंग्रजी काय कळणार? पण त्या पेपरवर कुठेही डाग नव्हता आणि ओळी मोठ्या सुंदर आणि छान दिसत होत्या एवढे मात्र माझ्या लक्षात आले. यांची गुणग्राहकता अशा प्रकारची होती आणि यामुळेच ते आपल्या सहकाऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे जीव की प्राण होऊन गेले होते.

महाजनींचे जावई डॉ.ढवळे मुंबईला असतात. त्यांची मुलगी तेथे शाळेत शिकत असे. ती वरचेवर इकडे आलेली. त्यांची व आमची चांगलीच माहिती. क्रमिक पुस्तकांत हल्ली आगरकरांचे काही उतारे किंवा चरित्र वगैरे धडे असतात. ते समजून सांगितल्यावर या मुलीच्या मास्तरांनी सहजच आपली जास्त माहिती म्हणून सांगितले- 'आगरकरांचं आता कोणीही हयात नाही. त्यांची कीर्ती तेवढी राहिली आहे.' त्यावर ही मुलगी उठून म्हणाली, 'वाऽ मास्तर! त्यांची सर्व मंडळी मुलं-बाळं, पत्नी - सर्वजण अकोल्याला आमच्या शेजारीच राहतात. त्यांची सर्व मंडळी हयात आहेत बरं!' अशा तऱ्हेचे अज्ञान अद्यापि कितीतरी लोकांत आहे. कारण एक तर त्यांच्यामागे तितका पुढे कोणी आला नाही व त्यांच्या निधनानंतर दोनतीन

वर्षांत आम्ही पुणे सोडले ते कायमचेच!

मला तीन मावससास्वा होत्या. या तीनही चारदोन वर्षांच्या अंतराने विधवा झालेल्या बालविधवाच होत्या. यांना अशा स्त्रियांबद्दल नेहमी फार हळहळ वाटे. त्यांना शिक्षण नाही म्हणून यांचा जीव तिळतिळ तुटे. त्यातून रूढीमुळे त्यांच्यावर फारच जुलूम होई. यांच्या तीनही मावशा आपल्या कशाबशा दिवस काढीत होत्या. विधवा स्त्रियांना फारच हालात दिवस काढावे लागतात - निदान त्या वेळी तरी त्यांचे फारच हाल होत असत. यातल्या एका मावशीने काहीतरी करून दहाबारा रुपये साठविले होते. एक दिवस तिने ते यांच्याकडे दिले व म्हटले, 'गोपाळ, माझी एवढी ठेव तुझ्याजवळ ठेव आणि दरसाल व्याज देत जा.' अर्थात यांना त्यांच्या हालांची कल्पना असल्यामुळे त्यांनी ते कबूल केले व वर्षाकाठी सातआठ रुपये व्याज म्हणून त्यांना देत असत. पुढे शाळेतल्या कोणा एका मास्तरची बहीण कऱ्हाडहून पुण्याला आली. त्या वेळी त्यांनी तिच्याबरोबर 'व्याज पाठवून द्या' असा निरोप पाठविला. तिने तो आपल्या भावाबरोबर यांना शाळेत कळविला. तो यांना त्यांच्याकडून कळल्याचे मला कळताच मला फार वाईट वाटले. कारण त्यामुळे आगरकर कर्जबाजारी आहेत, असा यांच्या सहकाऱ्यांचा निष्कारण गैरसमज झाला! मला ते काही सहन झाले नाही. मी तिचे पैसे परत करण्यास सांगितले व कशासाठी घेतले होतेत म्हणून विचारले; तेव्हा त्यांनी सर्व हकीकत सांगितली व म्हटले, 'हीच बाई सुशिक्षित असती, तर हा प्रकार झाला नसता.' त्यांनी लगेच तिचे पैसे परत केले. या प्रकाराने मावशींना अत्यंत वाईट वाटले व त्यांना आपली चूक कळून आली. शिक्षण नसल्याने स्त्रियांच्या हातून अशा चुका घडतात.

माझी एक मावसबहीण द्वारकाबाई म्हणून आहे. तिच्यावरही लग्नानंतर थोड्याच दिवसांनी वैधव्याचा प्रसंग आला. आम्ही पुण्याला असताना तिचे आईबाप तिला आमच्याकडे पाठविण्यास धजत नसत. पुण्याला ती आपल्या इतर नातलगांना भेटण्यास येत असे; पण आमच्याकडे येण्यास तिला प्रतिबंध होता. त्यांना वाटे की, यांनी आपल्याही मुलीला शिकण्यासाठी व सोवळे न होण्यासाठी तयार केली तर काय करा! याचा परिणाम असा झाला की, यांना आपली कर्तबगारी दाखविण्यास सवडच मिळाली नाही. यांना नकळतच तिला एक दिवस सोवळे देण्यात आले.

अशा तऱ्हेने आम्ही सर्वांच्या दृष्टीने अगदी निराळ्या वळणाचे ठरलो होतो. यांना आपल्या नातेवाईकांत जावे, मिसळावे, असे कधीच वाटत नसे. कारण त्यांचे आणि यांचे विचार जमत नसत. यांच्या मामांच्या मुलाच्या मुंजीला मी व वेणूताई गेलो होतो. त्या वेळी तिथे वेणूताईशी कोणी सरळ बोललेसुद्धा नाही! कारण ती विधवा, सोवळे न घेतलेली आणि शाळेत जाणारी! मग काय विचारता? या गोष्टीची यांना कल्पना असल्याने हे म्हणत, 'तुम्ही काही कऱ्हाडला जाऊ नका. तिथं उगाच तुमचा अपमान होईल, तुम्हाला वाईट वाटेल. कशाला उगीच त्रास करून घेता?'

●●●

## ५. आगरकरांची अखेर आणि नंतर

पुण्याला फर्ग्युसन कॉलेजजवळच्या झोपडीत आम्ही चांगली अडीचतीन वर्षे होतो. नंतर फर्ग्युसन कॉलेजच्या इमारती बांधल्या गेल्या आणि कॉलेजजवळच प्रोफेसरांसाठी राहण्याचीही सोय करण्यात आली. आम्ही या प्रोफेसरांसाठी म्हणून बांधलेल्या बंगल्यात राहावयास गेलो. सुमारे तीनचार महिनेच आमचा मुक्काम तेथे पडला असेल. हे त्या वेळी प्रिन्सिपॉल होते. यांच्याबरोबरच एक केळकर म्हणून प्रोफेसर होते. ते इंग्लिश शिकवीत असत आणि त्यांनी त्राटिका नावाचे नाटकही लिहिले होते. ते पुण्यास गोळ्यांच्या घरी राहात असत. चहाच्या पेल्यातील वादळात ही स्वारी होती; परंतु त्या वेळी त्यांचे नाव विशेषकरून लोकांच्या पुढे नसल्याने त्यांना हे वादळ फारसे

बाधले नाही. त्यांच्या घरी जोशीराव म्हणून कोणी पाहुणे येत, त्यांना हे स्पष्ट सांगत, 'पाहा, आम्ही आपले असे आहोत. आमचा पाहुणचार घ्यावयाचा असेल, तर जरा विचार करूनच या.'

त्राटिका नाटकामुळे त्यांची आणि शाहूनगरवासी नाटक मंडळीच्या पालकांची चांगलीच दोस्ती जमली. त्यामुळे ते कंपनीत महिनोमहिने मुक्काम करीत. गोपाळरावांना हे अगदी पसंत नसे. ते वरचेवर म्हणत, 'आम्ही विद्यार्थ्यांना शिकवणार, तयार करणार, आमच्या आचरणाकडे पाहून विद्यार्थी तयार होणार. आणि मग आम्हीच जर असे नाटकी अगर व्यसनी लोकांत जाऊन राहू लागलो, त्यांच्यासारखेच झालो; तर आमच्यापासून आमचे विद्यार्थी शिकणार तरी काय? हेच का? मी आता त्यांना पत्र लिहून त्यांची चांगलीच हजेरी घेतो.' या वेळी यांचा आजार चांगलाच वाढला होता. कंपनीमधून घरी आल्यानंतर प्रो.केळकर लवकरच वारले व नंतर एक दोन महिन्यांतच हेही पण गेले!

मरणसमयी त्यांना सुखाने मरण यावे यासाठी त्यांनी एकच इच्छा ठेवली होती. आणि ती म्हणजे टिळकांशी झालेले वितुष्ट नाहीसे करणे. मी मागे सांगितलेच आहे की मुंबईच्या कामामुळे दुरावलेले संबंध फिरून जरा निकट येत. ते सारखे म्हणत, 'टिळकांशी वाकुडपणा ठेवून मला शांतपणं मरण यायचं नाही.' हे मरावयाच्या अगोदर टिळक आमच्याकडे आले, भेटले, बसले, कितीतरी बोलले आणि मगच हे गेले. त्यांच्या इच्छेप्रमाणे मरताना टिळकांशी मैत्री करून मगच हे गेले.

प्रकृती अशक्त असल्याने अनेक डॉक्टर, वैद्य यांचे औषधोपचार सतत सुरू असत. यांचे आजोबा म्हणजे आईचे वडील असेच दमेकरी व त्यातच लिव्हर वाढल्याने जलोदर होऊन मेले. तीच अवस्था आईची. त्यांच्या यातनांची पूर्ण कल्पना असल्याने यांनी शक्य त्या सर्व डॉक्टर-वैद्यांचे उपचार केले. शेवटी त्रासून अगदी हताश झाल्यावर आम्ही राहात होतो त्यांच्या पलीकडच्या बाजूला वैदू लोक राहात असत व दररोज आमच्या घरापुढून जातयेत असत, त्यांचेही औषध घेऊन पाहण्याचे ठरविले; अर्थात त्यांच्या औषधाने काहीच गुण आला नाही. पण नाकाडोळ्याच्या वैदूपासून मोठमोठ्या वैद्य-हकीम-डॉक्टरांपर्यंत सर्वांचे उपचार करून पाहिले; असे आपल्या मनाशी ते समाधान मानीत राहिले.

केळकर ज्या वाड्यात राहात, त्या गोळ्यांच्या वाड्यातच आम्ही राहावे अशी व्यवस्था मरताना यांनी करून ठेविली होती. मनुष्य गावाला जाताना जितक्या शांतपणाने आवराआवर करतो, तितक्याच शांतपणाने आम्ही कोठे राहावे, काय करावे, कसे वागावे, याची सर्व व्यवस्था त्यांनी करून ठेविली होती. त्यांनी गोळ्यांना सांगून ठेवले होते की, 'केळकरांची खाली झालेली जागा आमच्याकरिता राखून ठेवा. आमची मंडळी आता आपल्या आश्रयास राहणार आहेत.'

पुण्याला हे अत्यवस्थ असताना साठे म्हणून एक गृहस्थ नेहमी म्हणत की, 'तुम्ही औषध घ्या. तुमच्यासाठी शंभरापासून पाचशेपर्यंत वाटेल तितकी रक्कम खर्च करण्यास मी तयार आहे. पैशाच्या अडचणीमुळं औषधोपचार झाले नाहीत, असं म्हणावयास नको!' अर्थात सर्व औषधोपचार झालेले असल्याने त्यांनी ही मदत घेतली नाही. हे साठे पुण्याला आम्ही फर्ग्युसन कॉलेजच्या माळावर राहात असताना सकाळी नेहमी तिकडे फिरावयास येत, त्या वेळी रोज आमच्याकडे दहापंधरा मिनिटे बसून चौकशी करून जात. आपला असाच स्नेह जमलेला.

काही प्रसंगांवरून घरात बोलणी निघाल्यास हे मला म्हणत की, 'मानपानासाठी माणसं कित्येक गोष्टी करतात, पण आपल्या तत्त्वासाठी अपमान व लोकापवाद सहन करण्याला फार मोठं धैर्य लागतं.' बाहेर घडणाऱ्या कटकटी सहसा ते माझ्यापासून लपवून ठेवीत नसत. या कटकटींमुळे आणि जिवलग मित्र म्हणविणाऱ्यांनीच त्यांच्या कृतींचा व हेतूंचा विपर्यास करून त्यांच्यावर चढविलेल्या विषारी हल्ल्यामुळे त्यांच्या आयुष्यावर दु:खाची व उदासीनतेची छाया - काळीकुट्ट छाया सतत पसरली आणि यामुळेच त्यांचे आयुष्यही थोडेफार कमी झाले, असे म्हणण्यास मला हरकत वाटत नाही.

त्यांना शिक्षणासाठी फार कष्ट पडलेले, त्यामुळे गरिबांच्या मुलांना श्रीगणेशापासून बी.ए.पर्यंत थोडक्या खर्चात शिक्षण मिळावे यासाठी आपण हा सर्व व्याप व

यातायाती करतो, असे ते नेहमी म्हणत. मी पुढे पुण्याला राहून मुलांचे शिक्षण वगैरे करावे, असा त्यांचा मानस होता आणि त्याप्रमाणे दरमहा पंचवीस रुपये मिळण्याची आणि गोळ्यांकडे राहण्याची सोय त्यांनी मरताना करून ठेविली होती. पण पुढे लवकरच पुण्याला प्लेग आला आणि तो सतत तीन साडेतीन वर्षे राहिला; त्यामुळे आम्ही इकडे अकोल्याला आलो व इकडेच स्थायिक झालो.

प्लेगच्या धांदलीत त्या वेळी एका पेठेत प्लेग झाला की दुसऱ्या पेठेत राहावयास जाण्याची पद्धत असे व अशा प्रसंगी लोकही आनंदाने दुसऱ्यांना राहावयास देत असत. त्या वेळी गोळ्यांकडील आमचे सामान ज्यांच्या जसे हाताला लागले तसे त्यांनी ते नेले. त्यात त्यांच्या डायऱ्याही गेल्या. थोडेसे निरुपयोगी सामान तेवढे राहिले. यांची डायरी लिहिण्याची नेहमीची सवय होती; त्याशिवाय ते निजत नसत. अशा पंधरा वर्षांच्या डायऱ्या आमच्या सामानातून उचलल्या! मी उचलल्या असे म्हणते याचे कारण त्या व इतर काही महत्त्वाचे जिन्नस आम्ही नीट बंदोबस्ताने एका पेटीत ठेवले होते. पेटीतील इतर सर्व जिन्नस जागच्या जागीच राहिले आणि डायऱ्या तेवढ्या नाहीशा झाल्या! अर्थात हे काही साध्या चोराचे काम नव्हे! कोणीतरी त्यांच्या डायऱ्या नाहीशा करावयाच्या याच बुद्धीने त्या उचलल्या असल्या पाहिजेत. डायऱ्या गेल्यामुळे कोणी काहीही त्यांच्यासंबंधी लिहावे, बोलावे, पसरवावे अशी स्थिति झाली आहे.

आम्ही गोळ्यांच्या आश्रयाला असताना त्यांची एक म्हातारी आजी होती. तिला माझे तेथे राहणे बरे वाटत नसे. म्हणून माझे मामेसासरे दत्तोपंत भागवत मला दुसरीकडे बिऱ्हाड करून देण्यास तयार होते. त्यांच्याही मनात मी पुण्यालाच राहून मुलांचा विद्याभ्यास करवावा असे होते. लोक मला मदतीबद्दल हवे-नको विचारीत. पण दत्तोपंतांनी सर्वांना काही नको असल्याचे सांगून परतविले. फक्त होळकरांची स्कॉलरशिप दरमहा अठरा रुपयेप्रमाणे यशवंतास आठ दहा वर्षे मिळत राहिली. दिवस धामधुमीचे असल्याने दर पंधरा दिवसास पत्र पाठवून खुशाली कळवावी, असे दत्तोपंतांनी निक्षून सांगितले होते. पण एकदा झाले काय, मला आपले तीन आठवडे पत्र लिहिण्यास सवड झाली नाही. प्लेग असल्याने स्वाभाविकच त्यांना काळजी लागली. मी कदाचित सातारला माझ्या मावशीच्या घरी गेले असेन या भरवशाने ते तिकडे चौकशीस गेले. कारण झाली होती काय गंमत, मध्यंतरी पुण्यात सोजिरांनी जो हमामाहुतूतू घातला, त्या धांदलीचा उपसर्ग नको म्हणून गोळ्यांनी मला बिऱ्हाड बदलावयास लावले होते. त्या धांदलीत हीच गोष्ट मुळी दत्तोपंतांना कळवावयाची राहून गेल्याने ते आपले सरळ पहिल्या बिऱ्हाडी गेले व तेथे कोणी नाही असे दिसताच तडक साताऱ्यास गेले! नंतर मग त्यांना खरी हकीकत कळली. पत्र टाकावयास उशीर झाल्यामुळे त्यांना इतकी काळजी वाटून त्रेधा करून घ्यावी लागली; तेव्हा आता काही भानगडच नको म्हणून त्यांनी मला अकोल्यासच बोलावून घेतले.

मला अकोल्यापेक्षा पुण्यास राहण्याची इच्छा असणे अगदी स्वाभाविक होते. परंतु योगायोगच निराळा होता! माळावरील झोपडीवजा घरासंबंधी मी मागे सांगितलेच आहे. त्यांची संन्यस्तवृत्ती त्यातही दिसून आली. त्यांनी ते घर आपल्या मृत्यूनंतर सोसायटीने विकत घ्यावे, असा करार केला होता. त्याप्रमाणे सोसायटीने ते अकराशे रुपयांना विकत घेतले. या घरासंबंधीचा करार मला अगोदरपासूनच माहीत असल्याने त्याच्याभोवती बागबगीचा करावा, त्याकरिता खस्ता खाव्यात असे मला वाटत नसे. मला ते नेहमी म्हणत, 'झाडांना पाणी का घालीत नाहीस? चांगली बाग का करत नाहीस?' पण मला मनात काय वाटते ते ओळखून मग पुन्हा म्हणत, 'जन्म तरी काय, जगावर दोन दिवसांचीच वस्ती ना? मग त्यासाठी नाही का आपण धडपडत? घर आपणाकडं कायमचं राहणार नसलं म्हणून काय झालं?' यांच्या आजारीपणामुळेही या गोष्टीत माझे फारसे लक्ष लागत नसे. यांच्या प्रकृतीमुळे मी उदासीन असे.

त्यांच्या सर्व आयुष्यात त्यांनी कोणाबरोबर भांडणतंटा असा केला नाही. झाला काय तो फक्त टिळकांशी. परंतु केसरी त्यांना इतके टोचूनबोचून लिहीत असताही त्यांनी कधी वावगा शब्द लिहिला नाही. त्यांच्यासंबंधीचे गैरसमज एका केसरीने व त्याच्या बगलबच्चांनी जितके पसरविले

असतील, तितके दुसऱ्या कोणीही पसरविले नाहीत. परवापरवा टिळक-पुण्यतिथीस मी कीर्तनास गेले असताना त्या हरदासाने टिळकचरित्रातील इंदूरच्या पैशांचा उल्लेख करून यांना स्वार्थी म्हटले. मला राग आला. त्यांच्या हयातीत लोकांनी गैरसमज पसरविलेच, पण माघारीसुद्धा तीच प्रथा चालू आहे हे पाहून या दीर्घ द्वेषाची खरोखरच चीड आली मला.

आपल्या कार्यासाठी त्यांनी आपल्या जिवाचे रान केले. घर, प्रपंच, पैसाअडका, मानमरातब - कश्शाकशाची पर्वा केली नाही. प्रसंगी आपली कातडी देऊन दुसऱ्याची बचावली. म्हणतील ते करून दाखविले! पण काळच विपरीत पडला! त्यांच्या श्रमाचे व्हावे तसे चीज झाले नाही. त्यांना त्याची क्षिती नव्हती; पण त्यांचे वनवास पाहणाऱ्या माझ्या जिवाला मात्र रात्रंदिवस वाटते - लोकांकरिता लोकांकरिता म्हणून सतत तडफडणाऱ्या या जीवाचे मोल लोकांनी काही नीट केले नाही.

यांचे मामा दत्तोपंत भागवत आणि अनंतराव भागवत यांनी गोपाळरावांना हरतऱ्हेने मदत करण्याचे ठरविले होते. त्यांनी एकदा आठदहा पोती हरभरे घोड्यासाठी म्हणून पाठविले. यांनी किंमत विचारली; तेव्हा ते म्हणाले, 'शेताचे हरभरे घोड्यासाठी पाठविले, त्याची कसली आली आहे किंमत?' त्या वेळी हे म्हणाले, 'मी जिवंत आहे तोपर्यंत तरी आपल्या मदतीची काही मला जरूर लागणार नाही. माझ्या अपरोक्ष मात्र तुम्हाला काय मदत करावयाची असेल ती करा.' त्यांच्या मनात यांना तीनचार हजार रुपये द्यावयाचे होते, परंतु त्या वेळी मलाही ती गोष्ट पसंत पडली नाही आणि आम्ही पैसे घेण्याचे नाकारले. पुढे हे गेल्यावर दत्तोपंतांनी तीन हजार व अनंतरावांनी एक हजार अशी एकूण चार हजार रुपयांची मला मदत केली. त्या वेळी दोघेही मला म्हणाले, 'आमचे एकमेकांवर किती प्रेम होते, याची तुला काय कल्पना येणार?'

हे गेल्यावर आम्ही एक वर्ष दीड वर्ष पुण्याला होतो. मध्यंतरी सहा महिने अकोल्यास काढून मग फिरून पुण्यास गेलो. दरसालप्रमाणे दत्तोपंत भागवत कऱ्हाडला जाण्यासाठी म्हणून पुण्यास आले आणि मलाही तिकडे घेऊन जाण्याचा त्यांनी विचार केला. मलाही वाटे, हळूहळू यांच्यामध्ये मिसळले पाहिजे, बोलले-वावरले पाहिजे, त्याशिवाय आता कसे होणार? परंतु वेणूची आठवण ताजीच असल्याने जाणेही प्रशस्त वाटेना. तरीपण दत्तोपंतांनी फारच आग्रह केल्याने जाणे भाग पडले. त्या वेळी माझे थोरले भाऊजी (जे पूर्वी साधू झाले होते म्हणून मी सांगितले) ते तिथेच होते. ते म्हणाले, 'वहिनी, आता ही आपल्या वाट्याची भांडीकुंडी, सामानसुमान यांची वाट काय?' अर्थात मला त्यांच्या बोलण्यामध्ये काही हेतू असेल, याची कल्पनाही झाली नाही. आणि त्या वेळी माझे मन तरी कुठे ठिकाणावर होते? मी उदासीनपणे म्हटले, 'पुण्याला इतकं सामानसुमान पडलं आहे, त्यातच हेही जाऊन पडेल.' त्यावर ते म्हणतात कसे, 'भांडीकुंडी, सामानसुमान वगैरे तुला हवं असेल, तर आमच्या मर्जीप्रमाणं वागलं पाहिजे.' त्याबरोबर मला त्यांचा सर्व कावा लक्षात आला आणि मी जरा रागानेच म्हटले, 'मला कुणाची मर्जीबिर्जी सांभाळण्याचं काहीएक कारण नाही. ज्यांची मर्जी सांभाळायची होती त्यांची सांभाळली आजपर्यंत; पण तेही आता निघून गेले! तरी परंतु त्यांच्या माघारी मी त्यांचीच मर्जी सांभाळणार. मग त्या पायात कुणाकुणाच्या कितीही मर्ज्या तुटल्या; तरी मला त्याची पर्वा नाही!'

अर्थात माझ्या अशा फटकळ उत्तराने सर्वांनाच जरा राग आला. मीही पण लगेच निघून उंब्रजला गेले. मला लोकांनी नाना तऱ्हांनी भीती घातली. लोक म्हणत, 'तुझ्या मुलांची लग्नं-कार्य व्हायची आहेत, आपली मुकाट्यानं सोवळी होऊन जनरूढीप्रमाणं चाल; म्हणजे सर्व काही सुसूत्र होईल. नाहीतर उगीच हालअपेष्टा आणि मुलाबाळांचा वनवास करून घेशील.' पण मला त्या वेळी कोणाच्याच म्हणण्याची पर्वा वाटली नाही व मी गोपाळरावांनी सांगितलेल्या मार्गापासून एक पाऊलभरही ढळले नाही.

मला ते दिवस अजूनही आठवतात. त्या वेळी माझ्या हातचे पाणी कुणास चालत नसे. मोलकरणींची भांडी जशी विसळून घेतात, तशी पुन्हा विसळून घेत. माझा नमस्कारसुद्धा चालत नसे कोणाला! मी पुण्याला असताना माझ्या मंडळींनी माझ्याकडे यावे, राहावे असे मला वाटणे अगदी स्वाभाविक होते आणि त्याप्रमाणे मी सर्वांना म्हणे,

'माझ्या हातचं तुम्हाला चालत नसेल तर नको चालू दे. नळ आहे, भांडी आहेत, सामानसुमान आहे. आपला वेगळा स्वयंपाक करा, खा नी राहा चार दिवस आल्यासारखे!' पण नाही! तेसुद्धा अगदी जीवावर येई त्यांच्या!

यांच्या मरणानंतर मी अवघी दोन वेळाच माहेरी गेले. माहेरी असताना मात्र माझ्या वडिलांनी मला कधी हिडिसफिडीस केल्याचे स्मरत नाही. लोक त्यांना विचारीत, 'अंबू सोवळी का होत नाही? तुम्ही तिला आग्रह का करीत नाही?' त्यावर ते म्हणत, 'अंबूवर कोणत्याही तऱ्हेनं मी सत्ता चालवावी असं नाही. तिची ती पूर्ण मुखत्यार आहे. ती आमच्यावर थोडीच अवलंबून आहे?' अर्थात बापाचेच हृदय ते! माझ्यावरचा हा प्रसंग पाहून त्यांना अत्यंत वाईट वाटे आणि माझ्या मनाला वाईट न वाटेल अशा तऱ्हेने वागण्याची व बोलण्याचालण्याची ते नेहमी खटपट करीत. ते मुद्दामच मला संध्येचे मांडावयास सांगत. हेतू हा की, मला वाटावे बाबांना मी संध्येचे मांडलेले चालते, माझ्या हातचे पाणी त्यांना संध्यापूजेला चालते. पण मीहूनच या गोष्टी दुसऱ्या कोणाकडून तरी करवून घेई.

गुरुवर्य अण्णासाहेब कर्व्यांच्या पुनर्विवाहाबद्दलची हकिकत मला अद्यापि आठवते. कर्व्यांची पत्नी पंडिता रमाबाईंच्या शाळेतील पहिली विद्यार्थिनी. रमाबाईंची शाळा फक्त विधवांसाठीच होती. तेव्हा स्वाभाविकच त्यांना वाटले की, आपली पहिली विद्यार्थिनी सुखात पडावी. म्हणून कर्व्यांनी जेव्हा प्रथम तिच्याशी लग्न करून घेण्याचे ठरविले, तेव्हा रमाबाईंनी 'मुलीच्या भावी आयुष्याच्या स्थिरतेच्या दृष्टीनं तिच्या नावे काही रक्कम प्रथम बँकेत ठेवा व तशी ठेवत असाल तरच, पुढील सर्व गोष्टी जुळवून आणते' असे सांगितले. त्या मुलीच्या वडिलांची या विवाहाला संमती होती; पण ते लोकापवादाला भीत होते व ते स्वाभाविकही होते. कर्वे तर काय, सार्वजनिक कार्याला वाहिलेले गृहस्थ! त्यांच्याजवळ काय असणार? तेव्हा ते आमच्याकडे आले व यांना जामीन राहा असे म्हणू लागले. ते म्हणत, 'पंडिता रमाबाईंचा व तुमचा स्नेह आहे. मी त्या मुलीशी चांगला वागेन आणि तिचं आयुष्य सुखाचं होण्याबद्दल खास तजवीज करीन, याबद्दल तुम्ही जामीन राहा.' ह्यांनीही ते कबूल केले. पंडिता रमाबाईंनी आपल्या पोटच्या मुलीप्रमाणे आपल्या विद्यार्थिनीचे लग्न करून तिला काही दागदागिने, पैसे वगैरे दिले. त्यानंतर पुढे ज्या ज्या वेळी कर्व्यांच्या पत्नी मला भेटत, त्या त्या वेळी मला थट्टेने म्हणत, 'तुम्ही माझ्या सासूबाई आहात हं.' या व अशाच दुसऱ्या कित्येक गोष्टी माझ्यासमोर घडत असल्याने त्यात तत्त्व काय आहे याची मला बरोबर कल्पना येई व ते स्वाभाविकच आहे. पुनर्विवाह करण्याच्या गोपाळरावांच्या मताबद्दल मला यांच्या मरणानंतर फार कुत्सित बोलणी सहन करावी लागली आहेत. हेतूंचा आणि कृत्यांचा विपर्यासच करायला माणसे बसली, तर त्यास कोण काय करणार? ज्यांनी संसार केला आहे, ज्यांना चार मुलेबाळे झाली आहेत, अशा स्त्रियांनी सुद्धा पुनर्विवाह करावा, असे काही त्यांचे मत नव्हते. परंतु लोक इतका खोल विचार करतील तेव्हा ना! कोणीकडून तरी गांजणूक करावयाची हाच त्यांचा उद्योग!

आम्ही अकोल्याला आलो त्या वेळी मनूताईचा दीर वारला. या मनूताई म्हणजे अनंतराव भागवतांची मुलगी. हीही पण बालविधवाच. आमच्या वेणूताईच्या मागोमाग हिचेही शिक्षण वगैरे झालेले. यांनी उत्तम तऱ्हेने आपला अभ्यासक्रम पुरा करून येथे खास विधवांसाठी त्यांच्या दु:खी जीवनाला काहीतरी आळा घालण्यासाठी आणि त्यांना काही शिक्षण व हस्तव्यवसाय शिकवावे म्हणून 'लेडीज होमक्लास' या नावाची संस्था १९१२ साली काढली. आता या संस्थेत स्त्रिया तर शिकतातच, पण मुलींच्या ए.व्ही. स्कूलमध्ये तिचे रूपांतर आता झाले आहे. स्त्री-शिक्षणाचा हा आरंभ अकोल्यास या मनूताईंनी केला. त्यांचा दीर वारला, तेव्हा त्यांच्या पत्नीजवळ तिला सोबत करताना कोणी बसण्यासही तयार होईना! मी ही गोष्ट पाहिली, तेव्हा मला या दुष्ट रूढीबद्दल अत्यंत वाईट तर वाटलेच; पण मनस्ताप, संतापही आला. मी रागाने म्हटले, 'यापेक्षा विष देऊन मारून तरी का टाकीत नाही!' अर्थात मन कळवळल्यामुळे माझ्या तोंडून असे उद्गार निघून गेले. पण त्या प्रसंगापासून मी मात्र ठरवून टाकले, आता यापुढे शक्य तो स्त्रियांना उपयोगी पडावयाचे.

हे मला नेहमी म्हणत की, 'गरीबांना विद्या करणं फार कठीण जातं, याचा अनुभव मला आहे; तेव्हा यासाठी तुझ्या एखाद्या भावाला आपण विद्या देऊन शहाणे करणार'

त्याप्रमाणे माझा धाकटा भाऊ आमच्याकडे पुण्यास शिकण्यासाठी म्हणून होता, पण तो पुढे पळून गेला. अर्थात घरी काही त्रास होत होता अशातला भाग नाही, पण काही असेल ते असो, तो आपला एक दिवस निघून गेला. कदाचित त्याला आमच्या इकडची एकलकोंडी राहणी परवडली नसेल. तो मॅट्रिकपर्यंत शिकला आणि पळून गेला म्हणून मला फार वाईट वाटले. त्यावर ते म्हणाले, 'गेला पळून तर जाईना! आपण तुझ्या एकातरी भावाला शहाणे करण्याचा निश्चय केला आहे. हा गेला, तर दुसरा आणू.' नंतर माझ्या दुसऱ्या भावाला म्हणजे केशवला आणले. तो मॅट्रिकपर्यंत सुसूत्र शिकलाही, पण पुढे हेच वारल्यामुळे त्याचे शिक्षण तेवढ्यावरच आटोपले! आम्हीही पुणे सोडले. केशवचा थोरला भाऊ हरी लवकरच वारला.

टेंबूला आमची दुसरी काही नातलग आगरकर-मंडळी होती, त्यातलाच एक आगरकर पुण्याला शिकत होता. तो यांचा दूरचा पुतण्या. याला नाना म्हणत. सर्व गोष्टीत अगदी हुशार होता. खेळात, अभ्यासात, प्रत्येकात तरबेज. पण नंतर तो शाळेत लक्ष घालण्याऐवजी दुसऱ्याच काही फंदात पडला. मेळे काढून लोकात जागृती करू लागला आणि यांचे जे मनोरथ की, आपल्या कुळातला हा इसम आपल्याइतकाच किंबहुना आपल्यापेक्षाही काकणभर जास्त कुळाचे नाव काढणारा व्हावा, ते विफल होण्याची चिन्हे दिसू लागली. खुन्यामुरलीधरापाशी त्या वेळी तो व त्याचे मित्र राहात असत. तेथून सदाशिव पेठेच्या हौदावर मोठ्या पहाटे ते सर्व स्नानाला जात व जाताना रस्त्याने भूपाळ्या, पोवाडे वगैरे म्हणून लोकजागृतीचे काम करीत. पुढेपुढे त्यांच्यावर पोलिसांची नजर राहू लागली. लोक म्हणत की, हा टिळकांच्या नादी लागला. टिळकांचा पक्ष अगदी जहाल समजला जाई, त्यामुळे सर्वांना त्याची भीती वाटे. हा नाना आगरकर प्रथम यांच्याच शाळेत शिकत होता आणि हे त्यास वारंवार फी, पुस्तके वगैरे देऊन मदत करीत. पण त्याच्या या उसाभरींमुळे तो नापास झाला; तेव्हा हे मला म्हणाले, 'नाना आता काही चढत नाही. बस्स, संपलं त्याचं शिक्षण! आता माझ्या माघारी तो तुझ्याकडं काही मागायला आला; तर साफ नाही म्हणून सांग.'

तो टिळकांच्या कक्षेत गेला, या कल्पनेमुळे लोक त्याच्याशी संबंध ठेवायला सुद्धा कचरत असत. पुढे तो पुण्यातून नाहीसा झाला व नंतर इंदूरला खुनाच्या आरोपावरून त्यास फाशीची शिक्षा झाली. परंतु पुढे ती फाशीची शिक्षा कमी होऊन काळेपाण्याची झाली.

इंदूरच्या तुरुंगातून सुटून आल्यानंतर तो अगदी डोके फिरल्यासारखे करीत असे. आता थोडासा सुधारला आहे. सुटून आल्यानंतर तो अचानक आमच्याकडे आला आणि म्हणाला, 'मी सर्व आगरकरांचा खून करणार! त्यांचा निर्वंश झाला पाहिजे!' अर्थात आम्हाला फारच भीती वाटली.

इंदूरची शिष्यवृत्ती यशवंताला होती ती घेऊ नये, असा त्याचा फार आग्रह होता. एक मोठे बाणेदार पत्र पाठवून त्याने आम्हाला तसे कळविले होते. एवंच काय, आपल्या नातलगांतील कोणातरी एकाला आपल्या पाठोपाठ विद्वान करून सोडण्याची गोपाळरावांची इच्छा काही सफल झाली नाही. गरीब मुलांचे विद्यार्जनाच्या कामी किती हाल होतात, याची पूर्ण कल्पना स्वत:ला असल्याने त्यांना अशा विद्यार्थ्यांना मदत करण्यात फार हौस वाटे. आम्ही काही मोठे श्रीमंत झालो होतो अशातला भाग नव्हता; पण आहे त्यातच दुसऱ्याचे हित करता आले तर पाहावे ही बुद्धी.

असो. झाल्या गोष्टी होऊन गेल्या; त्यांच्या स्मृती मात्र मागे राहिल्या! इतके दिवस त्या ठेवल्या तशाच जतन करून; पण वाटले, टाकावे एकदा सांगून. लोकांनी त्यांच्या माघारी त्यांची सेवा केली आणि मी त्यांची जन्माची भागीदारीण मात्र अद्यापि स्वस्थच. मी बायको म्हणून, आणि किती किती मागचा काळ! स्मृती झाली तसेतसे सांगून टाकले. काही चुकलेमाकले असेल तर आपले म्हातारे माणूस म्हणा आणि द्या सोडून. मला आपली त्यांची स्मृतिसेवा करावीशी वाटली, ती योगायोग आला म्हणून करून टाकली. त्यांचे स्नेहीसोबती आता कोण आहेत? कोणीकोणी नसतील, नाही? क्वचित कोठेतरी असतील; तर त्यांनी जरा आठवण करकरून पाहावे, मी म्हणते ते सर्व कसे त्यांच्या डोळ्यांपुढे उभे राहील ते!

●●●